(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना

सभापती : माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या 2 सूचना आलेल्या आहेत. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांची सूचना 9.00 वाजता आलेली आहे आणि सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व संजय केळकर यांची सूचना 10 वाजून 45 मिनिटांनी आलेली आहे. 21 डिसेंबर, 2008, रोजी रायगड जिल्ह्यातील रोहा शहरानजीकच्या देवकान्हे गावात भेसळयुक्त गावठी दारु प्राषन केल्यामुळे 6 जण मृत होणे व 73 गावकरी अत्यवस्थ होणे अशा पध्दतीच्या दोन्ही सूचना जवळजवळ सारख्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या सूचनेमध्ये आणखी एक मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य म्हणत असतील तर मी तो मुद्दा वाचून दाखवतो किंवा सन्माननीय सदस्यांनी त्याबाबत सांगावे. हा विषय नियम 289 चा कसा होतो याबाबत सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे एका-एका मिनिटामध्ये मांडावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, काल रायगड जिल्ह्यमध्ये 219 ग्रामपंचायतींच्या निवडणुका होत्या आणि त्या निवडणुकांमध्ये रोहा तालुक्यातील देवकान्हे ग्रामपंचायतीमध्ये एका पक्षाच्या गटाने मतदारांना दारु पाजण्याचे काम केले आणि त्यामध्ये 100 लोकांना विषबाधा झालेली आहे. 6 लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. 35 लोक विषबाधेने बाधित झालेले आहेत. त्यांना मुंबईच्या सायन हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आलेले आहे. सभापती महोदय, रायगड जिल्ह्यामध्ये दुसरे एक दारुकांड झालेले आहे. पालीमध्ये गेल्या दोन महिन्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री. वसंत ओसवाल यांच्या बंधूने त्या ठिकाणी जवळजवळ 60 लोकांना....

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य पक्षाचे नाव घेत आहेत....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, देवकान्हे येथे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी दारु पाजली. सभापती महोदय, पालीमध्ये 55 लोक बाधित झालेले आहेत. त्यांना अटक झाली आहे...

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी हा विषय नियम 289 अन्वये कसा होतो ते सांगावे. यासंदर्भात आपण बोलत असताना राजकीय पक्षाचे नाव टाळणे गरजेचे आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, त्यांना अटक झाली होती, त्यानंतर त्यांना जामीन मिळालेला आहे. त्यांना मिळालेला जामीन बेकायदेशीर आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी राजकीय पक्षाचा उल्लेख केला असल्यामुळे मी त्यांचे ते वक्तव्य रेकॉर्डवरुन काढतो.

श्री.जितेंद्र आव्हाड : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अर्धवट माहितीच्या आधारे सभागृहामध्ये बोलू नये.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सभागृहामध्ये अतिशय कमी बोलतो आणि ज्यावेळी बोलतो त्यावेळी जबाबदारीने बोलतो. मी जे बोलतो ते सत्य आहे. रायगड जिल्हयामध्ये दोन महिन्यापूर्वी पाली या गावामध्ये हत्याकांड झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे त्या विभागाचे अध्यक्ष श्री.वसंत ओसवाल यांचे बंधू 3 महिने जेलमध्ये होते. त्यांना जामीन मिळालेला आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एखाद्या राजकीय पक्षाचे नाव घेण्याचा, एखाद्या व्यक्तीच्या भावाचे नाव घेण्याचा सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना काहीही अधिकार नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी जबाबदारीने बोलत आहे. ते राष्ट्रवादी पक्षाचे सदस्य आहेत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्यातील विषय नियम 289 मध्ये कसा बसतो या मर्यादेपर्यंत त्यांनी आपले वक्तव्य मर्यादित ठेवावे असे त्यांना सांगितले होते. त्यांनी एका राष्ट्रीय पक्षाचे नाव घेतल्यावर एखाद्या राजकीय पक्षाचे नाव सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना घेता येणार नाही, मी त्यांचे वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकतो असा आपण निर्णय दिला. त्यानंतरही सन्माननीय सदस्य त्या व्यक्तीचे आणि पक्षाचे नाव घेत आहेत. त्यामुळे त्यांना आपण समज द्यावी.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना मी सांगतो की, नियम 289 खाली हा प्रस्ताव कसा होतो हे सांगण्यासाठी आपण आपले मत जरुर मांडावे. पण ते सांगत असताना राजकीय पक्षाचे किंवा राजकीय पक्षातील व्यक्तीचे नाव घेण्याचे आपण टाळले पाहिजे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी आपल्याला नम्रपणे सांगतो की, या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे, सी.आय.डी.मार्फत चौकशी झाली पाहिजे अशी मी नियम 289 अन्वये मागणी करीत आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, नियम 289 मधील तरतूद स्पष्ट आहे. त्यामुळे हा विषय नियम 289 मध्ये कसा बसतो ते त्यांनी सांगितले पाहिजे.

सभापती : सन्माननीय सदस्य जयंत प्र.पाटील यांनी केवळ तेवढेच सांगावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव यांना मी सांगू इच्छितो की, आपण खालच्या सभागृहामध्ये 10 वर्षे सदस्य होता, मी देखील या सभागृहात 8 वर्षे सदस्य आहे. ग्रामपंचायत सदस्य ते विधानपरिषद सदस्य असा माझा राजकीय प्रवास झालेला आहे. सभागृहाचे नियम आहेत त्या नियमांच्या बाहेर जाऊन मी कधीच बोलत नाही, सभाशास्त्र मला माहीत आहे. नियम 289 बद्दल मला काहीच माहीत नाही इतका मी ज्युनिअर राहिलेलो नाही. अधिक माहितीसाठी मी आपल्याकडे क्लास घ्यायला येईन. सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. हा गंभीर विषय असताना सन्माननीय सदस्य या विषयाबाबत चेष्टा करीत आहेत. मतदारांना पैसे देऊन त्यांना विकत घेण्याचे आणि त्यांना दारु पाजून त्यांच्या जीवाशी खेळ खेळण्याचे काम केलेले आहे.

सभापती महोदय, नियम 289 मधील प्रस्तावात मी आणखी एक विषय उपस्थित केलेला आहे. रायगड जिल्हयामध्ये 219 ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या. पनवेल तालुक्यामध्ये ओवे ग्रामपंचायतीमध्ये सुध्दा एक गुंड आहे. जो काँग्रेस पक्षाचा सरचिटणीस आहे, त्याला 6 महिने हद्दपार करण्यात आले होते. जी वस्तुस्थिती आहे ती किती लपविली तर लपविता येणार नाही.

(सत्तारुढ पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविलेले कामकाज स्थगित करुन नियम 289 मध्ये दिलेल्या विषयावर चर्चा घेण्यात यावी असे आपण त्यात नमूद केलेले आहे. या प्रस्तावावर आपण मघाशी राजकीय पक्षाचे नाव घेतले होते आणि आताही दुस-या राजकीय पक्षाचे नाव घेतलेले आहे. मी दोन्ही राजकीय पक्षाची नावे कामकाजातून काढून टाकत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, श्री.राजकुमार म्हात्रे नावाचा गुंड सहा महिने हद्दपार होता. ओवे ग्रामपंचायतीच्या मतदानाच्या वेळी त्यांने बोगस मतदान केल्यामुळे मतदान केंद्र प्रमुखांनी हरकत घेतल्यावर त्याला पोलिसांनी अटक केली होती. तो वॉंटेड होता. त्याला अटक केल्यानंतर तेथील एका जबाबदार पक्षाच्या माजी खासदाराने पोलिसांना दमदाटी केली, पोलिसांकडे अरेरावीची भाषा केली. तुमची ताबडतोब बदली करतो अशी धमकी दिली.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये दिलेला प्रस्ताव या नियमाच्या निकषामध्ये बसत नाही. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी पोलिसांमध्येही भीतीचे आणि घबराटीचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्या ठिकाणी पोलिसांना संरक्षण मिळाले पाहिजे अशी मी या 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या निमित्ताने मागणी करीत आहे. हा अतिशय गंभीर विषय असल्यामुळे आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील देवकान्हे येथे विषारी दारु पिऊन 6 आदिवासी मृत्यूमुखी पडले असून 73 आदिवासी अत्यवस्थ आहेत. त्यामधील 34 रुग्णांना जे.जे.हॉस्पिटल आणि सायन हॉस्पिटल येथे हलविण्यात आलेले आहे. या घटनेची माहिती मी घेतलेली आहे. त्या ठिकाणी ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत्या. या घटनेपूर्वी सुधागड पालीमध्ये अशाच प्रकारच्या झालेल्या घटनेबाबत आपण या सभागृहामध्ये चर्चा केलेली आहे. सभापती महोदय, हातभट्टीची दारु विकली गेली किंवा नाही हा विषय गौण आहे. परंतु त्या ठिकाणी मतदानाच्या वेळी लोकशाहीची मूल्ये पायदळी तुडवून लोकांना दारुचे आमिष दाखविले जात आहे या प्रवृत्तीचा या सभागृहाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. देवकाने तंटामुक्तीचे प्रमुख हे तेथे राहात नाहीत. रायगड जिल्ह्यामध्ये दारुची एकही भट्टी नाही, रायगड जिल्हा महाराष्ट्रात आदर्श आहे अशा प्रकारचे होर्डिंग मंत्रालयासमोर लावलेले आहेत. या रायगड जिल्ह्याचा आदर्श काय आहे? तर या गावामध्ये दारु पिऊन 6 आदिवासी लोक मृत्यूमुखी पडलेले आहेत आणिर 73 आदिवासी अत्यवस्थ आहेत. या घटनेला पक्षाचे नेते जबाबदार आहेत की नाहीत याबाबतीत नंतर चर्चा करु. गंभीर बाब ही आहे की, सर्वसामान्य आदिवासीचे बळी जात आहेत. अधिवेशन सुरु असताना ही घटना घडलेली आहे. राज्य उत्पादन शुल्क मंत्री महोदय श्री. गणेश नाईक हे घटनास्थळी गेलेले आहेत. सभापती महोदय, आदिवासींच्या जीविताची काळजी करणारे हे सभागृह आहे अशा प्रकारचा संदेश जर जनतेमध्ये जावयास पाहिजे असेल तर आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन आदिवासींच्या हिताचे रक्षण करणारे हे सभागृह आहे या मानसिकतेमधून या गंभीर विषयावर नियम 289 अन्वये चर्चा घडवून आणावी अशी माझी आपणास विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या घटनेच्या संदर्भात कोणत्याही पक्षाचे अथवा कार्यकर्त्याचे नाव न घेण्याचे निर्देश आपण दिलेले आहेत. ही नावे घेण्याची आवश्यकताच वाटत नाही. राजकारणामध्ये भ्रष्टाचार हा सतत पाय रेवून करणा-या मंडळींची नांवे या ठिकाणी का घ्यावीत ? म्हणून त्याबाबतीत खेद वाटून घेऊ नये. महात्मा गांधींच्या संस्कारामध्ये आणि संकृतीमधून सत्तेवर बसलेल्यांच्या राजवटीमध्ये ज्या घटना घडत आहेत त्या खेदजनक असून त्याचे भूषण आपणाला वाटत असल्यामुळे हा प्रस्ताव मांडत असताना -आपल्या पक्षाबाबत मला काही म्हणावयाचे नाही - माननीय सभापतींनी नाव काढल्यानंतर आपण टाळया वाजविता त्यावेळी अशा त-हेचे मृत्यू तुम्हाला स्वीकारार्ह आहेत असे वाटते. सभापती महोदय, या सदनामध्ये रायगड जिल्ह्यातील सुधागड पाली येथील घेटनेच्या संदर्भातील अशाच प्रकारच्या प्रस्तावावर फार मोठी चर्चा झाली होती त्यावळी तत्कालीन गृहमंत्र्यांनी केलेले भाषण आपण वाचावे. त्या भाषणावर पी.एचडी. करता येईल. त्यावेळी श्री. गणेश नाईक हे राज्य उत्पादन खात्याचे मंत्री होते. माननीय गृहमंत्र्यांनी असा शब्द दिला होता की, या पुढे या राज्यामध्ये एक थेंबभरही गावठी दारु निर्माण होणार नाही. असे असताना अशा प्रकारचे तीन हत्याकांड आदिवासी गावामध्ये झालेले आहेत. सरकारने शब्द देऊन देखील गावठी दारुचा प्रचार आणि प्रसार रोखता आलेला नाही. या शासनाने निर्धार व्यक्त केल्यानंतर देखील अशा प्रकारच्या घटनांमध्ये लोक सातत्याने मृत्यूमुखी पडत आहेत. सभापती महोदय, सरकारच्या नाकर्तेपणामुळे आणि चुकीच्या धोरणामुळे अशा प्रकारची घटना घडलेली आहे. जे मृत्यूमुखी पडले आहेत आणि जे मृत्यूच्या वाटेवर आहेत त्यांच्या संबंधाने या सरकारच्या दारु विषयीच्या धोरणाबद्दल जनतेमध्ये चांगला संदेश जाणार नाही,

....नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आणि म्हणून माझी अत्यंत नम्र विनंती आहे की, सभागृहापुढील कामकाज बाजुला सारुन सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात यावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या घटनेमध्ये 6 व्यक्ती मृत्युमूखी पडल्या आहेत आणि 73 व्यक्ती अत्यवस्थ आहेत. परमेश्वर करो या 73 व्यक्तींना दीर्घायुष्य लाभो. परंतु मी या व्यक्तींची माहिती घेतली की, 73 व्यक्ती अत्यावस्थ आहेत. या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींची संख्या खूप मोठी आहे. हा प्रकार कोणी केला ? का केला ? हा वेगळा प्रश्न आहे. एक गोष्ट खरी आहे की, रायगड जिल्हयात दिनांक 29 जानेवारी 2008 रोजी सुधागड तालुक्यात पाली गावात अशी घटना घडली होती. त्यावेळी देखील मोठया प्रमाणात व्यक्ती मृत्यमूखी पडल्या होत्या. त्या घटने असे प्रकार पुन्हा होऊ नयेत म्हणून शासनाने कोणत्याही प्रकारची खरबदारी घेतली नाही, त्यामुळे आजही अशी घडला पुन्हा घडली आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब यांना सांगू इच्छितो की, आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, त्याकाळी पक्ष बापुजींच्या विचारावर चालता होता. परंतु आता फक्त पक्षात बापुंचे नाव घेतले जाते, परंतु पक्ष पप्पुच्या विचारावर चालतो आहे. बापुंचा विचार आता मागे पडलेला आहे. बापुंचे नाव लावावयाचे आणि पप्पुच्या विचाराप्रमाणे काम करावयाचे असे सत्ताधारी पक्षात कामकाज चालले आहे. पप्पु म्हणजे श्री.पप्पु कलानी. ही घटना अतिशय गंभीर आहे. या घटनेत आदिवासी व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. पप्पुच्या विचाराने शासनाचे कामकाज चालत राहिले तर अशा घटना पुन्हा घडू शकतील आणि अशाच प्रकारे अनेक व्यक्ती मृत्यूमुखी पडतील. पप्पुच्या विचारांना प्रोत्साहन देणारे सत्तेत मोठमोठे लोक असतात, अशा विचारांना प्रोत्साहन देऊ नये, अशा घटना घडू नये. घटनेस जबाबदार असणा-या व्यक्तींना अटक व्हावी, त्यांच्यावर जरब बसावी म्हणून शासनाकडून कारवाई होणे अपेक्षित आहे. या घटनेत आदिवासी व्यक्तींचे मृत्यू झाले आहेत. त्यामुळे ही घटना अतिशय गंभीर आहे. तसेच या घटनेस तातडी आहे. माझे सहकारी सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जी माहिती सांगितली ती खरी आहे. मी त्याबाबतीत काही बोलत नाही. या घटनेत आतापर्यंत सहा व्यक्ती मृत्यूमुखी पडलेले आहेत, सायंकाळ पर्यंत मृत्यूमुखींची संख्या किती होईल हे सांगता येत नाही. आतंकवादी घटना घडली तशीच ही एक मोठी घटना आहे. या घटनेत अदिवासींचे बळी गेले

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

आहेत. या घटनेची गंभीरता, तातडी लक्षात घेता, यापुढे पप्पुच्या विचाराच्या लोकांना प्रोत्साहन मिळू नये म्हणून यासंदर्भात शासनाकडून तात्काळ कार्यवाही होणे गरजेचे आहे आणि म्हणून सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावास अनुमती द्यावी अशी माझी विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. गावठी दारु पिऊन अनेक व्यक्तींचा झालेला मृत्यू अशा घटनाच्या बाबतीत या सभागृहात पूर्वी चर्चा झालेली आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमध्ये गावठी दारुचे आणि पैशांचे अमिष दाखवून मते मिळविण्याचा प्रकार हा अत्यंत निंदनीय आहे. या घटनेत 6 आदिवासी व्यक्ती मृत्युमूखी पडलेल्या आहेत आणि 78 रुग्ण ग्रामीण रुग्णायातून जिल्हा रुग्णालयात हलविले गेले आहेत. त्या ठिकाणी 100 रुग्णांना लागण झाली आहे. 34 व्यक्ती अत्यावस्थ अवस्थेत आहेत. यापूर्वी अशा विषयाच्या बाबतीत स्थगन प्रस्तावावर सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. हा विषय अत्यंत गंभीर आहे. या घटनेत सहा आदिवासी व्यक्तिचा मृत्यू झाला आहे. जाणीवपूर्वक दारु पाजल्यामुळे या आदिवासी बांधवांचा मृत्यू झाला आहे. जाणीवपूर्वक दारु पाजून मृत्युमूखी पाडणे हा एक खूनाचाच प्रकार आहे. ही घटना गंभीर असल्यामुळे या घटनेच्या बाबतीत सभागृहात चर्चा घडवून आणली आणि त्याबाबतीत काही उपायोजना या सभागृहाच्या माध्यमातून सुचविल्या गेल्या तर भविष्यात अशा घटना महाराष्ट्रात घडणार नाहीत. हा विषय अत्यंत महत्वाचा आणि तातडीचा असल्यामुळे त्यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी विनंती सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी केली आहे, त्यांचा विनंतीस मी पाठिंबा देतो.

श्री. भास्करराव जाधव : सभापती महोदय, "रायगड जिल्हयात गावठी दारु पिऊन सहा व्यक्तींचा झालेला मृत्यू आणि 73 व्यक्ती अत्यावस्थ अवस्थेत असणे" या विषयाच्या अनुषंगाने सभागृहातील ज्येष्ठ सदस्य श्री. जयंत प्र.पाटील आणि श्री. विनोद तावडे यांनी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. त्या सूचनेवर सभागृहात चर्चा व्हावी अशा प्रकारची मागणी त्यांनी केलेली आहे. मी या विषयाच्या बाबतीत बोलणार नव्हतो. परंतु सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी मघाशी असे बोलले की, अद्यापपर्यंत सहा लोक मृत पावले आहेत,

यानंतर श्री. भोगले..

अशोधित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

आणि 73 लोक अत्यवस्थ आहेत. अजूनही या प्रकरणातील पूर्ण माहिती प्राप्त व्हायची आहे. ही दुर्घटना कोणत्या स्तरावर जाते, किती भयावह होते याचे चित्र स्पष्ट झालेले नाही. जरी हा प्रस्ताव तातडीचा असला तरी पूर्ण माहिती येऊ द्यावी. प्रस्तावावरील चर्चा सुरु करणे म्हणजे अर्धवट चर्चा केल्यासारखे होईल. म्हणून या प्रस्तावावरील चर्चा आज करण्याऐवजी पूर्णपणे माहिती येऊ द्यावी, त्यानंतर चर्चा मागावी असे माझे मत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या दुर्घटनेमुळे काही जण अत्यवस्थ आहेत. काही मृत झाले आहेत. अत्यवस्थ असलेले लोक जिवंत रहावेत अशी अपेक्षा ठेवायची की ते मृत होतात याची वाट पहायची? हा हजारो कुटुंबांशी संबंधित प्रश्न आहे. आदिवासी समाजाची अवस्था म्हणजे मुकी बिचारी कुणीही हाका अशी झालेली आहे. अशा घटना वारंवार आदिवासी भागात घडतात. महाराष्ट्रातील अन्य भागात घडतात. यामागचे सुत्रधार कोण आहेत? त्यांना पाठिशी घालणारी यंत्रणा आहे का? या यंत्रणेला कोणी पाठिशी घालत आहे का? सदन चालू आहे, महाराष्ट्राचे लक्ष या सदनाकडे लागलेले आहे. ज्याप्रमाणे मुंबई दशहतवादी हल्ला झाला तसाच आदिवासी लोकांना दारु पाजून त्यांच्यावर वेगळया प्रकारचा हल्ला झाला आहे. किती मृत झाले या वादात जाण्यापेक्षा प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो प्रस्ताव नियम 289 अन्वये मांडला आहे, त्या प्रस्तावाला शिवसेना व भारतीय जनता पक्षाच्या नेते मंडळींनी समर्थन दिले आहे, मी देखील समर्थन देते आणि या घटनेबद्दल कोणतेही राजकारण न आणता आदिवासी कुटुंबाची सुरक्षितता विचारात घेऊन सभागृहाने आणि सभागृहातील संवेदनशील सदस्यांनी या प्रस्तावाला पाठिंबा द्यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करावा अशा प्रकारची विनंती केलेली आहे. आजचे कामकाज लक्षात घेता याठिकाणी नियम 289 च्या प्रस्तावान्वये मांडलेला विषय नियमाप्रमाणे स्वीकारता येणार नाही. परंतु याठिकाणी मांडलेली भावना, आदिवासींच्या अनुषंगाने अनेक वेळा या सदनामध्ये किंवा खालच्या सदनामध्ये अनेकदा अशा चर्चा होत असतात. त्यादृष्टीने उपाययोजनांचा सुध्दा प्रामाणिक प्रयत्न करीत असतो. आजचे एकूण कामकाज पाहिले तर दोन अल्पकालीन चर्चाही आहेत. या व्यतिरिक्त

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

औपचारिक कामकाज आहे. दोन विधेयके चर्चेला आहेत. या प्रस्तावासाठी दोन तासाची चर्चा द्यावी असे माझे मत आहे. सभागृहात माननीय विरोधी पक्षनेते आणि संसदीय कामकाज मंत्री, सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी चर्चेसाठी वेळ ठरवून घेतली आणि त्याप्रमाणे चर्चा करावयाचे ठरविले तर दोन तासाची चर्चा आज जरुर करता येईल. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास तहकूब न करता प्रश्नोत्तराचा तास सुरु करु. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर या अनुषंगाने काय करता येईल याबाबत जरुर मी सदनाला मार्गदर्शन करेन. परंतु या विषयावर व्हावी अशी सदनाची अपेक्षा आहे, त्यादृष्टीने दोन तास चर्चा व्हावी. मी माझा निर्णय दिलेला आहे. निश्चित वेळ मी सदनाला सांगेन.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे वेळ ठरवावी आणि त्याप्रमाणे चर्चा करण्यात येईल.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे काय मत आहे?

श्री.दिवाकर रावते : आज सायंकाळी 5.00 वाजता चर्चा घेण्यात यावी.

सभापती : ठीक आहे. सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत रेग्युलर कामकाज करुन सायंकाळी 5.00 ते 7.00 या वेळेत या विषयावर चर्चा होईल.

श्री.हर्षवर्धन पाटील : बिले झाल्यानंतर चर्चा घेण्यात यावी.

सभापती : ठीक आहे. बिले झाल्यानंतर चर्चा घेण्यात येईल. आता प्रश्नोत्तराचा तास सुरु होईल.

(नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

मौजे माजिवडे (जि.ठाणे) येथील मे.नॅशनल स्टोन क्वॉरी कंपनीच्या ताब्यातील जमीन काढून घेण्याबाबत

(1) * 46346 श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. जगदीश गुप्ता : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मे.नॅशनल स्टोन क्वॉरी या कंपनीने मौजे माजिवडे (जि.ठाणे) येथील सर्व्हे नं. 194/1 ही भारत सरकारच्या मालकीची जागा भाडेपट्टीची कोणतीही नोंद नसताना अनधिकृतपणे वापरल्याबद्दल मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक 31 मे, 2008 रोजी मुख्य सचिवांकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(2) सदर तक्रारीत कोणत्या प्रमुख बाबी आहेत व त्याबाबतच्या चौकशीची स्थिती काय आहे,

(3) असल्यास, भाडे पट्ट्यांची कोणतीही नोंद नसताना अनधिकृतपणे जमीन वापरणाऱ्या मे.नॅशनल स्टोन क्वॉरी या कंपनीच्या संचालकांवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(4) कारवाई झाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील, डॉ. पतंगराव कदम यांच्याकरिता : (1) होय.

(2),(3) व (4) भारत सरकारची जमीन अनधिकृतपणे वापरणाऱ्या मे.नॅशनल स्टोन क्वॉरी या कंपनीकडून जमीन काढून घ्यावी व भाडेपट्ट्याची कोणतीही नोंद नसताना अनधिकृतपणे जमीन वापरणाऱ्या मे.नॅशनल स्टोन क्वॉरी या कंपनीच्या संचालकावर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून चौकशी करुन सविस्तर अहवाल मागविला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नॅशनल स्टोन क्वॉरी या कंपनीच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला शासनाने "होय" असे उत्तर दिलेले आहे. याबाबतची तक्रार श्री. नरेंद्र कांबळे यांनी केली होती. ही जमीन भारत सरकारच्या मालकीची आहे आणि भारत सरकारने ती प्रॉव्हिडंट फंड इन्व्हेस्टमेंट कंपनीला वापरण्यासाठी दिली होती आणि त्या कंपनीने ही जमीन नॅशनल स्टोन क्वॉरी या कंपनीला 99 वर्षाच्या लीजवर दिली. माझी मागणी अशी आहे की आपण प्रश्नाला उत्तर दिले की, जिल्हाधिकाऱ्यांकडून चौकशी अहवाल मागविलेला आहे. हा चौकशी अहवाल आपण केव्हा मागितला आणि तो किती दिवसांपासून प्रलंबित आहे ? तसेच श्री. नरेंद्र कांबळे यांनी जी तक्रार केली होती त्या अनुषंगाने कोकण विभागीय आयुक्तांनी प्रधान सचिवांना दिलेली माहिती अशी की, उपरोक्त तक्रारीनुसार प्रश्नांकित जमीन ही मूलत: भारत सरकारच्या मालकीची आहे व सदर जमीन प्रॉव्हिडंट फंड इन्व्हेस्टमेंट कंपनीकडे देखरेखीकरिता देण्यात आली होती. तथापि या जमिनीचे भारत सरकारच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरण करण्याचा

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 46346..... श्री. पांडुरंग फुंडकर .....

अधिकार सदर कंपनीस भारत सरकारने दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तसेच सदर कंपनीस याबाबत कळवूनही कंपनीने त्यांचे काहीही म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे प्रॉव्हिडंट फंड इन्व्हेस्टमेंट कंपनीस सदर जमीन हस्तांतरित करण्याचा अधिकार नसून त्यासंबंधी जो भाडेपट्टा करार केलेला आहे तो रद्द करावा असे मत आहे, असेही विभागीय आयुक्तांनी प्रधान सचिवांना दिलेल्या माहितीत सांगितले आहे. असे असताना अजूनही जिल्हाधिकाऱ्यांकडून तो अहवाल शासनाला प्राप्त होत नाही. माझे म्हणणे असे आहे की, हा अहवाल कधी मागितला आणि त्याला विलंब होण्याची कारणे काय ? तसेच या मालमत्तेसंबंधी झालेले सर्व फेरफार कायदेशीर आहेत काय ? चौकशी पूर्ण होईपर्यंत सदर मालमत्तेची विक्री व हस्तांतरणास शासन स्थगिती देणार काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, प्रथमदर्शनी या पूर्ण विषयाचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, ही जमीन पूर्वी ग्वॉल्हेर दरबाराकडे होती. सबसिक्वेंटली मध्य प्रदेश सरकारची ही कंपनी अंडरटेकिंग असून त्यांच्याकडे या जमिनीचे 7/12 असून त्यावर सुध्दा या कंपनीचेच नाव उपलब्ध आहे. मूलत: ही जमीन भारत सरकारकडे हस्तांतरित करण्यात आली होती. हे हस्तांतरण सन 1957 मध्ये करण्यात आले असून सन 1962 मध्ये आरटीएस/एसआर-2626, दि. 5.1.1962 नुसार सदर मिळकतीस भारत सरकारतर्फे, प्रॉव्हिडंट फंड इन्व्हेस्टमेंट कंपनी तर्फे एक वहिवाटदार यांच्या नावाने हे दाखल करण्यात आले आहे व फेरफार मंजूर करण्यात आला होता. त्याचप्रमाणे नॅशनल स्टोन क्वॉरी या कंपनीबरोबर 99 वर्षाचा करार प्रॉव्हिडंट फंड इन्व्हेस्टमेंट कंपनीने केलेला आहे व याची नोंदणी दि. 19.4.1978 ला केली आहे व तशी नोंद देखील 7/12 वर आहे. प्रथमदर्शनी असे दिसते की, भारतसरकारची परवानगी यासाठी घेणे अपेक्षित होते परंतु तशी परवानगी घेतली गेली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली येत्या आठ-दहा दिवसात एक बैठक घेण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच जे कन्स्ट्रक्शन आहे ते देखील थांबविण्यास सांगितले आणि कुठलीही खरेदी-विक्री या जागेवर केली जाणार नाही असे आदेश आजच काढले जाणार आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :46346.....

श्री. जितेंद्र आव्हाड : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एका मोठया स्क्रॅम्पला तोंड फोडलेले असल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. हा विषय केवळ मे. नॅशनल स्टोन क्वारी या कंपनीपुरता मर्यादित नाही. ग्वाल्हेर संस्थानिकांची 8 हजार एकर जमीन ठाण्यातील येऊरगाव, पाचपाखाडी या साख्या ठिकाणी सुध्दा आहे. असंख्य गावामध्ये पी ॲन्ड एफ कंपनीचे नाव आहे. या जमिनीवर असंख्य ठिकाणी 40-40 मजल्याच्या इमारती झालेल्या आहेत व काही इमारतींचे काम अद्याप देखील सुरु आहे. आम्ही त्या त्या वेळच्या तत्कालीन कमिशनरांना सांगत होतो की, या कपंनीने भारत सरकारची परवानगी न घेता या ठिकाणी इमारतीच्या बांधकामाला सुरुवात केलेली आहे त्यामुळे या जमिनीचा लिलाव व्हावयास पाहिजे. परंतु काहीही न करता महसुल खात्याच्या अधिका-यांना हाताशी धरुन करोडो रुपयांचा भ्रष्टाचार या ठिकणी करण्यात आलेला आहे. भारत सरकारच्या जमिनीवर जे काम होत आहे त्याला भारत सरकारची कोणतीही परवानगी न घेता या ठिकाणी काम करण्यात आलेले आहे. मे.नॅशनल स्टोन कंपनीचा आधार घेऊन प्रॉव्हीडंट इनव्हेस्टमेंट फंडच्या एकंदरीत कामकाजाची चौकशी करण्यात येईल काय ? या ठिकाणी भारत सरकारची परवानगी न घेता या ठिकाणी ज्या इमारतींचे काम सुरु आहे त्याला स्थगिती देण्यात येईल काय ? या ठिकाणचे एखादे प्रकरण कोर्टात गेले आणि या ठिकाणी जो मनुष्य घर घेईल त्याला असंख्य अडचणीला सामोरे जावे लागेल. तेव्हा शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन मे. नॅशनल स्टोन क्वारीच्या संदर्भात जो निर्णय दिला तसाच निर्णय ठाणे शहरातील प्राव्हीडंट फंड इनव्हेस्टमेंट कंपनीच्या सर्वच जमिनीला देण्यात येईल काय ? तसेच मे. नॅशनल स्टोन क्वारीला 16 कोटी रुपयांची पेनल्टी लागलेली आहे त्यामुळे 16 कोटी रुपयांची पेनल्टी या कंपनीकडून का वसूल करण्यात आली नाही ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात ग्वाल्हेर संस्थानिकांची मुळ जमीन किती होती, त्यापैकी प्राव्हीडंट फंड कंपनीकडे त्यातील किती जमीन आहे याबाबतीत मी अगोदर सांगितल्या प्रमाणे येत्या 10 दिवसात भारत सरकारचे संबंधित अधिकारी, या कंपनीचे अधिकारी तसेच मध्यप्रदेश सरकारचे संबंधित अधिकारी यांना बोलावून बैठक घेऊन मग पुढचा निर्णय घेतला जाईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भातील सर्व माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी अतिशय चांगले उत्तर दिलेले आहे. महाराष्ट्रातील स्टोन क्वारीजनी महाराष्ट्रातील पर्यावरणाचा समतोल बिघडवून टाकलेला आहे. महाराष्ट्रातील स्टोन क्वारीजनी डोंगर सपाट करण्याचा सपाटा लावला आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पर्यावरणाचे अनेक संकट आपल्यापुढे निर्माण झालेले आहेत. स्टोन क्वारीजला परवानगी देतांना पर्यावरणाच्या समतोल ढळणार नाही संदर्भात आपण काही पुनर्विचार करणार आहात काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, स्टोन क्वारीजला परवानगी देतांना जिल्हयाचे पर्यावरण विभागाचे संबंधित अधिकारी हे सुध्दा त्या कमिटीवर असतात. पर्यावरणाला कमितकमी त्रास होईल यासंदर्भात काळजी घेण्याचे धोरण शासनाचे नेहमीच राहिलेले आहे. या ठिकाणी जो मुळ प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे त्यामध्ये मे. नॅशनल स्टोन क्वारी ही कंपनी स्टोन क्वारीजचे काम करीत नसून कंपनीचे नाव फक्त तसे आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुळात ही जमीन ग्वाल्हेर संस्थानाची होती. दिनांक 7 एप्रिल, 1958 रोजी स्थंनिकांचे विलिनीकरण झाल्यानंतर या जमिनीवरील ग्वाल्हेर संस्थानचे नाव कमी करुन त्यामध्ये भारत सरकारचे नाव टाकण्यात आले. प्राव्हीडंट इनव्हेस्ट कंपनीच्या वतीने श्री. प्रधान यांनी भारत सरकरची परवानगी न घेता काम केलेले आहे. ज्यावेळी मे.नॅशनल स्टोन क्वारी कंपनीला ही जमीन देण्यात आली तेव्हा भारत सरकारची परवानगी घेण्यात आली नव्हती. मे.नॅशनल स्टोन क्वारी कंपनीला ही जमीन दगड काढण्यासाठी 1 जून, 1963 मध्ये 99 वर्षाच्या कराराने देण्यात आली होती. जमीन लिजवर देतांना जमीन कोणाच्या मालकीची आहे, त्यावर भाडे पट्टा आहे काय यासंदर्भातील कोणतीही गोष्ट तपासण्यात आली नव्हती.

यानंतर श्री. अजित.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र....46346.....

श्री.पांडुरंग फुंडकर.....

ही जमीन भारत सरकारची असताना त्यासंबंधीची कोणतीही कागदपत्रे न पाहता प्रॉव्हींडट फंड इन्व्हेस्टमेंट कंपनीस 99 वर्षाच्या लीजवर देण्यात आली. खरे म्हणजे अशाप्रकारे लीजवर जमीन देता येत नाही. तेव्हा ज्या अधिकाऱ्याने हे सर्व केलेले आहे त्याच्यावर कडक कारवाई करणार काय ? तसेच या प्रश्नाची पूर्ण चौकशी होत नाही तोपर्यंत या जमिनीची खरेदी विक्री थाबंविणार काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी सुरुवातीस सांगितले की, हे प्रकरण संशयास्पद वाटते, तेव्हा विभागीय आयुक्तांमार्फत याची चौकशी करण्यात येईल. ज्या अधिकाऱ्याने हे काम केलेले आहे त्याच्यावर कारवाई करण्यात येईल. तसेच या प्रकरणी निर्णय होईपर्यंत खरेदी - व्रिकीस स्टे ऑर्डर दिलेला आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची विक्री होणार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक 10 सप्टेंबर, 2006 रोजी कोकण विभागीय आयुक्तांनी प्रधान सचिवांना पाठविलेले पत्र माझ्याकडे आहे. त्या पत्रात नमूद केलेले आहे की, "उपरोक्त विवेचनावरुन असे दिसते की, तक्रारदार श्री.नरेंद्र कांबळे यांच्या तक्रारीत तथ्य असून प्रश्नांकित जमीन भारत सरकारच्या मालकीची आहे व ही जमीन प्रॉव्हीडंट फंड इन्व्हेस्टमेंट कंपनीकडे देखरेखीकरिता देण्यात आली होती. तथापि, या जमिनीचे भारत सरकारच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरण करण्याचा अधिकार सदर कंपनीस भारत सरकारने दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसत नाही. तसेच सदर कंपनीस या बाबत कळवूनही कंपनीने त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे प्रॉव्हीडंट फंड इन्व्हेस्टमेंट कंपनीस सदर जमीनेचे हस्तांतरित करण्याचा अधिकार नसून त्यासंबंधी जो भाडेपट्टा करार केलेला आहे तो रद्द करावा." तेव्हा पुन्हा चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तेव्हा संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र....46346.....

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेले म्हणणे बरोबर आहे. मी त्यामध्ये एवढेच एक मुद्दा समाविष्ट करतो. तो म्हणजे सदर जमीन ही नागरी जमनी मूळ अधिनियम 1976 च्या कलम 34 खाली होती. म्हणजे यु.एल.सी.खाली चौकशी झालेली आहे. आपणास माहीत आहे की, यु.एल.सी. ॲक्ट रिपिल झाला आहे. तेव्हा मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, सदर प्रकरणी एका आठवड्याच्या आत चौकशी करुन अहवाल दिला जाईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील अभयारण्य, वनीकरण, वनविभाग यामध्ये काम करणाऱ्या रोजंदारी मजूरांना सेवेत कायम करणेबाबत

(2) * 48215 श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती उषाताई दराडे , श्री. सतीश चव्हाण , श्री.विक्रम काळे , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान : तारांकित प्रश्न क्रमांक 44164 ला दिनांक 18 जुलै, 2008 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात अभयारण्य, वनीकरण, वनविभाग व वन्यजीव इ.विभागामध्ये काम करणाऱ्या रोजंदारी वनमजूरांना नियमित करण्यासंदर्भात मा.मंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर सादर केलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आलेला आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्नी भाग (1) मधील प्रकरणी अद्याप निर्णय घेतलेला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.बबनराव पाचपुते : (1) नाही, प्रस्ताव विचाराधीन आहे.

(2) व (3) वनविभाग, सामाजिक वनीकरण विभाग व वनविकास महामंडळाकडून वनमजूरांना नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून मा.मंत्री (वने) यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदर प्रस्ताव तपासून समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, राज्यातील अभयारण्य, वनीकरण, वन विभाग व वन्यजीव इत्यादी ठिकाणी रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांचा प्रश्न आहे. गेली 15-20 वर्षे हे मजूर रोजंदारीवर काम करीत आहेत. तसेच काही ठिकाणी कंत्राट पध्दतीवर काम करीत आहेत. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. आपण कंत्राटी पध्दत बंद व्हावी आणि कामगार सक्षम व्हावा असा विचार करीत आहोत. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहे की, वन्य विभागात रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांना कायम स्वरुपी सेवेत सामावून धेणार काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, वन्य विभागात काम करणाऱ्या मजुरांना कायम स्वरुपी सेवेत सामावून धेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. या संदर्भात दिनांक 7.4.2005 रोजी शासनाने एक समिती नेमलेली आहे. त्या समितीसमोर तो प्रस्ताव जाईल आणि त्यानंतर त्याचा अहवाल मंत्रिमंडळासमोर येईल. मंत्रिमंडळात त्या अहवालाची जरुर नोंद घेण्यात येईल.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.48215....

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, गेल्या तीन अधिवेशनामध्ये मी या संबंधीचा प्रश्न सातत्याने विचारत आहे. सन्माननीय मंत्र्यांनी यापूर्वी मागच्या दोन्ही अधिवेशनात अशी उत्तरे दिली होती की, या संदर्भात तातडीने निर्णय घेण्यात येईल आणि वन कामगारांना कायम करण्यात येईल " आता जे उत्तर देण्यात आलेले आहे ते संदिग्ध स्वरुपाचे आहे. या उत्तरात असे म्हटलेले आहे की," वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग आणि वन विकास महामंडळाकडून वन मजुरांना नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. "- अशाच प्रकारचे उत्तर या पूर्वी देखील देण्यात आले होते. या संदर्भात मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, हा प्रस्ताव केव्हा सादर करण्यात आला होता ? त्याच प्रमाणे या उत्तरामध्ये पुढे असेही म्हटलेले आहे की, " माननीय मंत्री (वने) यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदर प्रस्ताव तपासून समिती समोर सादर करण्यात येत आहे" तेव्हा हा प्रस्ताव या समितीसमोर केव्हा सादर करण्यात येणार आहे आणि या कामगारांना कायम केव्हा करण्यात येणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात शासन अत्यंत पॉझिटीव्ह निर्णय घेत होते परंतु दिनांक 7.4.2005 रोजी एक समिती नेमण्यात आली होती आणि या समितीकडे हे काम देण्यात आले होते. समितीचे काम सुरु असताना श्री.ए.उमरणी विरुध्द रजिस्ट्रार , को ऑप्रेटिव्ह सोसायटीज, तामिळनाडू या राज्याच्या एका प्रकरणात सुप्रीम कोर्टाने असा निर्णय दिला होता की "बॅक डोअर एन्टरी घेऊ नये " असे त्यांनी सर्वांना कळवले होते त्या नुसार राज्य सरकारने एक परिपत्रक काढले होते . अशा प्रकारे परिपत्रक काढल्यानंतरही यातून काही मार्ग काढता येईल काय या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे पुन्हा एक बैठक घेतली होती . सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार एक शासकीय परिपत्रक काढण्यात आले होते आणि हे परिपत्रक काढल्यानंतर पुन्हा या संदर्भात शासकीय अभियोक्ताना बोलावून शासनाने त्यांना असे सांगितले की हे कामगार अनेक वर्षा पासून काम करीत असल्यामुळे त्यांच्या प्रश्नातून मार्ग काढावयाचा आहे .या प्रश्नातून शासनाला मार्ग काढावयाचा असल्यामुळे शासन पुन्हा शासकीय अभियोक्तांकडे गेले होते त्यानंतर त्याच्याकडून शासनाला उत्तर मिळालेले आहे. या प्रकरणी पुन्हा एक बैठक घेण्यात आली होती आता यासंबंधीचा अंतिम प्रस्ताव माझ्याकडे आलेला आहे.हा प्रस्ताव समिती समोर ठेवण्यात येईल आणि त्यानंतर कॅबिनेट समोर तो ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.48215....

श्री.राजन तेली : सभापती महोदय, महाराष्ट्रातील वन कामगारांची संख्या किती आहे आणि किती दिवसात संबंधीचा निर्णय घेण्यात येईल ? बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे.

श्री.बबनराव पाचपुते :सभापती महोदय, पूर्वी कायम केलेल्या कामगाराची यादी वेगळी असून आता आणखी एक यादी तयार करण्यात आली आहे. त्यात तीन प्रकार आहेत त्यातील एक प्रकार वन विभागातील कामगारांचा, दुसरा प्रकार सामाजिक वनरकारण विभागातील कामगारांचा आणि तिसरा प्रकार वन विकास महामंडळातील कामगारांचा आहे. या ठिकाणी सातत्याने काम करणा-या सर्व कामगारांचा प्रस्ताव तयार केलेला आहे. वन विभागात सध्या कार्यरत असलेल्या कामगारांची संख्या 5 हजार 76, सामाजिक वनीकरण विभागात काम करणा-या कामगारांची संख्या 3 हजार 601 असून वन विकास महामंडळात काम करणा्-या कामगारांची संख्या 14 हजार 47 आहे अशा प्रकारे सर्व मिळून 11 हजार 024 कामगार आहेत त्यापैकी शासनाने पूर्वी काही कामगारांच्या बाबतीत निर्णय घेतला असून त्यातील काही कामगार सेवा निवृत्त झाले आहे. आता किती कायम स्वरुपी कामगार लागतील हे तपासून एक यादी तयार करण्यात आली आहे. वन विभागात 8 हजार 420, सामाजिक वनीकरण विभागात 3 हजार 991 कामगार लागणार आहेत या दृष्टीने आता शासन पुढील प्रस्ताव तयार करीत आहोत. त्याच प्रमाणे वन विकास महामडळात 1447 कामगार काम करीत आहेत. त्यांचाही प्रश्न एकत्रितपणे सोडवावयाचा आहे. यासंबंधीचा प्रस्ताव तयार झाल्यानंतर तो समिती समोर ठेवण्यात येईल . त्यामध्ये दोन अडचणी आहेत . या कामगारांना कायम करण्याच्या बाबतीत सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची एक अडचण निर्माण झाली होती परंतु त्यातून मार्ग काढला आहे, या कामगारांना पूर्वीची थकबाकी आणि आताचे जे पैसे द्यावयाचे आहेत त्याबाबतीत पुन्हा शासनाला चर्चा करावी लागेल त्या कामगाराना नियमित कामावर घेतले तर 99 कोटी 96 लाख म्हणजे जवळजवळ एक कोटी रुपये लागणार आहेत त्याचबरोबर 1994 सालापासून मागचे सर्व ॲरिअर्स द्यावयाचे असे तर 780 कोटी रुपये लागणार आहेत तेव्हा पैशाचा विषय असल्यामुळे या संदर्भात एकत्र बसून चर्चा करुन निर्णय घ्यावा लागेल. त्यासबंधी चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे त्याचप्रमाणे् या कामगारांना कायम करण्यासंबंधीचा निर्ण्य लवकरात लवकर घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील वन मजुरांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. बुलढाणा जिल्हयातील वन कामगारांच्या संदर्भात देखील प्रश्न आहे. अधिका-यांच्या बेपवाईमुळे त्यांचा प्रस्ताव पाठविण्यास थोडासा उशीर झाला असलयामुळे असे सांगण्यात आले होते की, हा प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्यामुळे त्यातील कामगारांचा समावेश करता येणार नाही तेव्हा बुलढाणा जिल्हयातील वन मजुरांचा समावेश त्या प्रस्तावात करण्यात येईल काय ?

श्री.बबनराव पाचपुते :सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन .

नंतर श्री.सुंबरे

.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 48215 .....

श्री. अरूण गुजराथी : सभापती महोदय, हा अतिशय प्रलंबित राहिलेला असा प्रश्न आहे. गेल्या दीड दोन वर्षांपासून या प्रश्नावर शासनाकडून समाधानकारक असे उत्तर मिळत नाही. या संदर्भात माननीय मंत्री महोदयांची भेट घेऊन, त्यांच्याकडे शिष्टमंडळ वगैरे नेऊन देखील काही उपयोग झालेला नाही. तेव्हा आता तरी शासनाने या संदर्भात निर्णय घेऊन एका विशिष्ट कालावधीत म्हणजे एक, दोन वा तीन महिन्याच्या कालावधीत या सर्व कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करणार आहात काय ? त्यांच्या थकबाकीच्या देय रकमांबाबत वाटल्यास नंतर निर्णय घेतला तरी चालेल, पण त्यांना कायम करण्या संबंधातील निर्णय आपण निश्चित किती मुदतीत घेणार आहात?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आपण शक्य तितक्या लवकर हा विषय संपविणार आहोत. या संदर्भात या कर्मचाऱ्यांच संघटनांबरोबर चर्चा करावयाची आहे, त्यांच्या पूर्वीच्या थकबाकी संबंधात वगैरेबद्दल चर्चा करावी लागणार आहे. तेव्हा शक्य तितक्या लवकर हा प्रश्न निश्चितपणे निकाली काढण्यात येईल इतकेच मी या प्रसंगी आपल्याला सांगू इच्छितो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा ....)

सभापती : मी माननीय वन मंत्र्यांना सांगू इच्छितो की, हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असून या संबंधात सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. मी हा प्रश्न राखून ठेवत नाही पण या प्रश्नाच्या अनुषंगाने मुंबईमध्ये संबंधित सन्माननीय सदस्यांसह माझ्या दालनामध्ये आपण एक बैठक निश्चितपणे घेऊ आणि हा प्रश्न सोडविण्याच्यादृष्टीने यशस्वी प्रयत्न करू.

श्री. बबनराव पाचपुते : ठीक आहे.

***

..... जे 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या कर्जमाफीबाबत

(3) * 46720 श्री.सय्यद पाशा पटेल, श्री. अरविंद सावंत, श्री. दिवाकर रावते, डॉ. निलम गोऱ्हे, श्री.परशुराम उपरकर, श्री. किसनचंद तनवाणी, श्री. गोपीकिसन बाजोरिया, श्री. सुरेश जेथलिया : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) केंद्र शासनाच्या कर्जमाफीचा राज्यातील 37 लाख शेतकऱ्यांना फायदा मिळाला असला तरी सहकार विभागाकडील शेतकरी अद्यापी कर्ज माफीच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, यासाठी शासन कोणती उपाययोजना करीत आहे वा करण्यात येणार आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : (1) नाही.
(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये या प्रश्नासंबंधात माहिती देताना माननीय सहकार मंत्र्यांनी असे लेखी उत्तर दिले आहे की, महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांची 12 हजार कोटी रूपयांची कर्जमाफी होणार होती. परंतु केवळ 7 हजार कोटी रूपयांचीच कर्जमाफी आम्ळी केलेलीआहे. सभापती महोदय, अशी वस्तुस्थिती असतानाही माझ्या पहिल्या प्रश्नाला येथे 'नाही' असे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे. यामध्ये विषय असा आहे की, शेती संबंधातील पदस्था, नागरी बँका यांच्याकडून अजूनपर्यंत शेतकऱ्यांना कर्ज मिळालेले नाही. सहकार विभागाच्या वतीने आपण या बाबतीत काही निर्णय करणार आहात का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, केंद्र सरकारकडून जी कर्जमाफी झाली त्यात राज्यातील 37 लाख 82 हजार शेतकऱ्यांचे 7,871 कोटी रूपयांचे कर्ज माफ झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न येथे उपस्थित केला आहे त्याला मी 'नाही' असे म्हटले आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे असा प्रश्न विचारला होता की, केंद्र सरकारच्या कर्जमाफीचा राज्यातील 37 लाख शेतकऱ्यांना फायदा मिळाला असला तरी सहकार विभागाकडील शेतकरी अद्यापी कर्जमाफीच्या प्रतिखेत आहेत हे खरे आहे काय ?' त्याला मी 'नाही' असे म्हटले आहे. कारण केंद्र सरकारची जी कर्जमाफीची योजना होती ती 5 एकराच्या आतील शेतकऱ्यांसा ठी होती आणि या सदनामध्ये वारंवार सांगण्यात आले होते की, राज्य सरकार देखील या संदर्भात आपली स्वत:ची योजना तयार करीत असून ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे व लवकरात लवकर या बाबतीतील सकारात्मक असे राज्य सरकारचे धोरण आम्ही जाहीर करू.

..... जे 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46720 ....

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे तर हा निर्णय शासन किती दिवसात करणार आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यासंबंधातील सर्व माहिती एकत्रित करण्याचे काम आमच्या विभागाकडून चालू आहे. 31 मार्च पूर्वीचे जे शेतकरी आहेत त्यांची माहिती, तसेच पतसंस्थांकडून घेतलेल्या कर्जाची माहिती आम्ही गोळा करी आहोत. ही सगळी माहितीचे संकलन झालेले आहे व लवकरच या संबंधात आम्ही निर्णय घेण्याचा प्रयत्न करू.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना हा प्रश्न गांभीर्याने घेतलेला आहे असे गृहीत धरून मी प्रश्न विचारणार आहे. पहिल्या पॅकेजनंतर 3052 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. पंतप्रधान पॅकेज नंतर 3082 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत आणि कर्जमाफीनंतर 632 आत्महत्या झालेल्या आहेत. ....

(यानंतर श्री. सरफरे .... के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46720...

श्री.दिवाकर रावते...

कर्जमाफी दिल्यानंतर देखील 732 शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्या, आणि आत्महत्त्यांचे प्रमाण सुध्दा वाढत आहे. त्यांची कारणमीमांसा मी करीत नाही. याठिक्राणी असा प्रश्न निर्माण झाला आहे की, आपण वारंवार याठिक्राणी कर्जमाफीबाबत धोरण जाहीर करता. आपण याठिक्राणी 37 लाख 82 हजार शेतकऱ्यांकरिता 7871 कोटी प्राप्त झाल्याचे सांगितले. 37 लाख खातेदारांसाठी तेवढे कर्ज द्यावयाचे होते काय? जेवढे प्राप्त झाले त्यापेक्षा जास्त देण्याची आवश्यकता होती काय? आपल्याला 12 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी मिळाली असे आपण या सभागृहात सांगितले. राहिलेले 5 हजार कोटी रुपये आपण कुणाला दिले? त्याचा आपण हिशेब दिला तर बरे होईल. दुसरा प्रश्न असा की, 5 एकरापर्यंत कर्जमाफी देण्याचा केंद्र शासनाचा निर्णय होता. परंतु संपूर्ण कर्जमाफी देण्यासंबंधी आपण गेल्या दीड वर्षापासून विचार करीत आहात. त्यामुळे शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत. म्हणून मला आपणास विचारावयाचे आहे की, एकूण कर्जमाफीची रक्कम किती? कर्जमाफीच्या रकमेमधून किती कर्जमाफी करण्याची आवश्यकता आहे? संपूर्ण कर्जमाफी करण्यासाठी राज्य शासन अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणार आहे असे आपण जाहीर केले होते. तेव्हा उद्याच्या अर्थसंकल्पामध्ये त्याकरिता तरतूद करुन तातडीने ही कर्जमाफी केली जाईल काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय डॉ. पतंगराव कदम हे सहकार मंत्री असतांना त्यांनी 12 हजार कोटींच्या कर्जमाफीचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकेल असे सांगितले होते. परंतु केंद्र सरकारकडून परिपत्रक आले, त्या परिपत्रकाप्रमाणे त्यांनी कर्जमाफीचे निकष ठरविले. त्याप्रमाणे 37 लाख 81 हजार शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र झाले आणि 7739 कोटींच्या कर्जमाफीला ते पात्र झाले. ती रक्कम केंद्र सरकारने मंजूर केली आहे.तसेच, 50 टक्क्यापेक्षा अधिक रक्कम ही त्या त्या संबंधित बँकाकडे जमा होत आहे, काही ठिक्राणी जमा झाली आहे.दुसरा प्रश्न असा उपस्थित करण्यात आला. त्याबाबत राज्य सरकारने ही भूमिका वारंवार स्पष्ट केली आहे. ही केंद्र सरकारची योजना आहे. राज्य सरकारने याबाबत केलेली योजना अंतिम टप्प्यात आली असून लवकरच या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन राहिलेल्या शेतकऱ्यांना सुध्दा मदत देण्याची भूमिका राहणार आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, याठिक्राणी मंत्रिमहोदयांनी विदीत केले की, राज्य सरकारच्या अंतर्गत विचार सुरु आहे. त्याबाबतचा आपण नेमका तपशील याठिकाणी सांगितला तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

ता.प्र.क्र. 46720...

श्री. अरुण गुजराथी....

बरे होईल. या मध्ये किती शेतकऱ्यांना किती कोटी रुपयांचा लाभ झाला? आणि किती कालावधीत या योजनेची शासन कार्यवाही करणार आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या राज्यातील 1 कोटी 18 लाख शेतकऱ्यांपैकी 20 ते 25 लाख शेतकरी कर्ज घेत नाहीत.. 80 लाख शेतकऱ्यांपैकी जे कर्जदार शेतकरी 5 एकराखालील आहेत त्यांची संख्या 37 लाख आहे. त्यांचा विषय आता संपला आहे. आणि राहिलेले जे शेतकरी आहेत त्यामध्ये 31.3.1997 पूर्वी ज्यांनी कर्ज घेतले होते ते केंद्र सरकारच्या कर्जमाफी धोरणात बसत नव्हते.म्हणून माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, या राज्य शासनाच्या योजनेमध्ये कोणकोणत्या शेतकऱ्यांचा विचार करणार आहात? तेव्हा याबाबत सांगू इच्छितो की, 31.3.1997 पूर्वी ज्यांनी कर्ज घेतले आहेत व जे कर्जमाफीमध्ये बसले नाहीत त्यांचे कर्ज माफ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. दुसरे असे की, 2002 ला ज्यांच्या कर्जाचे पुनर्गठन झाले आणि ज्या शेतकऱ्यांनी या पुनर्गठनामध्ये सहभाग घेतला. ज्यांनी पहिला हप्ता भरला आहे,त्यांचा दुसरा हप्ता भरण्याबद्दल सरकार विचार करीत आहे. त्याचप्रमाणे ज्यांनी फिशरीजकरिता आणि दूध डेअरीसाठी कर्ज घेतले आहे. त्या संदर्भात देखील शासन विचार करीत आहे. त्याचप्रमाणे फ्लॉरिकल्चरकरिता सुध्दा आम्ही विचार करीत आहोत. त्याचप्रमाणे ज्यांनी बँकाकडून किंवा पतसंस्थाकडून कर्ज घेतले आहे. त्या पतसंस्थांच्या बायलॉजमध्ये 2006 मध्ये आपण नोटिफाय केले होते की, तुम्ही शेतीसाठी कर्ज उपलब्ध करुन द्यावे. अशा अनेक बाबी यामध्ये आहेत. त्या सर्व बाबी तपासून अंतिम प्रस्ताव तयार होत आहे. म्हणून मी या सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, राज्य सरकार याबाबत सकारात्मक निर्णय घेईल आणि कर्जमाफीबाबत शेतकऱ्यांना मदत करील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी मंत्रिमहोदयांनी 57 लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा झाल्याचे सांगितले. केंद्र सरकारने कर्जमाफी जाहीर केली त्यावेळी 30 जूनच्या आत नव्याने कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज उपलब्ध करुन दिले जाईल असे सांगितले होते.

(यानंतर बरवड)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

पण माझा असा मुद्दा आहे की, ज्या शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा लाभ देतो त्या शेतकऱ्यांना अनेक बँकांनी नव्याने कर्ज उपलब्ध करुन दिलेले नाही. शेतकरी बँकांकडे खेटे घालतात परंतु खरिपाचे पीक गेल्यानंतरही त्यांना कर्ज मिळालेले नाही. रब्बीच्या हंगामात कर्ज देऊ असे सांगतात परंतु अजून कर्ज मिळालेले नाही. ज्या मल्टीस्टेट नागरी सहकारी बँका आहेत त्यांच्याकडून आपल्या जिल्हा उपनिबंधकांनी पाच एकराच्या आतील शेतकऱ्यांचे कर्जमाफीचे प्रस्ताव मागितले होते परंतु त्या बँकांनी प्रस्ताव पाठवले नाहीत. या बँकांशी संबंधित शेतकऱ्यांना अजूनपर्यंत या योजनेचा लाभ मिळालेला नाही. आपल्या योजनेमध्ये त्याबाबत विचार करणार काय ? सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी जे सांगितले त्या पध्दतीने या ज्या मल्टीस्टेट नागरी सहकारी बँका आहेत, तत्कालीन सहकार मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी सांगितले होते की, यामध्ये पतसंस्था समाविष्ट आहेत पण कोणत्या पतसंस्था यामध्ये समाविष्ट आहेत हे आजपर्यंत देखील त्यांच्या लक्षात आले नाही. मल्टीस्टेट नागरी सहकारी बँकांकडून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे जे प्रस्ताव मागितले त्यासंबंधी शासनाचे काय धोरण आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. याबाबत मी सुध्दा माहिती घेतली. केंद्राच्या योजनेमध्ये ज्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले अशा बऱ्याच शेतकऱ्यांना बँकांकडून नव्याने कर्ज वाटपाच्या बाबतीत दिरंगाई झाली, ही गोष्ट खरी आहे. म्हणून संबंधित जिल्हा मध्यवर्ती बँका असतील किंवा ज्या ज्या लीड बँका असतील त्या बँकांना आजच सूचना देण्यात येतील आणि कर्जमाफीमध्ये जे शेतकरी पात्र झालेले आहेत त्यांना जरुर त्यांच्या गरजेनुसार कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत माझा विभाग प्रयत्न करील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बँकांचे अधिकारी उद्धटपणे वागतात. ते आमचे फोन घेत नाहीत एवढे ते मस्तावले आहेत. त्या बँकांच्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, जर आपण फोन केल्यानंतर कोणतीही बँक आपला फोन घेत नसेल तर त्या बँकेचे नाव मला सांगावे. आपल्याला पुन्हा हे सभागृहात सांगण्याची पाळी येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे अटाली (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथे ६० फूट उंच असलेली मातीची दरड घरावर कोसळून २ मुलांचा मृत्यू व १० जण गंभीर जखमी झाल्याबाबत

(४) * ४७८८९ श्री.अरुण गुजराथी , श्री. जितेंद्र आव्हाड , डॉ. एन. पी. हिराणी : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अटाली (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथे ६० फूट उंच असलेली मातीची दरड घरावर कोसळून २ मुलांचा मृत्यू व १० जण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक १७ सप्टेंबर, २००८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नैसर्गिक आपत्तीत मृत झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. सतीश पाटील, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता : (१) दिनांक १५.९.२००८ रोजी सदर घटना घडली असून त्यामध्ये २ मुलांचा मृत्यू व ९ व्यक्ती जखमी झाल्या हे खरे आहे.

(२) व (३) होय, तहसीलदार, खामगांव यांचेमार्फत केलेल्या चौकशीनुसार इक्बाल अहमद यांचे खाजगी मालकीच्या जागेतील मातीच्या गढीचा भाग कोसळून तो सलाम भोरुमिया यांचे घरावर पडल्याने कुटूंबातील २ मुले मृत्यूमुखी पडली तसेच ९ व्यक्ती जखमी झाल्याचे निदर्शनास आले. पंचनाम्यानुसार सुमारे २० ते २५ हजाराचे नुकसान झाल्याचे आढळून आले. सदर घटना अपघात असून नैसर्गिक आपत्तीच्या निकषामध्ये मोडत नसल्याने मदत देण्यात आलेली नाही. मात्र भोरुमिया यांचे कुटूंब निराधार झाल्याने रुपये १,०००/- प्रमाणे कमाल ५ व्यक्तिंच्या मर्यादेच्या निकषाप्रमाणे रुपये ५,०००/- चे सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, ही घटना नैसर्गिक आपत्ती नसून अपघात होता असे म्हटले आहे. नैसर्गिक आपत्ती आणि अपघात यासाठी कोणते निकष लावतो ? यामध्ये अत्यंत गरीब कुटुंबाची दुर्दशा झालेली आहे. यामध्ये 2 मुलांचा मृत्यू झालेला आहे आणि 9 व्यक्ती जखमी झालेल्या आहेत. त्यांना ही रक्कम वाढवून देणार काय किंवा मुख्यमंत्री निधीतून त्यांना मदत देणार काय ?

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, ती एक मातीची गढी होती. ती गढी शेजारच्या घरावर पडल्यामुळे हा अपघात झालेला आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमध्ये अतिवृष्टी, पूर, गारपीट, आकस्मिक आग, चक्रीवादळ, दरड कोसळणे इत्यादी बाबी येतात. हा अपघात असल्यामुळे ही घटना त्यामध्ये बसत नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केलेली आहे त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव आला तर त्याचा विचार केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 47889.....

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांचे लक्ष एका गोष्टीकडे वेधू इच्छितो की, या गढीची उंची 60 फूट दिलेली आहे. मजल्यांचा विचार केला तर 60 फूट म्हणजे 6 मजले होतात. 6 मजल्याची गढी बाजूला पडली असेल तर सहा मजल्याची गढी उभारणे आणि ती बाजूला पडणे ही नैसर्गिक घटना आहे. 60 फुटाची गढी पडणे म्हणजे 6 मजल्यांची इमारत कोसळण्यासारखे आहे. जे मुंबईला राहतात त्यांना मजले लवकर कळतात. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. या घटनेला अनैसर्गिक घटना किंवा अपघात म्हणून नका. ही बाब नैसर्गिक आपत्तीखाली घेऊन त्या गरीब कुटुंबाला मदत करणार काय ?

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितलेली परिस्थिती खरी आहे परंतु ही 60 फुटाची मातीची गढी होती. माती आणि दरड यामध्ये फरक असल्यामुळे ही बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये येत नाही. तरी सुध्दा झालेले नुकसान लक्षात घेता जरी ही बाब त्यामध्ये बसत नसली तरी त्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव मागवून त्यांना मदत देण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्या तालुक्यातील हे गाव असल्यामुळे मी त्या गावाला भेट दिलेली आहे. ही नैसर्गिक आपत्ती नसली तरी त्या गावामध्ये 150-200 वर्षापूर्वीच्या गढया आहेत. या प्रकरणामध्ये 2 मुले मृत्यूमुखी पडलेली असल्यामुळे जिल्हाधिका-यांकडून प्रस्ताव मागविण्यापेक्षा मंत्रिमहोदयांनी सभागृहात मदतीची घोषणा करावी.

डॉ.पतंगराव कदम : खास बाब म्हणून मुख्यमंत्री निधीतून मृतांच्या कुटुंबियांना शासनावतीने मदत केली जाईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील क्रमांक 5 हा सेझच्या संदर्भातील महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नासाठी प्रश्नोत्तराचा वेळ वाढवावा अशी मी विनंती करते.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये सभागृहामध्ये प्रस्ताव दिल्यावर त्यातील विषय नियम 289 मध्ये कसा बसतो हे सांगण्याचा प्रयत्न केला जातो. असे प्रस्ताव अनेकवेळा सभागृहात उपस्थित होतात. मी देखील अनेकवेळा प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ वाढवून दिलेली आहे. परंतु यापुढे प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ न वाढविण्याचा मी निर्णय घेतला आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टीने एका महत्वाच्या विषयाकडे सभागृहाचे आणि आपले लक्ष वेधू इच्छितो.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना बोलण्याची मी परवानगी दिलेली नाही. आपण खाली बसावे.

श्री.जितेंद्र आव्हाड : एकीकडे आपण देशाच्या सुरक्षिततेच्या गोष्टी करीत आहेत.....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड आपण जबाबदार सदस्य आहात.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, शनिवार, 20 डिसेंबर, 2008 च्या 'लोकमत' या वर्तमानपत्रात अशी बातमी आली आहे की, जर पुन्हा कंदहार विमान अपहरणासारखी एखादी घटना घडली आणि चाचांनी निरपराध ओलितांच्या मुक्ततेसाठी अतिरेक्यांना सोडण्याची मागणी केली तर पुन्हा अतिरेक्यांना सोडून देऊ, असे माजी विदेश मंत्री श्री.जसवंतसिंग यांनी म्हटले आहे. 166 विमान प्रवाशांच्या मुक्ततेच्या मोबदल्यात मसूद अजहर व त्यांच्या दोन साथीदारांना घेऊन श्री.जसवंतसिंग खास विमानाने कंदहारला गेले होते....

सभापती : सभागृहाचा डेकोरम ठेवावयाचा असेल तर माझी परवानगी घेतल्याशिवाय सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना बोलता येणार नाही. आपण एखाद्याच्या नावाचा उल्लेख करणे हे देखील बरोबर होणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याबाबत आपण निर्णय द्यावा.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी माझ्या परवानगीशिवाय बोलू नये असे आपण त्यांना सांगितले आहे. त्यानंतरही त्यांनी आपले वक्तव्य सुरु ठेवले आहे.....

(सत्तारुढ पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बसून घोषणा देत असतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना आपण ताकीद द्यावी.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी आणि इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत बसावे. मी कोणालाही बोलण्याची परवानगी दिलेली नाही.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्तारुढ पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बसून घोषणा देत असतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना आपण ताकीद द्यावी. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना बोलू नका असे आपण सांगितले असतानाही ते बोलले. मिडियाच्या गॅलरीला आकर्षित करण्याचा त्यांचा नेहमी प्रयत्न असतो. हे आजच नाही तर अनेकदा घडलेले आहे. आपण त्यांचे सर्व वक्तव्य कामकाजातून काढून टाकावे आणि त्यांना ताकीद द्यावी.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हे माझ्या परवानगीशिवाय बोलले आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला व कोणत्याही सन्माननीय सदस्यांना माझ्या परवानगीशिवाय बोलता येणार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांचे वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकावेत.

सभापती : माझ्या परवानगी घेतल्याशिवाय या सदनामध्ये कोणत्याही सन्माननीय सदस्यांना बोलता येणार नाही. असे असताना सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी परवानगी न घेताच बोलण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांचे वक्तव्य रेकॉर्डवरुन काढत आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा पॉईन्ट प्रोसिजर आहे. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड आपल्या परवानगीशिवाय बोलल्यामुळे त्यांचे वक्तव्य रेकॉर्डवरुन काढतो असा निर्णय दिला. परंतु त्याचवेळी श्री.विनोद तावडे हे बोलता बोलता असे म्हणाले की, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हे नेहमी प्रेसला इम्प्रेस करण्याचा प्रयत्न करीत असतात. आपल्या निर्णयानंतर त्यांनी हे वक्तव्य केले असल्यामुळे त्यांचेही भाष्य रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी माझ्या निर्णयानंतर केलेले भाष्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग व संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितचा सन 2006-2007 व 2007-2008चा अनुक्रमे पाचवा व सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन 2007-2008चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई (बृहन्मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन 1998-1999, 1999-2000, 2000-2001 व 2001-2002 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, एक गोष्ट सातत्याने निदर्शनास येते की, या ठिकाणी विविध महामंडळांचे अहवाल 10-15 वर्षानी सादर केले जातात. मागील वेळेस याबाबतीत आक्षेप घेतल्यानंतर आपण समज दिली होती. कापड बाजार आणि दुकाने मंडळ याचा 1998-1999चा अहवाल आता 10 वर्षानंतर सादर केला जात आहे. तेव्हा हे अहवाल वेळेवर सभागृहाला सादर का करण्यात आले नाहीत यासंबंधी संबंधीतांकडून खुलासा घ्यावा आणि मगच हे अहवाल सादर करण्यास परवानगी द्यावी.

श्री. नितीन गडकरी : काही अहवाल उशीराने सादर केले जातात तर काही अहवाल सभागृहाला सादरच केले जात नाहीत. आपणाकडे सीएजीचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही. ही सरकारची जबाबदारी नाही, हा आपल्या विधिमंडळाच्या सिस्टिमचा एक भाग आहे. या सभागृहाला कोणते अहवाल अपेक्षित आहेत आणि त्यापैकी कोणते अहवाल सभागृहाला सादर झालेले नाहीत आणि ते का सादर झालेले नाहीत याची माहिती विधिमंडळ सचिवालयाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी....)

सचिवांनी प्रत्येक अधिवेशनात द्यावयास पाहिजे. जे अडचणीचे अहवाल असतात ते गायब केले जातात. सीएजीचा अहवाल गायब केला गेला. तेव्हा हे अहवाल सभागृहासमोर आले पाहिजेत. अहवाल येणे आणि न येणे याबाबतीत विधिमंडळाच्या सचिवांवर जबाबदारी सोपवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, एस.टी.चा अहवाल प्रसिध्द झाला. त्यामध्ये 500 कोटीचे नुकसान दाखविलेले आहे. अहवालामध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस आणलेला आहे. त्या अहवालामध्ये ज्या ज्या काही शिफारशी केलेल्या आहेत त्या शिफारशींची अमलबजावणी होते की नाही हे देखील समजत नाही. या अहवालावर सभागृहामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आम्ही कमिट्यामध्ये आय.ए.एस. अधिका-याबरोबर चर्चा करतो, दौ-यावर जाऊन सर्व माहिती घेतो. तेव्हा माझी या निमित्ताने आपणास विनंती आहे की, आपण या अहवालावर चर्चा करण्याचा नियम करावा.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांची अत्यंत महत्वाची सूचना केलेली आहे. त्यांनी सातत्याने याबाबतीत पाठपुरावा केलेला आहे. कामगार विभागाला मी सांगेन की, आज या ठिकाणी सादर केलेला अहवाल विलंबाने का सादर करण्यात आला याची आणि या अहवालामध्ये दंडात्मक आणि महत्वाच्या बाबी काय आहेत यासंबंधीची माहिती द्यावी. तसेच यानुषंगाने जो कोणी संबंधित अधिकारी जबाबदार असेल त्याच्यावर कारवाई करावी.

श्री. नवाब मलिक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी महत्वाचा मुद्दा या ठिकाणी मांडलेला आहे. हे अहवाल या ठिकाणी येत असताना विधानमंडळ सचिवालयाचे सचिव किंवा प्रधान सचिवांनी सुध्दा यासंबंधीची खबरदारी घ्यावी की, अधिवेशनात कोणते अहवाल या सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आहेत? अधिवेशनात किती अहवाल सादर झाले ? किती अहवाल सादर करावयाचे राहिले आहेत ? या अनुषंगाने काळजी घेतली तर असे प्रसंग उद्भवणार नाहीत, तरी यापुढे यासंबंधीची काळजी जरुर घेण्यात यावी.

सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी या सभागृहासमोर विविध मंडळाचे अहवाल सादर करण्यात येतात, त्या अहवालावर सभागृहात चर्चा होणे गरजेचे आहे अशा प्रकारची सूचना केली. मला वाटते की, पूर्वी अशी परंपरा आणि पायंडा होता की, काही निवडक दोन,तीन मंडळे निश्चित केली जावयाची व त्यांच्या अहवालावर चर्चा केली जात होती. परंतु अलिकडच्या काळात तशी चर्चा केली जात नाही. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्या सूचनेबाबत जरुर लक्ष घातले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, कामगार मंडळाचे गेल्या दहा वर्षापूर्वीचे अहवाल आता सादर केले जात आहेत. कामगार मंडळावर अनेक वर्षापासून सदस्यांच्या नियुक्त्या झालेल्या नाहीत. सदरहू मंडळाचे अहवाल अधिकारीवर्ग अहवाल तयार करीत असतात. सदर मंडळावर सदस्यांच्या नेमणूका होत नसल्यामुळे कापड दुकानदार आणि व्यापा-यांची हिताची जपणूक अधिका-यांनाकडून केली जात नाही. म्हणून कामगार मंडळावर सदस्यांच्या नेमणूका तात्काळ व्हाव्यात अशा प्रकारचे आदेश कामगार मंत्र्यांना द्यावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती : कामगार मंडळावर सदस्य नेमण्यासंबंधी कामगार विभागाने जरुन लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, 31 जानेवारी, 2009 पर्यंत सर्व कामगार मंडळावरील सदस्यांच्या नेमणूका करण्यात येतील.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा सन 2007-08 चा पन्नासावा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. अरुण गुजराथी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम समितीचा अहवाल सादर करतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या गॅलरीतील आसन व्यवस्थेबाबत

श्री. भास्करराव जाधव : सभापती महोदय, या सभागृहात माननीय राज्यपालांची गॅलरी, आजी,माजी आमदारांसाठी गॅलरी, अधिका-यांसाठी गॅलरी, प्रेक्षक गॅलरी ठेवण्यात आली आहे. कोणत्या गॅलरीत कोणी बसावे यासंबंधी आसन व्यवस्था निश्चित करुन देण्यात आलेली आहे. परंतु आता आजी, माजी आमदारांसाठी असलेल्या गॅलरीमध्ये अधिकारी वर्ग बसलेला आहे. यावरुन मला अशी शंका येऊ लागली आहे की, सदरहू गॅलरी आजी,माजी सन्माननीय सदस्यांसाठी आहे की, अधिका-यांसाठी आहे. आजी,माजी आमदारांसाठी निश्चित कोणती गॅलरी ठेवण्यात आली आहे याची माहिती मिळाली तर माझ्या ज्ञानात भर पडेल. आजी,माजी आमदारांच्या गॅलरीत यापुढे अधिकारी बसणार नाहीत यासंबंधीची दक्षता घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे.

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नियम स्थगित ठेवणे.

मु.शी.: नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये सुधारणा करण्याची नोटीस देण्यासंबंधात नियम समितीचा प्रस्ताव.

श्री. अरुण गुजराथी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषद नियम समितीच्या आज दिनांक 22 डिसेंबर, 2008 रोजी सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये सुधारणा करयाची नोटीस देण्यासंबंधातील विधानपरिषद नियमातील नियम 219 (1) व 219 (3) मधील दहा दिवसांच्या मुदतीची जी तरतूद आहे ती नियम 289 अन्वये स्थगित करण्यात येऊन सदरहू मुदत उक्त अहवालाच्या बाबतीत तीन दिवसांची करण्यात यावी, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियत 93 अन्वये सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "रायगड जिल्हयात अनुसूचित जमातीची लोकसंख्या सुमारे 2.69 लाख असून शासनाच्या धोरणानुसार आदिवासी प्रकल्पात आदिवासी उपयोजनेद्वारे जिल्हयात केवळ 40 हजार आदिवासींनाच लाभ देण्यात येत असल्यामुळे अनेक आदिवासी शासकीय योजनेपासून वंचित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल यांनी "खामगांव कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत अनेक गैरप्रकार झाले असून सहाय्यक निबंधक यांनी अनेक पक्षपाती निर्णय घेऊन एकाच पॅनलला निवडणुकीत विजय मिळेल यासाठी केलेले प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे यांनी "राज्यातील कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याबाबत, शिक्षकेतरांच्या आकृतिबंधाबाबत पदे मंजूर करण्याबाबत, अनुदानित संस्थांचे वेतनेतर अनुदान देण्याबाबत तसेच अनुदानित शाळांप्रमाणे विना अनुदानित शाळांमधील मुलांना पोषण आहार न मिळण्याबाबत राज्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी शासनाविरुध्द सुरु केलेले आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "राज्यात सोयाबीन काढणीच्या अगोदर बाजारामध्ये त्याचा भाव 2700 ते 3000 रुपये असणे, शेतकऱ्यांनी बाजारात सोयाबीन नेल्याबरोबर त्याचा दर 1300 ते 1500 रुपये होणे, यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होऊन त्यांच्यात पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "अलिकडच्या काळात मोठया प्रमाणात मत्स्य दुष्काळाचे सावट पसरल्याने याचा विपरित परिणाम मच्छिमारांच्या व्यवसायावर झाल्याने त्यांना जोड व्यवसाय उपलब्ध करुन देणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांनी "मे.ॲटलास या कंपनीने बोगस व बनावट कागदपत्रांच्या आधारे राज्यात अनेक जिल्हयात वाहतूक निविदेत भाग घेणे, शासनाने सदर कंपनीस काळया यादीत टाकूनही अकोला जिल्हयातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा धान्य वाहतुकीचा परवाना या कंपनीस देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनावणे यांनी "केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाच्या राज्यमंत्र्यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भात विद्यापीठ आयोगाने शिफारस केलेली व केंद्र शासनाने संमत केलेली सुधारित वेतनश्रेणी राज्यातही लागू करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल यांनी "दि. 18.12.2008 रोजी यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील बोरगाव येथील काही शेतकऱ्यांनी शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करु न शकल्याने आणि त्यांची आर्थिक कोंडी झाल्याने केलेली आत्महत्त्या " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री पांडुरंग फुंडकर यांनी "पांढरकवडा येथील कापूस संकलन केंद्रावर गेल्या 3 दिवसांपासून 650 वाहने व सुमारे 1000 बैलगाड्या कापूस तोलाईच्या प्रतिक्षेत असून त्यांची तोलाई न झाल्यामुळे चाऱ्यावाचून बैल तर अन्नावाचून शेतकरी गारठणाऱ्या थंडीत उपाशीपोटी राहणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. व्ही. यू. डायगव्हाणे यांनी "वर्धा जिल्ह्यातील स्व. बापूरावजी देशमुख सहकारी साखर कारखाना यांनी सन 2006-07 या गळीत हंगामात शेतकऱ्यांच्या ऊसाला रु. 1000 प्रति मे.टन. द्यावयाचा असताना रु. 850 दिल्याने उर्वरित रु. 150 प्रति मे.टन प्रमाणे द्यावयाच्या थकबाकी अद्यापही न देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, दिवाकर रावते, यांनी "रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील देवकान्हे या गावात गावठी दारु पिऊन सुमारे 4 आदिवासींना मृत्यू होऊन सुमारे 70 जण गंभीर असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. ही नियम 93 ची चर्चा मी स्वीकारली असती परंतु मघाशीच प्रश्नोत्तराच्या तासात यासंबंधीची चर्चा नियम 289 अन्वये झाली व त्याच वेळेस मी सांगितले की, आजच सायंकाळी 5 ते 7 वाजेपर्यंत या विषयावर चर्चा घेण्यात येईल. म्हणून मी ही नियम 93 अन्वये आलेली सूचना स्वीकारत नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "राजेंद्र दावजी धुर्वे रा. आंबोरा, ता. कारंजा, जि. वर्धा या शेतकऱ्याच्या शेतजमिनीत त्याने लावलेल्या सागवान झाडांची वन विभागाने तोडण्याची परवानगी दिली असणे, सदर सागवानी लाकडाचा लिलाव करण्यात येऊन विक्री झालेल्या सागवान लाकडाची रक्कम वन विभागाकडे मागणी करुनही ती न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "राज्यात चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात एकूण जंगलाच्या 20 टक्के जंगल असणे, या जंगलात आदाणी कोळसा खाणीमुळे 1750 हेक्टर जंगल नष्ट होणार असून ताडोबा व्याघ्र प्रकल्पही संकटात येत असून सदर प्रकल्पाला असलेला जनतेचा विरोध " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित सूचना मी दालनातच नाकारलेल्या आहेत.

तसेच या अनुषंगाने मी शासनाला देखील असे निदेश देऊ इच्छितो की, यापुढील काळात शासनाने सभागहात करावयाची निवेदने तातडीने करावीत. कारण जर तातडीने निवेदने केली तर यापूर्वी उपस्थित झालेल्या सर्व नियम 93 च्या सूचनांची निवेदने शेवटच्या आठवडयात होऊ शकतात, म्हणून यासंबंधीची काळजी घेण्यात यावी.

.....3

अशुद्धीरित प्रत / शुद्धीपत्रीय नाही

पृ. शी. : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतल्या जाणाऱ्या लघुलेखक या पदाचा निकाल लागण्यास होत असलेला विलंब

मु. शी. : "महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतल्या जाणाऱ्या लघुलेखक या पदाचा निकाल लागण्यास होत असलेला विलंब " याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनावणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील (सामान्य प्रशासन राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनावणे, वि. प. स. यांनी "महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतल्या जाणाऱ्या लघुलेखक या पदाचा निकाल लागण्यास होत असलेला विलंब " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ KTG/

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना प्रथम धन्यवाद देऊ इच्छितो. मी सभागृहात महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे इंग्रजी लघुलेखकांच्या रिक्त जागा भरण्याच्या संदर्भात व निकाल वेळेवर जाहीर न होणे आणि ती पदे न भरली जाणे, यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना उपस्थित केली होती. ही सूचना दिल्यानंतर ताबडतोब दि. 18 व 19 डिसेंबर, 2008 रोजी या पदांचे निकाल जाहीर झालेले आहेत, त्याबद्दल मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. पण साधारणपणे जून 2006 मध्ये या पदाची जाहिरात निघाली होती आणि डिसेंबर, 2008 मध्ये निकाल जाहीर होतात, हा एक प्रकारे मोठा विलंब आहे. तसेच दुसऱ्या बाजूला रिक्त पदे भरली जात नाहीत म्हणून भविष्यात तातडीने निकाल जाहीर करुन अशी रिक्त पदे भरण्यात यावीत. त्याचबरोबर दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या पदांचे निकाल आता जाहीर झालेले आहेत, या सर्व पदांकरिता ज्या ज्या उमेदवारांची नावे जाहीर केली, त्या त्या उमेदवारांना तातडीने नियुक्ती आदेश किती दिवसात देण्यात येणार आहेत ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, एक महिन्यात असे आदेश देण्यात येतील.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आचारसंहिता सुरु असतांना पदोन्नती देणे तसेच भटक्या जमाती (क) च्या पदोन्नतीमध्ये झालेला अन्याय

मु. शी. : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आचारसंहिता सुरु असतांना पदोन्नती देणे तसेच भटक्या जमाती (क) च्या पदोन्नतीमध्ये झालेला अन्याय याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

डॉ. सुनील देशमुख (सार्वजनिक बांधकाम राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी "मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आचारसंहिता सुरु असतांना पदोन्नती देणे तसेच भटक्या जमाती (क) च्या पदोन्नतीमध्ये झालेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नुकत्याच काही पदोन्नती देण्यात आल्या आहेत. ज्यावेळी या ठिकाणी पदोन्नती देण्यात आली त्यावेळी त्या ठिकाणी निवडणुका सुरु होत्या. त्या ठिकाणी निवडणुका असल्यामुळे आचारसंहिता सुध्दा सुरु होती. साधारणत: आचारसंहिता सुरु असतांना पदोन्नत्या दिल्या जाते नाही परंतु या ठिकाणी आचारसंहितेचे नियम धाब्यावर बसवून या ठिकाणी पदोन्नत्या देण्यात आल्या व पदोन्नत्या देतांना भटक्या जमातीमधील "क" प्रवर्ग म्हणजे धनगर समाजातील कनिष्ठ उपअभियंता उपलब्ध असतांना सुध्दा त्याला डावलून, रोस्टर बदलवून दु-या समाजाच्या कनिष्ठ उपअभियंत्याची निवड करण्यात आली. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीने भटक्या विमुक्त जातीमधील "क" प्रवर्गावर अन्याय केलेला आहे. पदोन्नत्या देतांना सन 2004 चा जी.आर. असतांना 1970 च्या जी.आर. चा उल्लेख का करण्यात आलेला आहे? या ठिकाणी बेकायदेशीरपणे पदोन्नत्या झाल्या असतील तर त्या पदोन्नत्या रद्द करुन धनगर समाजातील भटक्या व विमुक्त "क" वर्गातील एकमेव कनिष्ट उपअभियंता श्री. एस.व्ही.देशमुख उपलब्ध असतांना त्याला पदोन्नती दिली नाही त्यामुळे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये धनगर समाजातील भटक्या व विमुक्त "क" वर्गातील एकमेव कनिष्ठ उपअभियंता श्री. एस.व्ही.देशमुखांना आपण पदोन्ती देणार आहात काय?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, उत्तरामध्ये 11 व्या ओळीत थोडी दुरुस्ती आहे. सन्माननीय सदस्यांनी 93 चे निवेदन पुकारल्या बरोबर बोलण्यास सुरुवात केल्यामुळे मला दुरुस्ती करता आली नाही. "पदविकाधारकच्या" ऐवजी "पदवीधारक" असे वाचावे.

सन्माननीय सदस्यांनी उपअभियंत्याच्या बाबत जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी पूर्ण माहिती घेतलेली आहे. या ठिकणी कोणत्याही प्रकारचा अन्याय झालेला नाही. या ठिकाणी रिझर्व्हेशन सुध्दा ठेवण्यात आलेले असून त्यामध्ये कोणत्याही विशिष्ट जातीला वगळण्यात आलेले नाही. एकूण मंजूर पदांमध्ये भ.ज.क. मध्ये 3.5 टक्के या प्रमाणात पदेन्नती देण्यात आलेली आहे. कनिष्ट अभियंत्याच्या संदर्भात सुध्दा मी पूर्ण तपास करुन खात्री देखील केलेली आहे. असे असतांना देखील सन्माननीय सदस्यांची माहिती सत्य आहे असे गृहीत धरुन संबंधित एपीएमसी बरोबर 15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर....

दिवसात मुंबई येथे एक बैठक लावतो, संबंधितांवर अन्याय झाला आहे असे जर आपल्याला वाटत असेल तर त्यासंर्भात पुन्हा फेर तपासणी करुन संबंधितावर अन्याय झाला असे सिध्द झाले असेल तर त्याबाबतीत आपण योग्य ती कार्यवाही करु.

सभापती : ठीक आहे.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सिंधुदुर्ग जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभाग व अन्य विभागाकडून होत असलेल्या निविदा प्रक्रियेतील अनियमितता

मु. शी. :सिंधुदुर्ग जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभाग व अन्य विभागाकडून होत असलेल्या निविदा प्रक्रियेतील अनियमितता याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

डॉ. सुनील देशमुख (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभाग व अन्य विभागाकडून होत असलेल्या निविदा प्रक्रियेतील अनियमितता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये कोणत्याही प्रकारची कामे निघतांना सिंधुदुर्ग जिल्हयात या कामांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची प्रसिध्दी दिली जात नाही. कामांची प्रसिध्दी न होता शेजारच्या कर्नाटक राज्यातील वर्तमान पत्र, पुणे येथील वर्तमानपत्र आणि कोल्हापूर जिल्हयातील वृत्त प्रत्रात कामांच्या संदर्भात प्रसिध्दी देऊन दोन वेळा जाहीर केल्यानंतर उत्तरात म्हटल्या प्रमाणे पहिल्यांदा 18 निविदा प्राप्त झाल्या त्यातील दोनच निविदा भरल्या गेल्या. दुस-यांदा 11 निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी 6 निविदा भरल्या गेल्या व त्यातील 3 निविदा अवैध्य ठरल्या गल्या होत्या. यातील एक निविदा जी स्वीकारली ती 10 टक्के जादा दराने स्वीकारण्यात आली. याचा अर्थ सिंधुदुर्ग जिल्हयातील ठेकेदारांना कोणत्याही प्रकारची माहिती न देता कोणत्या तरी ठेकेदाराच्या निविदा मंजूर करण्यात आलेल्या आहेत. कणकवली विभागामध्ये तर सातत्याने सर्वच कामे 4.5 टक्के जादा दराने दिली जातात त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी होणार आहे काय? जादा दराच्या निविदा स्वीकारल्या जात असतील तर डीएसआरमध्ये वाढ होणार आहे काय? सिंधुदुर्ग जिल्यामध्ये जी काही कामे काढली जातात त्यांची प्रसिध्दी त्या ठिकाणच्या वृत्तपत्रात दिली जाणार आहे काय?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, समाजिक बांधकाम विभागाच्या जाहीर निविदा सूचना या शासनाच्या नियमानुसार सहाय्यक संचालक, जाहिरात माहिती व जनसंपर्क महा संचालनालय तसेच जिल्हा माहिती अधिकारी यांच्या मार्फत वितरीत केल्या जातात. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर साहेबांनी सांगितल्यानुसार या कामांची प्रसिध्दी ही लोकल पेपरमध्ये न येता कर्नाटक व इतर काही ठिकाणी येतात असे त्यांनी सांगितले आहे. परंतु जी पहिली प्रसिध्दी झाली त्या पहिल्या प्रसिध्दीमध्ये दैनिक सिंधुदुर्ग समाचार, कणकवली या ठिकाणच्या वर्तमानपत्रात देखील प्रसिध्द करण्यात आली होती. दैनिक सकाळ सांगली, लोकमत काल्हापूर व इंडीयन एक्स्प्रेस मुंबई या तिन्ही वर्तमानत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच दुसरी प्रसिध्दी ही दैनिक पुढारी कोल्हापूर, इंडीयन एक्स्प्रेस, तरुण भारत, बेळगाव आणि सिंधुदर्ग समाचार कणकवली येथे प्रसिध्द झालेली आहे. सिंधुदुर्गच्या लोकल वर्तमानपत्रात देखील ही निविदा प्रसिध्द झालेली आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, निविदांची जाहिरात देण्यासंदर्भात शासनाचे नेमके धोरण काय आहे हे समजणे आवश्यक आहे. कारण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काम असताना कोल्हापूरमधील "पुढारी", बेळगावमधील "तरुण भारत", पुणे येथील "टाईम्स ऑफ इंडिया" आणि अन्य वर्तमानपत्रात निविदांच्या जाहिराती देण्यात आल्या. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रमुख वर्तमानपत्रात निविदांच्या जाहिराती प्रसिध्द का करण्यात आल्या नाहीत?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, 5 लाख रुपयांपेक्षा कमी रकमेचे कंत्राट असेल तर त्या कामाची निविदा स्थानिक वर्तमानपत्रात देण्यात येते. 5 लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेचे कंत्राट असेल तर जिल्हा पातळीवरील मराठी तसेच इंग्रजी दैनिकात जाहिरात देण्यात येते. 1 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे कंत्राट असेल तर राज्य पातळीवरील जेवढी वर्तमानपत्र असतील त्यामध्ये जाहिरात देण्यात येते. .... (अडथळा)

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, नियम 93 अन्वये वरील निवेदनावर फक्त एक प्रश्न विचारण्याची परवानगी आहे. असे असताना याठिकाणी दोन प्रश्न झालेले आहेत. आता शेवटचा प्रश्न सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना विचारण्यास मी परवागनी देत आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, 1 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे कंत्राट असताना या कामाच्या निविदेची जाहिरात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील "क" वर्ग वर्तमानपत्रात देण्यात आली. तर इतर सिंधुदुर्ग जिल्ह्याव्यतिरिक्त इतर ठिकाणच्या "अ"वर्ग वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली. परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्यातील "अ"वर्गातील वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली नाही. तेव्हा शासनाच्या धोरणाच्या विसंगत अशी कृती झालेली आहे. तेव्हा आता देण्यात आलेले कंत्राट रद्द करुन पुन्हा नव्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील "अ" वर्गातील वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फेर निविदा काढण्यात येतील काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, या जाहिराती शासनाच्या धोरणाशी सुसंगत अशा दिलेल्या आहेत. जास्तीत जास्त स्पर्धा व्हावी यादृष्टीने राज्य पातळीवर निविदांच्या जाहिराती देण्यात येतात. फक्त जिल्ह्याच्या ठिकाणी निविदांच्या जाहिराती दिल्यास स्पर्धा होणार नाही. तेव्हा शासनाच्या धोरणाशी सुसंगतच अशा निविदांच्या जाहिराती देण्यात आलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सिडकोच्या नवी मुंबईस्थित वाशी,घणसोली, ऐरोली, नेरुळ व अन्य भागात महत्वाच्या ठिकाणी कोट्यावधी रुपयांच्या भूखंडावर सर्रासपणे अतिक्रमण झालेले असून डॉ.शंकरन समितीच्या अहवालानुसार तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांच्या कारकिर्दीत 350 कोटी रुपयांचा झालेला घोटाळा

मु. शी. : सिडकोच्या नवी मुंबईस्थित वाशी,घणसोली, ऐरोली, नेरुळ व अन्य भागात महत्वाच्या ठिकाणी कोट्यावधी रुपयांच्या भूखंडावर सर्रासपणे अतिक्रमण झालेले असून डॉ.शंकरन समितीच्या अहवालानुसार तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांच्या कारकिर्दीत 350 कोटी रुपयांचा झालेला घोटाळा याबाबत सर्वश्री संजय केळकर व रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय,सर्वश्री संजय केळकर व रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "सिडकोच्या नवी मुंबईस्थित वाशी,घणसोली, ऐरोली, नेरुळ व अन्य भागात महत्वाच्या ठिकाणी कोट्यावधी रुपयांच्या भूखंडावर सर्रासपणे अतिक्रमण झालेले असून डॉ.शंकरन समितीच्या अहवालानुसार तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांच्या कारकिर्दीत 350 कोटी रुपयांचा झालेला घोटाळा " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सिडकोच्या नवीन मुंबईस्थित वाशी, घणसोली, कोपरखैरणे, सानपाडा, ऐरोली, नेरुळ इत्यादी ठिकाणच्या अतिक्रमणाबाबत, त्याठिकाणी बेकायदेशीररित्या सुरु असलेले कंटेनर, तसेच साडेबारा टक्के जागा वाटपासंदर्भात झालेला भ्रष्टाचार असे प्रश्न विचारण्यात आले होते. निवेदनात मान्य करण्यात आलेले आहे की, गेल्या 10-15 वर्षामध्ये सिडकोच्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. त्याठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम झालेले आहे. या संदर्भात नेमण्यात आलेल्या श्री.मिराणी समितीने चौकशी अहवाल दिलेला आहे. त्यानुसार संबंधितांवर कारवाई करणार काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, साडेबारा टक्के जागा वाटपासंदर्भात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. शासनाने नियुक्त केलेल्या डॉ.शंकरन समितीने 347 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे अहवालात नमूद केलेले आहे. तेव्हा संबंधितांवर शासन कारवाई करणार काय ?

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

या संदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, ज्या अधिका-यांनी 350 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे त्यांच्या विरुध्द फौजदारी स्वरुपाची कारवाई का केली नाही ? त्याचप्रमाणे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करण्याच्या संदर्भात जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्या विरुध्द काय कारवाई करण्यात येणार आहे आणि ही कारवाई केव्हा करण्यात येणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नवीन मुंबई येथे सिडकोने उभारणी केलेल्या इमारतीच्या संदर्भात डॉ.मिराणी समिती आणि डॉ.शंकरन् समिती अशा दोन समित्या नेमण्यात आल्या होत्या. डॉ. मिराणी हे बांधकाम खा्त्याचे माजी सचिव होते. सिडकोने जी बांधकामे केली होती त्याबाबतीत लोकांच्या अशा तक्रारी होत्या की या इमारती गळत असून त्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होते. अशा प्रकारे 12 नोड मधील इमारतीमध्ये निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याचे आढळून आले होते. त्यामुळे आठ अधिका-यांना तातडीने शिक्षा देण्यात आली आहे त्याच प्रमाणे या इमारती दुरुस्त करुन लोकांना राहण्यासाठी दिल्या आहेत त्याच बरोबर जागा वाटपाच्या चौकशीच्या संदर्भात डॉ शंकरन समिती नेमण्यात आली होती, सिडकोकडून ज्या जागांचे वाटप करण्यात आले होते त्यातील 50 प्रकरणात 347 कोटी रुपयांचे नुकसान झाले होते असे त्या समितीने प्राथमिक अहवालामध्ये नमूद केले होते. भूखंड वाटपामध्ये संशयास्पद व्यवहार आढळून आला होती अशी अकरा प्रकरणे असून 22 प्रकरणी अनियमितता झाली होती ती प्रकरणे रद्द करण्यात आली होती. त्याचबरोबर निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत तसेच जागा वाटपाच्या बाबतीत जे अधिकारी दोषी होते त्यातील सहा पैकी तीन अध्किा-यांना सस्पेन्ड करण्यात आले असून तीन अधिका-यांना 15 दिवसात शिक्षा देण्यात येणार आहे तसेच उर्वरित सगळया अधिका-यांच्या विरुध्द एक महिन्यात कारवाई करण्यात येईल.

श्री मधुकर चव्हाण :सभापती महोदय, हे प्रकरण लाईटली घेता कामा नये अशी मला माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करावयाची आहे या शासनाचे 350 कोटी रुपये 10 अधिका-यांनी खाल्ले आहेत. रस्ते, पाणी या सारख्या मुलभूत गरजा लोकांना उपलबध करुन देण्यासाठी शासनाकडे पैसे नाहीत अशा स्थितीत या अधिकाऱ्यांनी 350 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला असतांना त्यांना फक्त निलंबित केले आहे. या सर्व अधिका-यांची जागा जेलमध्ये आहे.

माझी स्पेसिफिक मागणी आहे की, त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. आर्थिक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ..

गुन्हा अन्वेषण विभागाच्या अंतर्गत आर्थिक गुन्हे विभाग असून त्यासाठी डीसीपी एसीपी व इतर स्टाफ देण्यात आला आहे. तेव्हा भ्रष्टाचार करणा-या अधिकाऱ्याची चौकशी या विभागाकडून करुन त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांना जेलमध्ये पाठविण्यात येणार आहे काय त्याचबरोबर त्यांच्या संपत्तीची ॲन्टी करप्शन ब्युरो मार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय

श्री.हसन मुश्रीफ : या सर्व अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल आणि त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल

श्री.मधुकर चव्हाण : उच्चस्तरीय चौकशी कोणत्या अधिकाऱ्यामार्फत करण्यात येणार आहे.? माननीय उप मुख्यमंत्र्यांना मला असे सांगावयाचे आहे की, आपण किती लाईटली राज्य चालवत आहात ?. आपल्याला निवडणुकीसाठी हप्ता पोहोचला आहे काय ? निवडणुकीच्या खर्चासाठी माननीय मत्रिमहोदयांना हप्ता पोहोचला असल्यामुळेच तुम्ही या अधिका-यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहात असा माझा आरोप आहे . मी बाहेरही असा आरोप करण्यास तयार आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे प्रकरण पूर्वीचे असून मी आठ दिवसापूर्वी या विभागाचा राज्य मंत्री झालो आहे.

श्री.मधुकर चव्हाण : मी व्यक्तिश:आपल्याबद्दल म्हटलेले नाही.

श्री.हसन मुश्रीफ : लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल.

सभापती :सन्माननीय सदस्यांची भावना लक्षात घेऊन संबंधित अधिका-याच्याविरुध्द तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी .

श्री.हसन मुश्रीफ :सभापती महोदय, होय

नंतर श्री. सुंबरे

अशुद्धीत प्रत / परिशुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आताच या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी माननीय राज्यमंत्र्यांवर पैसे खाल्ल्याचा जो गंभीर आरोप केला आहे तो माननीय राज्यमंत्र्यांनी नाकारलेला नाही, उलट ते हसतच या ठिकाणी बोलल आहेत. त्यावर सन्माननीय सदस्य श्री.चव्हाण त्यांना दम देऊन म्हणाले की, मी येथेच नाही तर बाहेर देखील हे बोलेन. तेव्हा भ्रष्टाचाराचा इतका गंभीर आरोप असताना .....

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी 8-10 दिवसापूर्वीच या खात्याचा कार्यभार हाती घेतलेला आहे आणि हे जे प्रकरण आहे ते जुने आहे ...

सभापती : म्हणूनच मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगितले आहे की, याबाबत पूर्ण चौकशी करा आणि कठोर कारवाई करा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रकरणी चौकशी झालेली आहे आणि अहवाल देखील आलेला आहे ...

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या बाबतीत मानीय राज्यमंत्र्यांचे मत असे आहे की, त्यांनी 7-8 दिवसापूर्वीच या खात्याचा कार्यभार घेतलेला आहे. या अनुषंगाने म्हणजे 350 कोटी रूपयांचा जो भ्रष्टाचार आलेला आहे आणि सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये त्याबाबत जी शंका आहे नव्हे त्या पद्धतीचा त्यांनी जो आरोप केलेला आहे त्याबाबत तातडीने राज्यमंत्र्यांनी चौकशी करतील. मी त्यांना सांगितले आहे की, त्यांनी याबाबत पूर्ण चौकशी करून कठोर कारवाई करा. थोड्याच दिवसापूर्वी त्यांनी या खात्याचा चार्ज घेतला असल्याने त्यांना याबाबत अभ्यास करण्यास तरी आपण वेळ दिला पाहिजे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री इतके चांगले कार्यक्षम आहेत की, ते दोन दिवसात देखील या प्रकरणाचा पूर्ण अभ्यास करू शकतात.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण स्वत: गांभीर्याने या प्रकरणी आदेश दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कामकाज पत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्र. 1 बाबत ...</u>

सभापती : मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्र. 1 ही परवाच्या दिवशी राखून ठेवण्यात आलेली होती ती आज पुन्हा चर्चेला घेण्याचे ठरले होते. परंतु या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने संबंधित विभागाच्या म्हणजे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री असलेल्या डॉ.विमल मुंदडा यांनी मला पत्र दिले आहे की, आज दिनांक 22 डिसेंबर 2008 रोजी त्या मुंबईत असल्याने त्या तेथून आज येथे पाहोचू शकणार नाहीत. याच संदर्भात त्या विभागाचे राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख हेही मला माझ्या कार्यालयात येऊन भेटले आहेत आणि त्यांनीही मला सांगितले आहे की, परवा या लक्षवेधी सूचनेवर सभागृहात चर्चा झाली होती तेव्हा त्यांनीच उत्तर दिलेले होते आणि आज देखील या संदर्भात या सभागृहात उत्तर देण्याची त्यांनी पूर्ण तयारी केलेली आहे. अर्थात हे माननीय राज्यमंत्र्यांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर हे देखील मला माझ्या दालनात भेटले होते. त्यांनी या संदर्भात मला सांगितले की, माननीय मंत्री महोदया डॉ. मुंदडा यांनी जी विनंती केली आहे ती मान्य करण्यास हरकत नाही व त्यामुळे आज ही लक्षवेधी सूचना चर्चेला न घेता पुढे ढकलली तरी चालेल. हे माननीय विरोधी पक्षनेता यांचे याबाबतचे मत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या निमित्ताने माननीय उपमुख्यमंत्री तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री असलेल्या श्री.छगन भुजबळ यांना विनंती करीन की, त्यांनी याबाबत ....

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री डॉ.मुंदडा यांनी आपल्याला जे पत्र दिलेले आहे त्याची प्रत माझ्याकडे देखील दिलेली आहे. त्यात त्यांनी म्हटलेले आहे की, त्यांची प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांना मुंबईत डॉक्टरांनी विश्रांती घेण्यास सांगितले आहे त्यामुळे त्या आज येथे येऊ शकणार नाहीत. तरी ही लक्षवेधी सूचना आपण पुढे ढकलावी. तेव्हा एखाद्या मंत्र्यांनी अशी विनंती आपल्याला केल्यानंतर सर्वसाधारणपणे आपण ती मान्य करतो, आपली तशी प्रथा आहे. तरी आपण ती मान्य करून ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलावी.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री डॉ. मुंदडा यांनी मला देखील या संदर्भात पत्र दिले आहे आणि त्यात त्यांनी म्हटले आहे की, माझी तब्येत ठीक नसल्याने या

..... यू 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिवेशनाच्या शेवटपर्यंत मला येणे शक्य होणार नाही. सभापती महोदय, तेव्हा ही एवढी मोठी महत्त्वाची लक्षवेधी सूचना आहे आणि अशा परिस्थितीत त्यावर काही निर्णय होणे अपेक्षित आहे. आता समजा की, माननीय मंत्री अधिवेशनाच्या शेवटपर्यंत आल्याच नाहीत तर तुमच्यासाठी आणि माझ्यासाठी देखील अडचणीची गोष्ट होऊन राहणार आहे. ....

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, मला वाटते की, माननीय मंत्री महोदयांनी आपल्याकडे लेखी पत्र दिले आहे आणि माननीय राज्यमंत्री या विषयावर, या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देण्यास तयार आहेत, त्यादृष्टीने त्यांची तयारी आहे. तेव्हा आता आपणच याबाबत निर्णय घ्यावा. शासन म्हणून जे काही रितसर योग्य आहे ते येथे मांडण्यास आम्हाला अडचण नाही. कारण या साऱ्या प्रकरणामध्ये कारण नसताना एक संशय निर्माण होण्याची शक्यता आहे. सर्वसाधारणपणे कोणत्याही बाबी संदर्भात स्पष्टीकरण करण्यासाठी सभागृहात कॅबिनेट मंत्री नसताना राज्यमंत्री उत्तर देत असतात. तेव्हा आताही या लक्षवेधी सूचनेवर माननीय राज्यमंत्री उत्तर देण्यास तयार आहेत. त्यात आम्हाला काहीही अडचण नाही. तरी सभापती महोदय, आपण स्वत:च याबाबत निर्णय घ्यावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपल्याला माननीय मंत्र्यांनी पत्र दिले आहे तसा मला देखील निरोप दिला आहे की, आज ही लक्षवेधी सूचना चर्चेला न घेता पुढे ढकलण्यात यावी. ही लक्षवेधी सूचना महत्त्वाची असल्याने यावर कॅबिनेट मंत्र्यांनी उत्तर देणे आवश्यक आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिल्यानेच परवाच्या दिवशी सभागृहात गोंधळ झाला होता. म्हणूनच मी आपल्याला सुचवितो की, आपण ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलावी आणि मंत्री महोदयांची विनंती मान्य करावी. आमची त्यास हरकत नाही.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी आताच सांगितले आहे की, विधी मंडळाच्या या सदनामध्ये जे काम चालते त्याचे सर्वस्वी अधिकार हे सभागृहाचे सभापती म्हणून आपले आहेत. आता या लक्षवेधी सूचनेवर कॅबिनेट मंत्री नसल्याने त्यांच्या अनुपस्थितीत माननीय राज्यमंत्री उत्तर देण्यास तयार आहेत. परवाच्या दिवशी देखील माननीय राज्यमंत्रीच या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देत होते आणि ती प्रक्रिया पुढे सुरू आहे. तेव्हा आज देखील यावर उत्तर देण्याच्या दृष्टीने त्यांची तयारी आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे ..... व्ही 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आपणास विनंती केली आहे. आणि सभागृहामध्ये सन्माननीय राज्यमंत्री सुध्दा उपस्थित आहेत. ते जर या लक्षवेधी सूचनेस उत्तर देण्यास तयार असतीलतर ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्याचा आपणास अधिकार आहे. याचे कारण हा अत्यंत गांभीर्याचा आणि जनतेच्या हिताचा प्रश्न असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना चर्चेस घेण्यास हरकत नसावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे या विषयावर सभागृहामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. या प्रश्नाच्या बाबतीत यापूर्वी आपण सांगितले आहे की, माननीय राज्यमंत्री नवीन असल्यामुळे त्यांना अभ्यास करण्यासाठी आठ दिवसांचा वेळ द्यावा. माननीय राज्यमंत्री कितीही अभ्यासू आणि हुशार असले तरी आठ दिवसात त्यांचा अभ्यास पूर्ण होणार नाही म्हणून आपण त्यांना वेळ दिला. माझी आपणास विनंत आहे की, या सभागृहामध्ये या गंभीर विषयावर चर्चा होणार असल्यामुळे कॅबिनेट मंत्र्यांच्या अनुपस्थित या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने धोरणात्मक चर्चा होऊ शकत नाही, धोरणात्मक निर्णय होऊ शकत नाही.प्रत्येक डिपार्टमेंटच्या कॅबिनेट मंत्र्यांना धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार आहे, माननीय राज्यमंत्र्यांना तो अधिकार नाही. या संबंधीच्या जेवढया बैठका झाल्या त्या बैठकींना माननीय कॅबिनेट मंत्री उपस्थित होत्या. त्यावेळी कोणती चर्चा झाली याची माननीय राज्यमंत्र्यांना माहिती नाही. सभापती महोदय, कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेसचे हे आघाडीचे सरकार आहे. या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ आहेत. माननीय डॉ. विमलताई मुंदडा या राष्ट्रवादी कॉग्रेसच्या मंत्री या नात्याने त्यांनी माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांना एक पत्र लिहिले, माननीय सभापतींना एक पत्र लिहिले आणि त्याचप्रमाणे माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडरंग फुडकर यांनाही पत्र लिहिले. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा ही माननीय कॅबिनेट मंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये झाली पाहिजे. याबाबत सभागृहाच्या माननीय नेत्यांनी सुध्दा सांगितले आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्याला सहमती दर्शविली आहे. सभापती महोदय, आपण एवढे न्यायप्रिय आहात की, जेव्हा जेव्हा ज्यांनी ज्यांनी आपणाकडे विनंती केली आहे त्यावेळी आपण उदार अंत:करणाने त्यांना परवानगी दिली आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जरी सभागृहामध्ये सांगितले असले तरी दोन्ही सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या निदर्शनास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री.उल्हास पवार....

आणून दिले आहे की, माननीय कॅबिनेट मंत्री ज्या ज्यावेळी सभागृहामध्ये उपस्थित नसतात त्यावेळी त्यांच्या अनुपस्थितीत माननीय राज्यमंत्री उत्तर देतात, तो देण्याचा त्यांना अधिकार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, याठिकाणी सभागृहाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ आणि माननीय विरोधी पक्षनेते या दोघांनी आपणास विनंती केली आहे. जेव्हा जेव्हा कॅबिनेट मंत्र्यांनी आपणाकडे विनंती केलेली आहे, तेव्हा तेव्हा आपण त्यांची विनंती मान्य केली आहे. असे या सभागृहाचे संकेत आहेत. आपण माननीय कॅबिनेट मंत्र्यांनी केलेली विनंती मान्य केलेली नाही अशाप्रकारची घटना अद्यापि या सभागृहात घडली नाही. आपणास जर धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असेल तर माननीय कॅबिनेट मंत्र्यांनीच त्याचे उत्तर दिले पाहिजे. माननीय राज्यमंत्री याबाबत निर्णय घेऊ शकत नाहीत, त्यांना तो अधिकर दिलेला नाही. शासन व्यवस्थेमध्ये माननीय कॅबिनेट मंत्र्यांना आणि माननीय राज्यमंत्र्यांना कामाचे वाटप केलेले असते. हा प्रश्न आठ दिवसापूर्वी आला त्यावेळी माननीय राज्यमंत्री हे नवीन असल्यामुळे त्यांना अभ्यास करण्यास वेळ लागला...

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माननीय कॅबिनेट मंत्री आज सभागृहात उपस्थित नसतांना अशाप्रकारे माननीय राज्यमंत्र्यांवर उत्तर देण्यास जबरदस्ती करणे बरोबर नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवर माननीय कॅबिनेट मंत्र्यांनी उत्तर देणे आवश्यक आहे. कारण माननीय राज्यमंत्र्यांना पॉलिसी डिसिजन घेण्याचा अधिकार नाही. याबाबतीत सभागृहाचे नेते माननीय श्री.छगन भुजबळ आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपणास विनंती केली आहे. त्यामुळे जोपर्यंत माननीय कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित होत नाहीत तोपर्यंत आपण या लक्षवेधी सूचनेसाठी वेळ द्यावा अशी माझी विनंती आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांनी मला पत्राव्दारे कळविण्यात आले आहे की, "सोमवार,दिनांक 22.12.2008 पासून अधिवेशन संपेपर्यंत प्रकृती अस्वाथ्यामुळे विधीमंडळ कामकाजामध्ये भाग घेऊ शकणार नाही. तरी ही बाब माननीय राज्यमंत्री सार्वजनिक बांधकाम यांच्या निदर्शनास आणून द्यावी. असे माननीय मंत्र्यांच्या निदेशानुसार आपणास विनंती आहे". अशाप्रकारे माननीय कॅबिनेट मंत्र्यांनी मी प्रकृती अस्वाथ्यामुळे येऊ शकत नाही असे मला कळविले आहे.

अशुद्धीत प्रत / मुद्रितशोधनासाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय कॅबिनेट मंत्र्यांनी माननीय सभापतींना विनंती करावयास पाहिजे, आपणास नाही.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, या लक्षवेधी सूचनेला न्याय द्यावयाचा की नाही हा प्रश्न आहे. जर माननीय कॅबिनेट मंत्री प्रकृती अस्वाथ्यामुळे सभागृहात येऊ शकत नसतील तर या महत्वाच्या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने वर्तमानपत्रामध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. त्या अनुषंगाने या लक्षवेधी सूचनेवर चर्चा करण्याची जर आमची तयारी असेल तर ती चर्चा करण्यास अडचण काय आहे?

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, कारण नसताना या सगळ्या चर्चेला वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न सुरु आहे. सरकार म्हणून आमची जबाबदारी आहे. आमचे सरकार काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संयुक्त सरकार आहे. यामध्ये कॅबिनेट मंत्री किंवा राज्यमंत्री असा विषय नाही. अनेक वेळा कोणतीही चर्चा होत असतना कधी मंत्री उपस्थित असतात तर कधी राज्यमंत्री उपस्थित असतात. मला कोणताही आग्रह धरावयाचा नाही. याबाबतचा निर्णय सभापती या नात्याने मी आपल्यावर सोपवतो आणि आपल्याला उचित वाटेल तो निर्णय आपण घ्यावा. त्याला आमची तयारी आहे.कि

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, एखादा विषय सभागृहात उपस्थित झाल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी होते. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा आदर राखून विचारु इच्छितो की, त्यांनी आता मागे फिरण्याचे कारण काय हे सभागृहाला कळले पाहिजे. दुसरा मुद्दा असा की, कॅबिनेट मंत्री किंवा राज्यमंत्री यापेक्षाही माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत आणि त्यांनी तयारी दाखवली तर सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. सभापती महोदय, आपण या विषयावर निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात एखादा विषय उपस्थित झाल्यांतर ती सभागृहाची प्रॉपर्टी होते असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितलेला आहे तो बरोबर आहे. परंतु प्रश्न असा आहे की, माननीय मंत्रिमहोदयांनी ज्या अर्थी आपल्याला पत्र दिलेले आहे त्याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, यामध्ये त्यांना स्वत: भाग घ्यावयाचा आहे. नाही तर त्यांनी पत्र देण्याचे कारण नव्हते. या सभागृहामध्ये माननीय राज्यमंत्री उत्तर देतात ही परंपरा आहे. त्यांनी पत्र देण्याची आवश्यकता नव्हती. आपण यासंदर्भात जो निर्णय द्याल तो मान्य आहे परंतु निर्णय देत असताना आणि त्या पत्राचा आधार देत असताना आपण जो निर्णय द्याल त्यामध्ये आपण काही वेगळा निर्णय दिला तर उद्या भविष्यामध्ये असे पत्र आले तर हा विषय पुढे ढकलावा असा निर्णय आपल्याला देता येणार नाही. आजपर्यंत चालत आलेली प्रथा, परंपरा, माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्याला पत्राव्दारे केलेली विनंती हे लक्षात घेऊन परंपरेला अनुसरुन आपण योग्य तो निर्णय द्यावा अशी मी विनंती करतो. आपण जो निर्णय द्याल तो आम्हाला मान्य आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आजपर्यंत असे घडलेले नाही अशा प्रकारची प्रथा पडता कामा नये. आपण दहा मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज स्थगित करावे. आम्हाला चर्चेला बोलवून आपण विचारविनिमय करावा. आपण यामध्ये हस्तक्षेप करुन कोणत्याही प्रकारे पार्टी बनू नये अशी माझी आपल्याला विनंती आहे. आतापर्यंत आपण असा निर्णय कधी घेतलेला नाही. आपण या कॉन्ट्रॉव्हर्सीमध्ये पडू नये अशी हात जोडून विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी ज्यावेळी बॉम्बस्फोटासंबंधीची चर्चा या ठिकाणी सुरु होती त्यावेळी विरोधी पक्षाने आग्रह धरल्यानंतर आपण माननीय कॅबिनेट मंत्र्यांनी त्या चर्चेला उत्तर देण्याबाबत आदेश दिले. या सभागृहाची प्रथा आणि परंपरा अशी आहे की, ज्या वेळी अशा प्रकारचे पत्र कॅबिनेट मंत्र्यांकडून दिले जाते त्या वेळी आपण सभागृहाच्या नेत्यांना विचारुन तो प्रश्न किंवा तो विषय पुढे ढकलतो. आज सभागृहाच्या नेत्यांनी आणि मी आपल्याला सांगितले आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांचा मलाही निरोप आला की, आज ही लक्षवेधी सूचना न घेता पुढे ढकलावी, अशी मी विनंती करतो. त्यामुळे आपण याबाबत निर्णय घ्यावा. या ठिकाणी सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले आहे आणि आम्हीही सांगितले आहे. म्हणून आपण याबाबत निर्णय घ्यावा. आम्ही कॅबिनेट मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे असा आग्रह धरल्यानंतर आपण तशा प्रकारचे आदेश दिले आणि या सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्र्यांनी त्या चर्चेला उत्तर दिले.

सभापती : काऊन्सिल ऑफ मिनिस्टर्स या अनुषंगाने ज्या वेळी आपण चर्चा करतो त्यामध्ये मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री या तीनही सज्ञा येऊ शकतात. ज्यावेळी या लक्षवेधी सूचनेची सुरुवात झाली त्यावेळी मंत्री आणि राज्यमंत्री उपस्थित होते. असे असताना सन्माननीय राज्यमंत्र्यांनी या लक्षवेधी सूचनेवर जे जे प्रश्न उपस्थित करण्यात आले त्याला उत्तरे दिलेली आहेत. ही गोष्ट खरी आहे की, सन्माननीय मंत्रिमहोदया डॉ. विमल मुंदडा यांनी मलाही पत्र दिलेले आहे. त्याची एक प्रत त्यांनी सभागृहाचे नेते श्री. छगन भुजबळ यांनाही दिलेली आहे. त्यांनीही माझ्या निदर्शनास ते आणून दिलेले आहे. सन्माननीय राज्यमंत्री श्री. देशमुख यांना याबाबतीत आणखी एक प्रत मिळालेली आहे ती त्यांनी आणलेली आहे. सन्माननीय मंत्रिमहोदया डॉ. विमल मुंदडा यांनी त्यांना एक पत्र लिहिलेले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, मला उर्वरित काळामध्ये सदनामध्ये येण्यास थोडी अडचण होईल त्यामुळे यावेळी आपण सगळे कामकाज पहावे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

ही वस्तुस्थिती आहे. मला वाटते की, आपण अ व्यक्ती किंवा ब व्यक्ती या चर्चेमध्ये जाऊ नये. वास्तविक या लक्षवेधीच्या उत्तराला सन्माननीय राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी सुरुवात केली होती. त्यावेळी सुध्दा सन्माननीय मंत्री डॉ.विमल मुंदडा या उपस्थित होत्या. परंतु आज त्या उपस्थित नाहीत. त्यांनी मला, सभागृहाच्या नेत्यांना आणि सन्माननीय राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांना पत्रे दिलेली आहेत. मला यासंदर्भात लगेच निर्णय घेणे अडचणीचे वाटते. यासाठी थोडासा अवधी देणे आवश्यक असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे. या वेळेमध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते आणि सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांचा मी सल्ला घेतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.56 ते 2.11 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: बरांज (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील कर्नाटका एम्टा काळे कंपनीने प्रकल्पग्रस्तांना नोक-या देण्यास दिलेला नकार

मु.शी.: बरांज (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील कर्नाटका एम्टा काळे कंपनीने प्रकल्पग्रस्तांना नोक-या देण्यास दिलेला नकार यासंबंधी सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी व संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बरांज (ता.भद्रावती जि.चंद्रपूर) येथे सुरु असलेल्या कर्नाटका एम्टा काळे कंपनीने स्थानिक प्रकल्पग्रस्त, शेतमजूर व बेरोजगारांना कंपनीत नोकरी देण्याचे तसेच उक्त परिसरातील गावे दत्तक घेवून त्याचा विकास करण्याचे व बरांज चेकबरांज गावाचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन देवूनही अद्यापि याबाबत कोणतीही कार्यवाही कंपनीने केली नसल्याचे माहे डिसेंबर, २००८ मध्ये वा त्या दरम्यान आढळून येणे, प्रकल्पात ८० टक्के स्थानिक लोकांना नोकऱ्या देण्यात याव्यात, असा राज्य शासनाचा आदेश असतानाही या आदेशाचे पालन न करता कंपनीने उघडपणे परप्रांतीय कामगारांची भरती करण्यात आल्याचे आढळून येणे, कंपनीने १६० प्रकल्पग्रस्तांना नागपूर येथे तीन महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येणे, परंतु प्रशिक्षण पूर्ण केलेल्या या प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्यास कंपनीने नकार देणे, त्यामुळे संबंधित प्रकल्पग्रस्त बेरोजगारांवर व त्यांच्या कुटुंबियावर आलेली उपासमारीची वेळ, परिणामी प्रकल्पग्रस्तांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, प्रकल्पग्रस्तांनी रास्ता रोको आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, सबब या प्रकल्पग्रस्तांना कंपनीमध्ये नोकरी न देणाऱ्या सदर कंपनीवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग व संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : चंद्रपूर जिल्ह्यामध्ये अनेक उद्योग येतात अनेक माईन्स येतात. हे येत असताना प्रकल्पग्रस्तांना आणि स्थानिक लोकांना नोक-या देण्यासंबंधीचे करार करण्यात येतात. असे असताना प्रकल्पग्रस्त आणि स्थानिकांना नोक-या दिल्या जात नाहीत. प्रशिक्षणार्थी म्हणून परप्रांतीय कामगार आणले जातात. तेव्हा कर्नाटका एम्टा काळे कंपनीमध्ये प्रकल्पग्रस्त आणि स्थानिकांना नोक-या मिळण्याच्या दृष्टीने शासन सदरहू कंपनीला निदेश देईल काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : लक्षवेधीच्या निवेदनामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे की कंपनीत एकूण 332 अधिकारी व कामगार कार्यरत आहेत. त्यापैकी पर्यवेक्षकीय अधिकारी एकूण 42 असून त्यापैकी 36 स्थानिक आहेत. म्हणजे पर्यवेक्षकीय अधिका-यांमध्ये 85 टक्के स्थानिक आहेत. तसेच 170 कामगार स्थानिक आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे डंपर्स, शॉवेल आणि डोजर्स इत्यादी यंत्रसामुग्री चालविण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी लागतात. जे स्थानिक लोक हे काम करु इच्छितात अशा लोकांना ही वाहने व यंत्रसामुग्री चालविण्याचे प्रशिक्षण देण्यास कंपनी तयार आहे. स्थानिक लोकांनी हे प्रशिक्षण घेतल्यानंतर 170 परप्रांतीयांच्या जागी स्थानिक लोकांना घेण्यास कंपनी तयार आहे. मिटकॉनच्या माध्यमातून 600 युवक युवतींना प्रशिक्षण देण्याचा निर्णय समितीने घेतलेला असून त्यासाठी पैशाचीही तरतूद केलेली आहे. पुनर्वसन योजनेनुसार कुडराळा येथे दोन शाळा, ग्रामपंचायत भवन, पाण्याची टाकी, आतील रस्ते तसेच मेन रोडला जोडणारा रस्ता, बाजार ओटा आणि बँक व पोस्ट ऑफीस बांधण्याचे काम प्रगतिपथावर आहे. सन्माननीय सदस्यांच्या आणखी अपेक्षा असतील तर त्या त्यांनी सांगाव्यात.

डॉ. नीलम गो-हे : ही लक्षवेधी चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील कर्नाटका एम्टा काळे कंपनीसंबंधी असली तरी महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करताना त्या उद्योगामध्ये 80 टक्के स्थानिक लोकांना नोक-या द्याव्यात असे शासनाचे आदेश आहेत.

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नीलम गोऱ्हे...

परंतु त्या आदेशाचे पालन न करता कंपनीने खुलेआम परप्रांतीय कामगारांची भरती करण्याचे आढळून येणे. माननीय मंत्री महोदयांनी स्थानिकांची झालेली भरती यासंबंधीचे प्रमाण मघाशी सांगितले. प्रकल्पामध्ये 80 टक्के स्थानिकांना नोक-या देण्यात याव्यात असे शासनाचे आदेश आहेत. परंतु त्या आदेशाचे अंमजबजावणी होते आहे किंवा नाही याची पाहणी कशा पध्दतीने केली जाते ? किती स्थानिकांना नोक-या उपलब्ध करुन दिल्या आहेत अशा माहिती एखाद्या कंपनी व्यवस्थापकाना विचारली जाते, त्यावेळी स्थानिकांची तात्पुरती भरती केली जाते आणि स्थानिकांची भरती केली आहे अशी माहिती दिली जाते. ब-याचशा कंपनींमध्ये परप्रांतीय कामगारांची भरती केली जाते ही वस्तुस्थिती आहे. म्हणून स्थानिकांना 80 टक्के नोक-यांमध्ये प्राधान्य दिले पाहिजे असे शासनाचे आदेश आहेत. त्या आदेशाचे पालन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यासंबंधी जनरल मॅनेजर तसेच डी.ए.सी. यांनी माहिती ठेवणे आवश्यक आहे. नवीन औद्योगिक घटक येतात, त्यावेळी त्यांना यू.एल.पी.1 आणि यू.एल.पी. 2 फॉर्म भरुन देणे अपेक्षित आहे. सुपरवायझरी पोस्टमध्ये 50 टक्के आणि इतर श्रेणींमध्ये 80 टक्के असे शासनाचे धोरण आहे. यासंबंधी एक कालबध्द नियोजन करावे अशी आपली अपेक्षा आहे. यासंबंधीची जी कार्यप्रणाली आहे, ती पूर्णपणे सक्षम झालेली नाही. त्यासंबंधी अभ्यास चालू आहे. सदरहू कार्यप्रणाली अधिक मजबूत करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री. अरविंद सावंत : एम.आय.डी.सी.च्या मार्गदर्शक तत्वामध्ये स्थानिकांना प्राधान्य दिले पहिजे असे लिहिलेले आहे. तसेच स्थानिकांना प्राधान्य दिले जाते किंवा नाही याची पाहणी करण्यासाठी एका विशिष्ट अधिका-याची नेमणूक करण्याची तरतूद केलेली आहे. त्या तरतूदी प्रमाणे यासंबंधीची माहिती घेण्यासाठी या ठिकाणी अधिकारी नेमला आहे काय ? जर अशा अधिका-याची नेमणूक केली असेल तर त्यांनी आतापर्यंत नेमके कोणते काम केले आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. राज्य स्तरावर विकास आयुक्त, उद्योग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : हा प्रश्न त्या जिल्हयाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदय तात्काळ बैठक घेऊन किती दिवसात निणर्य घेतील ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने विभागाचे अधिकारी आणि कंपनीचे अधिकारी आज उपस्थित आहेत. त्यांच्या समवेत आज बैठक घेण्यास काही अडचण नाही.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3 बाबत

उपसभापती : सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान, श्री.जितेंद्र आव्हाड, श्रीमती उषा दराडे, श्रीमत मंदा म्हात्रे, श्री. विक्रम काळे यांनी आपली लक्षवेधी सूचना मांडावी.

श्री. विनोद तावडे : लक्षवेधी सूचना विचारणारे सर्व सन्माननीय सदस्य अनुपस्थित आहेत ही गोष्ट अतिशय गंभीर आहे. एका लक्षवेधी सूचनेस साधारणपणे सव्वा लाख रुपये खर्च येतो. सन्माननीय सदस्य लक्षवेधी सूचना विचारतात आणि ज्यावेळी सूचना चर्चेला येते त्यावेळी सूचना विचारणारे सदस्य जाणीवपूर्वक सभागृहात अनुपस्थित राहतात. त्यामुळे राज्यातील जनतेचा आमच्यावरील विश्वास उडत चालला आहे. राज्यातील जनता आमच्याकडे देखील संशयास्पद दृष्टीने पहाते. असे प्रकार सभागृहात अनेक वेळा होत असल्यामुळे आमच्या सारखे सदस्य बदनाम होतात. ज्या सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिली आहे व ते चर्चेच्या वेळी अनुपस्थित आहेत, त्यांना तंबी देण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : ही गोष्ट अतिशय गंभीर आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

(विरोधी पक्षाचे सदस्य घोषणा देतात.)

उपसभापती : ही लक्षवेधी सूचना मी राखून ठेवीत आहे...

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभागृहात दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

उपसभापती : मला बोलू द्याल की नाही?...(गोंधळ)...ज्या सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना विचारलेली आहे त्यांच्यापैकी कोणत्याही एका सदस्याने सभागृहात उपस्थित राहणे अत्यावश्यक आहे.....(गोंधळ)...लक्षवेधी सूचना सुरु झाल्यानंतर जर संबंधित मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नसतील तर आपण त्यांना धारेवर धरतो, त्यांच्यावर टीका करतो. परंतु सभागृहात लक्षवेधी सूचना विचारल्यानंतर लक्षवेधी सूचना विचारणाऱ्यापैकी किमान एक किंवा दोन सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उपस्थित असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना विचारणारे संबंधित सन्माननीय सदस्य सभागृहात हजर होईपर्यंत मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ही वेगळी प्रथा निर्माण होत आहे. लक्षवेधी सूचना विचारणारे सन्माननीय सदस्य सभागृहात हजर नसताना लक्षवेधी सूचना राखून ठेवणे ही वेगळी प्रथा आहे. त्याऐवजी संबंधित सदस्यांना ताकीद दिली पाहिजे. अशी प्रथा पडली तर सगळेच सन्माननीय सदस्य म्हणतील की, लक्षवेधी सूचना राखून ठेवा. हे नियमबाह्य आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, मी यापूर्वीच हे बोललो आहे की, लक्षवेधी सूचना विचारणाऱ्या संबंधित सन्माननीय सदस्यांपैकी किमान एक किंवा दोन सदस्यांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे. लक्षवेधी सूचना लागल्यानंतर सदस्यांनी सभागृहात गैरहजर राहणे योग्य नाही. त्यामुळे यापुढे कोणतीही लक्षवेधी सूचना विचारणारे सन्माननीय सदस्य जर सभागृहात गैरहजर राहणार असतील तर त्यांनी माननीय सभापतींना अगोदर लेखी सूचना द्यावी आणि माननीय सभापतींच्या परवानगीनेच गैरहजर रहावे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, आमची लक्षवेधी सूचना स्वीकृत होत नाही. मागील अधिवेशनात माझी एकही लक्षवेधी सूचना स्वीकृत झालेली नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात अशी एखादी घटना घडली की, आमचे सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव त्वरित उभे राहून उणिवा निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करतात. आता त्यांची नैतिकता कुठे गेली हे त्यांनी उभे राहून सांगावे म्हणजे आम्हाला बरे वाटेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, आमचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माझ्याबद्दल आदराची भावना व्यक्त केली त्याबद्दल मी त्याचा शतश: आभारी आहे. माझ्या सद्सद्विवेक बुध्दीबद्दल, माझ्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांना विश्वास असल्यामुळेच त्यांनी माझे नाव कोट केले आहे. माझी ही आमदारकीची तिसरी टर्म आहे. या क्षणापर्यंत मी कधीही असा प्रयोग केला नाही आणि भविष्यात मी असे करीन अशी टीका माझ्यावर करण्याची वेळ मी येऊ देणार नाही.

उपसभापती : एक बाब आपण नियम समितीपुढे आणणार का? जो कोणी सन्माननीय सदस्य लक्षवेधी सूचना विचारतो आणि त्याची लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आल्यानंतर त्याने सभागृहात हजर असले पाहिजे यादृष्टीने त्याच्याकडून अंडरटेकिंग लिहून घ्यायचे का? मी लक्षवेधी सूचना विचारीत आहे, मी सभागृहात हजर असेन. हजर राहिलो नाही तर.....मग पुढे काय असेल ते. सभागृहात गैरहजर राहणे चूक आहे, त्याबद्दल मी माझे म्हणणे मांडले आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईत वाहतुकीची होत असलेली कोंडी

मु. शी. : मुंबईत वाहतुकीची होत असलेली कोंडी यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई शहरात सुमारे १४ लाख वाहने असणे, मुंबई शहरातील वहातूकीची समस्या दिवसेंदिवस वाढत जाणे, शहरात नवीन कंपन्यांच्या नवीन गाड्यांची भर पडत रहाणे, शहरातील वाहतुकीची कोंडी होणाऱ्या बहुतेक ठिकाणी रिक्षा व टॅक्सी चालकांकडून होणारे बेशिस्त वर्तन व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन, वाहतुक पोलिसांना न जुमानता भर रस्त्यावर वाहने उभी करुन प्रवाशांची चढ उतार करण्याची वाढती प्रवृत्ती, टॅक्सींची निर्मिती करणारी प्रिमियर कंपनी अनेक वर्षापूर्वी बंद झाल्यामुळे या टॅक्सी दुरुस्त करण्याकरीता लागणारे सुटे भाग उपलब्ध नसल्यामुळे शहरातील बहुतांश टॅक्सी २० वर्ष जुन्या झाल्या असूनसुध्दा अत्यंत भंगार अवस्थेत रस्त्यावर चालवणे, त्यामुळे प्रवाशांना असुरक्षित प्रवास करावा लागणे, त्यामुळे शहरातील प्रवाशांच्या मनात राज्य शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. सतीश पाटील (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबईतील वाहतुकीच्या कोंडीसंबंधी मी ही लक्षवेधी सूचना विचारलेली आहे. आपल्याला माहीतच आहे की मुंबईच्या रस्त्यांची लांबी सरासरी 2 हजार किलोमीटरआहे. मुंबई हे बेट असल्यामुळे तेथे एक इंच सुध्दा जमीन वाढविता येत नाही. दररोज चारशे वाहनांची भर मुंबईत होत असते. मुंबई शहरात दररोज 4 लाख खाजगी गाडया ये-जा करतात, 1.10 लाख रिक्षा आहेत, 50 हजार टॅक्सीज आणि 3400 बेस्टच्या बसेस आहेत. आताच ही स्थिती आहे तर पुढील 25 वर्षात काय परिस्थिती होईल याचा विचार करणे आवश्यक आहे. मुंबईतील लोकांना ट्रेन सोडून रस्त्यावरुन चालत प्रवास करावा लागेल. या लक्षवेधी सूचनेत मी वाहतुकीच्या कोंडीसंबंधी शासन कोणती उपाययोजना करणार आहे असे विचारले तर त्याला शासनाने असे उत्तर दिले आहे की, टॅक्सीवाल्यांवर त्वरित कारवाई करण्यासाठी पोलिसांचे दुरध्वनी क्रमांक दिलेले आहेत, आर.टी.ओ कार्यालयात तक्रार पेटी ठेवण्यात आलेली आहे. वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्यावर पोलिसांकडून वेळेवर कारवाई केली जाते. या निमित्ताने माझा असा प्रश्न आहे की, 25 वर्षापासून ज्या टॅक्सीज आहेत त्यांच्यासंबंधी सुप्रिम कोर्ट आणि हाय कोर्टाने देखील निर्णय दिलेले आहेत. परंतु आमच्या आदेशाने व्यथित झालेले श्री. यादव हे हायकोर्टात गेले आणि हायकोर्टाने काही प्रश्न विचारण्यास वेळ दिला. यासंदर्भात मंत्रिमंडळाची बैठक 20 तारखेला झाली. तसेच आपण असेही उत्तर दिलेले आहे की, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे समितीचा अहवाल उच्च न्यायालयात सादर करण्यात येईल. परंतु या सभागृहात माहिती देण्यासाठी तसे बंधन नाही, असे मला वाटते. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, मुंबईच्या रस्त्यावर सध्या चालू असलेल्या 25 वर्षावरील टॅक्सीजवर शासन बंदी घालणार काय ? माननीय मंत्री महोदय आमच्याबरोबर परदेशातील अभ्यास दौऱ्यात होते. त्यांनीही पाहिले की, काही देशात "थिकली पॉप्युलेटेड" अशी दुरावस्था झालेली आहे पण सार्वजनिक साहने सोडून खाजगी वाहनांना सम आणि विषम अशा प्रकारचे नंबर्स देण्यात येतात व त्यांनी ठरवून दिलेल्या दिवसांखेरीज रस्त्यावर येऊ नये असे ठरविले. जेणेकरुन वाहतुकीची कोंडी होणार नाही. म्हणून आज मुंबईत वाहतुकीची जी अवस्था झालेली आहे त्याचा विचार करता मेट्रो रेल्वेचे काम सुरु झाल्यानंतर त्यात आणखी भरच पडणार आहे. यासंदर्भात शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्याची अंमलबजावणी करणार काय ? तसेच 25 वर्षापूर्वीच्या टॅक्सीजवर बंधन घालणार काय ? आणि ज्याप्रमाणे

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

शांघायसारख्या शहरातील महापौर सुध्दा आपली गाडी सोडून सार्वजनिक वाहनाने जातात, अशा प्रकारे निर्णय घेऊन मुंबईत सुध्दा खाजगी वाहनांना काही दिवशीच परवानगी देण्यासंबंधीचाही विचार करणार काय ? आणि जड वाहनांना मुंबईत येण्यास बंदी करणार काय ?

डॉ. सतीश पाटील : या सभागृहात महत्वपूर्ण विषयावर सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. मुंबई ही खऱ्या अर्थाने देशाची आर्थिक राजधानी असून या ठिकाणी वाहनांची व वाहतुकीची समस्या निर्माण होत आहे. त्यासंबंधी काय उपाययोजना करावी याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. याबाबत उच्च न्यायालयात एक याचिका देखील दाखल झाली आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असले तरी या अनुषंगाने मी अशी माहिती देऊ इच्छितो की, दि. 15.12.2008 रोजी जी याचिका दाखल करण्यात आली आणि त्यासंबंधीच्या उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दि. 20.12.2008 रोजी शासनाने एक समिती गठित करण्याचा निर्णय घेतला. त्या समितीची बैठक परवाच झाली व त्याचा अंतिम अहवाल 8 जानेवारी, 2009 रोजी सादर करावयाचा आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सतीश पाटील...

सभापती महोदय, ही बाब न्यायप्रविष्ट असली तरी आपण यासंदर्भात काही निर्णय घेत आहोत. 25 वर्षापूर्वीच्या जी जुनी वाहने आहेत, टॅक्सीज आहेत त्या कालबाहय करण्याबाबतचा आपण निर्णय घेणार आहोत. मुंबईमध्ये नवीन रस्ते, फ्लाय ओव्हर ब्रीज झाले असले तरी जुन्या वाहनांच्या संदर्भात आपल्याला निर्णय घ्यावाच लागणार आहे. जे परवानेदार टॅक्सी धारक, किंवा टॅक्सी चालक आहेत त्यांचे नुकसान होऊ नये म्हणून यासंदर्भात आपण निर्णय घेणार आहोत. त्यांच्या टॅक्सीज जरी 25 वर्षापूर्वीच्या असल्या तरी त्यांचा परवाना रद्द होणार नाही तर त्यांना केवळ नवीन वाहने घ्यावी लागतील त्यांचा जना जो परवाना आहे तो तसाच सुरु राहील असा आपण निर्णय घेणार आहोत. तसेच या निर्णयाच्या संदर्भात काही सन्माननीय सदस्यांना एकत्र करुन त्यांचे यासंदर्भात अधिक काय मत आहे हे ऐकून निर्णय घेतला जाईल. आपल्याला येत्या 8 तारखेला यासंदर्भातील संपूर्ण अहवाल कोर्टात सादर करावयाचा आहे. जुन्या टॅक्सीजच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही चांगल्या सूचना असतील त्या चांगल्या सूचनांचा जरुर विचार करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी हा विषय कोर्टात असल्याच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. दिल्लीमध्ये जुन्या टॅक्सीजच्या संदर्भात जो निर्णय झालेला आहे त्याच्या आधारे श्री. गोयंका यांनी एक पिटीशन दाखल केलेले आहे. सीएनजी आणि एलपीजी गॅस कसा उपलब्ध करणार आहात, त्यासंदर्भात काय निकष असणार आहे यासंदर्भात विचारणा केलेली आहे. 25 वर्षापूर्वीच्या टॅक्सीज बंद करतांना आपल्याला सीएनजी आणि एलपीजी स्टेशन अधिक प्रमाणात सुरु करावे लागणार आहेत. परंतु सीएनजी आणि एलपीजी स्टेशन आपण अधिक प्रमणात सुरु करु शकलो नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सीएनजी आणि एलपीजी स्टेशन अधिक प्रमाणात सुरु न केल्यामुळे आपल्याला जुन्या टॅक्सीज बंद करता येणार नाहीत. दुसरा प्रश्न असा आहे की, दिल्लीमध्ये 15 वर्षापूर्वीची वाहने रस्त्यावर नाहीत. (अडथळा) कोर्टाच्या आदेशा प्रमाणे आपण सीएनजी आणि एलपीजी स्टेशन अधिक प्रमाणात सुरु करु शकलो नाहीत. मी टॅक्सी युनियनचा अध्यक्ष असल्यामुळे मला या विषयाच्या संदर्भातील पूर्ण माहिती आहे . दिल्ली सरकारने जुन्या टॅक्सीज बदलण्यासाठी ज्या प्रमाणे टॅक्सी मालकांना सबसीडी दिलेली आहे तशाच प्रकारची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

सबसिडी महाराष्ट्र शासन सुध्दा देणार आहे काय ? सीएनजी आणि एलपीजीवर वाहने झाली तर प्रदूषण सुध्दा कमी होईल त्यामुळे टॅक्सी विकत घेतांना महराष्ट्र शासन टॅक्सी मालकांना सबसीडी देणार आहे काय?

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, आपल्याकडे जवळपास 55 हजार टॅक्सीज असून त्यांचे रजिस्ट्रेशन सुध्दा झाले आहे. या 55 हजार टॅक्सीजपैकी 37,196 टॅक्सींचे रुपांतर गॅसमध्ये करण्यात आलेले आहे. जुन्या टॅक्सीज बंद करण्याच्या संदर्भात आपण कोर्टाच्या नियमाप्रमाणे सर्व व्यवस्था केलेली आहे. पेट्रोल वाहनांचे गॅसमध्ये सुध्दा रुपांतर करण्यात आलेले. गॅसच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात आपल्याला कोर्टाने आदेश दिलेले आहेत. त्याचेही आपण पालन करीत आहोत.

श्री. विनोद तावडे : कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे आपण आवश्यक तेवढे सीएनजी आणि गॅस स्टेशन उभे करु शकलो नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय, जवळपास 99 टक्के टॅक्सींचे सी.एन.जी.मध्ये रुपांतर झालेले आहे. पेट्रोल पंपावर सी.एन.जी.भरण्यास साधारणत: 10 ते 15 मिनिटे लागतात. पेट्रोल पंपावर कोठेही सी.एन.जी.नाही असे म्हणता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी टॅक्सीमालकांना सबसिडी देण्याबाबत प्रश्न उपस्थित केला त्याबाबत सांगू इच्छितो की,याबाबत विचार झालेला नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबईत मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाहतुकीची कोंडी असा माझ्या लक्षवेधीचा विषय आहे. मुंबईतील टॅक्सीवाले प्रवाशांशी अरेरावी करतात, जवळचे भाडे नाकारतात अशा टॅक्सीचालकांवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. जर कारवाई झाली त्यांचे नेते श्री.शरद राव आंदोलन करतात. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, जवळचे भाडे नाकारणाऱ्या टॅक्सी चालकांवर अगोदर असलेल्या दंडाच्या नियमात बदल करुन त्यामध्ये वाढ करणार काय ? ब्रिटीश काळापासून चालत आलेल्या नियमावलीत बदल करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी विचारले की, माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशप्रमाणे सी.एन.जी. सेंटर्स उभारण्याची व्यवस्था करणार आहात काय ?शासनाने 25 वर्षापूर्वीच्या टॅक्सी बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णया विरोधात कोर्टात पिटीशन दाखल झालेले आहे. सभापती महोदय, मुंबईतील वाहतुकीची कोंडी ही टॅक्सीमुळे होत आहे. कारण ते भर रस्त्यावर टॅक्सी थांबवून लांब पल्ल्याचे प्रवासी घेत असतात. जवळचे भाडे नाकारतात. प्रवाशांची छळवणूक करतात. तेव्हा जवळचे भाडे नाकारणाऱ्या टॅक्सीचालकांवर जुन्या नियमातील तरतूदीमध्ये बदल करुन दंडाची रक्कम वाढविणार काय ?

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, दिनांक 8 जोनवारी, 2009 रोजी माननीय उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. तेव्हा या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर तसेच सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना विचारात घेऊन काही निर्णय घेता येतील. परंतु माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत थोडी वाट पहावी अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा प्रश्न वेगळा आहे. त्याचा माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाशी काही संबंध नाही. मी एवढेच विचारले की, जवळचे भाडे नाकारतात तसेच भर रस्त्यात वाहने उभी करुन वाहतुकीची कोंडी करीत असतात अशा टॅक्सीचालकांवर जुन्या नियमातील दंडाच्या रकमेत बदल करुन त्यामध्ये वाढ करणार काय असा माझा प्रश्न आहे. या प्रश्नाशी माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाशी काही संबंध नाही आणि हे सभागृह सुप्रीम आहे.

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी केलेली सूचना चांगली आहे. टॅक्सीचालकाने जवळचे भाडे नाकारल्यावर त्यास दंडात्मक कारवाई केली जाते. त्यानंतर कोर्टात केस जाते. या घटना वारंवार होत असतात. तेव्हा या संदर्भात तज्ज्ञ मंडळी आणि काही सन्माननीय सदस्य यांनी एकत्र बसून नियमावलीत दुरुस्ती करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. त्याप्रमाणे ही बैठक लवकरात लवकर बोलाविण्यात येईल. जी काही दुरुस्ती करावयाची आहे ती सर्वांना विश्वासात घेऊन करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेऊन नियमात दुरुस्ती करण्यात येईल असे सांगितले. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, टॅक्सी मीटरच्या संदर्भात अनेक लोकांच्या तक्रारी आहेत. त्याबाबत तक्रारी करुनही काही कारवाई होत नाही. माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, आपण मुंबईत याल त्यादिवशी एकाच ठिकाणाहून दोन टॅक्सीमधून प्रवास करु. आपणास एका टॅक्सीचे वेगळे भाडे आणि दुसऱ्या टॅक्सीचे वेगळे भाडे आकारल्याचे दिसून येईल.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

टॅक्सीजच्या मिटर्सच्या बाबतीत टॅक्सी चालक मोठया प्रमाणावर बनवाबनवी करुन करोडे रुपये मुंबईकरांचे लुबाडत आहेत. टॅक्सी चालकांच्या युनियनचे नेते सुध्दा टॅक्सी चालकाना संरक्षण देत असतात तेव्हा या संदर्भात शासनाने ठाम निर्णय घेतला तर मुंबईकरांना काही प्रमाणात मदत देता येईल. सर्व टॅक्सीजना इलैक्ट्रॉनिक्स मिटर्स कशी बसविली जातील याबाबतीत कार्यवाही केली जाणार आहे काय ?

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय ,या बाबतीत मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, 8 जानेवारी 2009 रोजी कोर्टाचा निर्णय झाल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत यामध्ये काही धोरणात्मक बदल करण्यात येतील त्याचबरोबर यासंदर्भात ज्या काही चांगल्या सूचना असतील त्या ग्राहय धरुन त्यासबंधी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर :सभापती महोदय, तीन महिन्यापूर्वी आंतरराष्ट्रीय विमानतळावर असलेल्या टॅक्सी स्टॅन्ड मधून पेड टॅक्सी व्दारे मी प्रवास असताना माझ्या बाबतीत जी प्रकार घडला होता त्यासंबंधी मी माननीय मंत्र्याकडेसुध्दा तक्रार केली होती. त्या टॅक्सी चालकाने मला उदधटपणे उत्तरे दिली होती त्याचबरोबर ती टॅक्सी प्रवास करण्यास योग्य नव्हती, तिला टेल लॅम्प नव्हता. तेव्हा अशा प्रकारच्या टॅक्सीज आंतरराष्ट्रीय विमानतळावर ठेवण्यात येणार आहे काय ? की अशा प्रकारच्या टॅक्सीजवर बंदी आणण्यात येणार आहे काय ? या प्रकरणी संबंधित इन्सपेक्टर बरोबर मी चर्चा केली असता त्या इन्सपेक्टरने असे सागितले की याबाबतीत आम्ही कोणत्याही प्रकारची कारवाई करु शकत नाही. तेव्हा या संदर्भात शासन कोणत्या प्रकारची उपाययोजना करणार आहे ?

डॉ.सतीश पाटील :सभापती महोदय, प्रवाशांना सुखकारक व आरामदायक प्रवास करता यावा या दृष्टीने चांगली टॅक्सी असावी यासाठी कलम 74 मध्ये तरतूद करण्यात आली आहे .नवीन धोरणात्मक निर्णय घेत असताना या संदर्भातील सूचनांचा समावेश त्यात करण्यात येईल. कलम 74 अन्वये टॅक्सी चांगल्या प्रकारची असली पाहिजे हा महत्वाचा मुद्दा त्यात राहणार आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, आंतरराष्ट्रीय विमानतळावर सगळया प्रीपेड टॅक्सीज चांगल्या व सुस्थित राहणार आहेत काय त्या ठिकाणी खराब टॅक्सीजना बंदी आणणार आहात काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सतीश पाटील :सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, प्री पेड टॅक्सीजची व्यवस्था आंतरराष्ट्रीय विमानतळावर करण्यात आली आहे त्या प्रमाणे सांताक्रुझ येथील आंतरर्देशीय विमानतळावर देखील व्यवस्था करण्यात येणार आहे काय ?

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय, तशी व्यवस्था करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

: पृ.शी. भांडूप परिमंडळात नव्याने बसविण्यात आलेली विजेची मिटर्स दोन महिन्यात बंद पडणे

मु. शी. : भांडूप परिमंडळात नव्याने बसविण्यात आलेली विजेची मिटर्स दोन महिन्यात बंद पडणे यासंबंधी सर्वश्री. दिवाकर रावते, अरविंद सावंत, अनिल परब, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने राज्यातील लाखो ग्राहकांना पुरविलेले विद्युत मीटर दोन महिन्यात बंद पडणे, विशेषत: मुंबईतील भांडूप परिमंडळातील ग्राहकांना बसविलेले विद्युत मीटर नव्याने बसवूनही त्याच महिन्यात बंद पडणे, बंद पडलेल्या मीटरमुळे संबंधित अधिकाऱ्यांकडून वीज ग्राहकांकडून वसूल करण्यात येणारी अनावश्यक व अवास्तव देयकाची रक्कम, त्यामुळे भांडुप परिमंडळातील हजारो वीज ग्राहक हैराण होणे, ग्राहकांच्या तक्रारीची तत्परतेने दखल न घेणे, विद्युत मीटर बंद पडल्यावर त्याची रिडींग घेऊन ती ईश्वर नगर भांडूप (प) मुंबई येथील कार्यालयात आणून देण्याची करण्यात येत असलेली बेकायदेशीर सक्ती, नादुरुस्त मीटर नवीन न देता जुने मीटर दुरुस्त करुन ते ग्राहकांना देण्यात येणे, मीटरची तक्रार व बदलण्यासाठी फक्त एकच सहाय्यक अभियंता भांडूप (प) कार्यालयात असल्याने नादुरुस्त मीटर बदलून मिळण्यासाठी शेकडो ग्राहकांना वारंवार जावे लागणे, अधिकारी कार्यालयात हजर नसणे, कर्मचारी व अधिकारी कार्यालयात वेळेवर न येणे, वीज मीटर पुरविणाऱ्या कंपनीने अत्यंत हलक्या प्रतीचे मीटर पुरवित असल्याने ते बसविताच बंद पडत असणे, अशा प्रकारे भांडुप ईश्वर नगर येथील कार्यालयातील अधिकारी हेतूपुरस्सररित्या वीज ग्राहकांना जूनेच विद्युत मीटर बसवून त्यांची करीत असलेली फसवणूक, महाविज वितरण कंपनी लाखो ग्राहकांना पुरवित असलेले मीटर हे निकृष्ट असल्याने ग्राहकांना होणारा सतत त्रास, परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे (उर्जा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदना नतर

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय , वीज ग्राहकांची विजेच्या मिटर्सच्या संदर्भात होणारी फसवाफसवी हा लक्षवेधी सूचना मांडण्या मागचा मूळ उद्देश् असून मिटर्स कोणत्या टेन्डीरच्या दराने घेतात, मिटर्स घेण्यापूर्वी कशा प्रकारच्या चाचण्या घेण्यात येतात याबाबतीत निवेदनाच्या एक ते सहा परिच्छेदामध्ये खुलासा करण्यात आलेला असला तरी सत्य परिस्थिती अशी आहे की , कंपनीकडून जी मिटर्स पुरविण्यात येतात ती मिटर्स लावल्यानंतर अनेक ठिकाणी एक महिन्यात ती बिघडतात 135 नवीन जोडण्या दिल्यानंतर त्यापैकी 110 मिटर्स बिघडली होती. मुलुंड आणि भांडूप परिसरात लावण्यात येणारी 50 टक्के मिटर्स नादुरुस्त निघाली ही बदलण्याची जबाबदारी कंपनीची असली तरी मिटर्स बिघडल्यानंतर मिटर्स बदलण्याची प्रक्रिया लवकर होत नाही, बिघडलेल्या मिटर्सचे अव्वाच्या सव्वा ॲव्हरेज बिल येत असल्यामुळे ग्राहकाला निष्कारण जादा भुर्दड द्यावा लागतो. अमुक ठिकाणी लोकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी योजना करण्यात आली असल्याचा उल्लेख निवेदनामध्ये करण्यात आला आहे. ही योजना आहे परंतु एक महिन्यात मिटर्स बिघडल्यानंतर दोन मिहन्यात मिटर्स बदलून दिले जात नाही तेव्हा मिटर्स लवकर बदलून देण्याकरता अधिकारी भ्रष्टाचार,करतात. बिलाची रक्कम कमी करण्यासाठी अध्किारी भ्रष्टचार करतात. जे मिटर्स बिघडलेले असते त्याची जबाबदारी कंपनीची आहे. अशा बिघडलेल्या मिटर्सच्या बाबतीत त्यांचाच दोष आहे. तेव्हा बिघडलेले मिटर्स बदलून देई पर्यत 50 टक्के विजेचे बिल घेंण्यात यावे व नंतर उर्वरित रककम घेण्यात यावी .अनेक मिटर्स बिघडल्यामुळे कारण नसतांना ग्राहकाना भूर्दन्ड सहन करावा लागतो.लाखो मिटर्सचा हा प्रश्न असल्यामुळे या संदर्भात शासनाने धोरण जाहीर केले पाहिजे. मिटर्स बंद पडल्यानंतर जे बिल येते ते कमी करण्यात यावे हा एक मुद्दा आहे, त्याचबरोबर नादुरुस्त मिटर्स त्वरित बदलून दिले पाहिजे हा दुसरा मुद्दा आहे आणि अधिकारी जागेवर राहत नाहीत हा तिसरा मुद्दा असून जे अधिकारी भ्रष्टाचार करतात तो कसा थांबविण्यात येणार आहे?

नंतर श्री. सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मीटर नादुरूस्तीच्या संबंधात सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी सांगितले त्या पद्धतीने आपण आता सबंध महाराष्ट्रात सगळी मीटर्स बदलण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. लावण्यात आलेली मीटर्स मोठ्या प्रमाणात नादुरूस्त आहेत ही वस्तुस्थिती मी निवेदनातूनच मान्य केली आहे आणि 135 मीटर्स आपण तपासली त्यातील 110 मीटर्स सदोष असल्याचे आढळून आले आहे. सभापती महोदय, मीटर नादुरूस्त असल्याची तक्रार ग्राहकाने केल्यानंतर एक महिन्याच्या आत तेथे नादुरूस्त मीटर बदलून नवीन मीटर लावले गेले पाहिजे अशी भूमिका निश्चितपणे घेतली जाईल. सन्माननीय सदस्यांचा दुसरा मुद्दा असा होता की, अशी सदोष मीटर बदले पर्यंत ग्राहकांना जे ॲव्हरेज बिल आकारण्यात येते त्याबाबतीत त्यांनी सांगितले की, सुरूवातीस 50 टक्के रक्कम घ्यावी आणि नंतर ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी असे म्हटलेले नाही. माझे याबाबत असे म्हणणे आहे की, माझे नियमित बिल 1 हजार, 2 हजार रूपये येत असेल आणि माझे मीटर बंद पडले म्हणून मंडळाने जर मला ॲवरेज बिल 5000 रूपये पाठविले तर ते बरोबर नाही. असे झाले की, ग्राहक आपल्याकडे येऊन गयावया करून सांगतो की, मला कधीही 1 हजार, 2 हजार रूपयांपेक्षा जास्त बिल आलेले नाही, येत नाही. पण आपले अधिकारी त्याला सांगतात की, पहिल्यांदा बिलाचे पैसे भर आणि नंतर मग तक्रार कर, पैसे भरले असतील तरच तुझ्या तक्रारीची दखल घेतली जाईल. कारण आपला तसा नियमच आहे. खरे तर यामध्ये खराब झालेले, नादुरूस्त असलेले मीटर बदलून देण्याची जबाबदारी कंपनीची-मंडळाची आहे. आता कंपनीनेच मीटर खराब दिलेली असल्याने ते लवकर बंद पडते आणि त्याचा फटका ग्राहकाला बसतो म्हणून माझे म्हणणे की, मीटर बंद पडले तर जे काही वीज बिल आपण ॲवरेज म्हणून आकारता त्याच्यातल 50 टक्के रक्कम आपण ज्या कंपनीचे मीटर असेल त्या कंपनीवर टाका, त्याच्यावर देखील त्याबद्दल कारवाई झाली पाहिजे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण मीटर खराब, नादुरूस्त झाल्यानंतर जे ॲव्हरेज बिल आकारणी करतो ती आकारण करताना मीटर नादुरूस्त होण्यापूर्वी म्हणजे मीटर सुरू असतानाचे त्याचे 2-4 महिन्यांचे बिल किती येत होते, त्याचा वीजेचा वापर किती आहे हे लक्षात घेऊनच ॲव्हरेज बिल आकारणी करीत असतो. आता नवीन मीटर घेतो तेव्हा ती चांगल्या दर्जाचीच असली पाहिजेत याबद्दल दुमत नाही. त्याबद्दल आपण संबंधित कंपनीवर जी काही कारवाई करणे अपेक्षित आहे ती जरूर केली जाईल. ..... एफएफ 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, खरे तर वीज ग्राहकाला दर महिन्याला वीज देयक मिळणे गरजेचे आहे. परंतु 3-3 महिने त्याला वीज देयक मिळत नाही आणि त्यामुळे वीज आकारणीच्या बाबतीत जे स्लॅबस् ठरलेले असतात त्या स्लॅबस् त्याच्या बिलामध्ये वाढतात. म्हणजे शून्य ते 100, 100 ते 200, 200 ते 400 अशा स्लॅब नुसार आपली बिल आकारणीचे दर ठरविलले असतात. त्याप्रमाणे दर महिन्याला बिल देयक न मिळाल्याने व दोन तीन महिन्यांचे एकदम देयक आल्याने त्याच्या देयकामध्ये वीज वापराची स्लॅबस् वाढतात आणि परिणामी त्याला अधिक दर आकारणीचे देयक येते. म्हणून एक महिन्याच्या आत मध्येच वीज ग्राहकांना वीज देयक मिळणार काय ?

श्री. सुनील तटकरे : होय.

(**सभापतीस्थानी - माननीय सभापती.**)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही नवीन मीटर्स जेव्हा मंडळाने विकत घेतली तेव्हा किती कंपन्यांची टेंडर्स आली होती ? मुळात ही सर्व मीटर्स सदोष आहेत आणि ज्या कंपनीकडून ही मीटर्स घेण्यात आली त्या कंपनीला फेवर करून मीटर्सची ऑर्डर त्यांना दिलेली आहे. तेव्व्हा ते लक्षात घेऊन त्या मीटर्सचा दर्जा आपण ती घेताना तपासला होता का ? अर्थात त्या बाबतची सगळी प्रोसिजर आपण पूर्ण केली असणार पण तरीही यात काही तरी घोटाळा झालेला आहे. म्हणून ही मीटर्स विकत घेण्याचा जो काही व्यवहार झाला आहे त्याची आपण चौकशी करणार काय ?

श्री. सुनील देशमुख : सभापती महोदय, ही मीटर्स घेताना ती कोणकोणत्या कंपन्यांकडून घेण्यात आली त्याबद्दल काय प्रोसिजर पार पाडली वगैरे सर्व माहिती आता माझ्याकडे आहे. ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. पण तरीह मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्यांचयाकडून अशा प्रकारची सदोष मीटर्स पुरविली गेली आहेत त्यांची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, मीटरमध्ये परस्पर फेरफार करून शासनाचे लाखो रूपयांचे नुकसान करणारी एक टोळी काही दिवसांपूर्वीच पकडण्यात आली आहे, हे खरे आहे काय? असल्यास, अशा पद्धतीने ज्या काही टोळ्या काम करीत असतल आणि शासनाचे लाखो रूपयांचे नुकसान करीत असतील त्यांच्यावर अंकुश येण्याच्या दृष्टीने अशा लोकांना कठोर शिक्षा होण्यासाठी आपण आपल्या नियमात काही बदल करणार का ? (यानंतर जीजी ...1..

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ....

त्याबाबत हे शासन कडक कारवाई करणार आहे काय? किंवा नियमात बदल करणार आहे काय?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न लक्षवेधी सूचनेशी निगडीत नसला तरी वीज चोऱ्यांमुळे मंडळाचे वारंवार जे नुकसान होत आहे त्याबाबत आम्ही वेळोवेळी ड्राईव्ह घेत आहोत. वेगवेगळया भागात ड्राईव्ह घेतला जात असल्यामुळे अनेक वेळा चोऱ्या पडण्यात आल्या. त्यावेळी वीज चोरी करणाऱ्यांवर कठोर अशाप्रकारची कारवाई केली जाते. याबाबत चुकीचे रिडींग होऊ नये म्हणून मीटरचे फोटो रिडींग सुध्दा घेण्याची पध्दत सुरु केली आहे. त्यामुळे ग्राहकांच्या मनात संभ्रम रहाणार नाही याची दक्षता हे मंडळ घेईल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मुलुंड आणि भांडूप या परिसरात रहाणारी जनता मुंबई शहरात रहात असतांना त्यांच्यावर भारनियमनाचा अन्याय कां? आज महाराष्ट्राच्या अनेक ग्रामीण भागात भारनियमन सुरु आहे. त्याप्रकारची परिस्थिती आज मुलुंड आणि भांडूपच्या परिसरात रहाणाऱ्या नागरिकांना सहन करावी लागत आहे. मी स्वत: मुलुंड येथे रहात आहे. त्यामुळे मला मुंबई शहरामध्ये राहून सुध्दा भारनियमनचा त्रास सहन करावा लागत आहे.त्याचप्रमाणे नादुरुस्त मीटर असतांना जास्त प्रमाणात बिल आले तर ते कमी करुन देवू अशाप्रकारे आपले काही अधिकारी सांगत फिरत असतात. ते रहिवाश्यांकडे जातात आणि आम्ही तुमचे मीटर बरोबर करुन देतो असे सांगतात. एम.एस.ई.बी. च्या अधिकाऱ्यांनी आम्हाला पाठविले आहे, आम्ही तुमचे मीटर दुरुस्त करुन देतो असे सांगून ते दुसरा मीटर बसवितात. परंतु एम.एस.ई.बी. चे अधिकारी सांगतात की, आमच्याकडून अधिकृतपणे हा मीटर बसविलेला नाही. त्यामुळे तुम्ही दंड भरला पाहिजे. अशाप्रकारचा अन्याय आपल्या अधिकाऱ्यांकडून होत आहे. अशा त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांचा त्रास दूर करण्यासाठी आपण त्यांच्यावर कारवाई करणार काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी याबाबत स्पेसिफिक तक्रार केली तर त्याबाबत चौकशी केली जाईल. आणि त्यामध्ये अशाप्रकरे अधिकारी दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, ग्रामीण भागात फोटो रिडींग घेतले जाते. त्या फोटो रिडींग घेणाऱ्या व्यक्तींकडून मीटर बंद असल्याचेही फोटो घेतले जातात. त्याची नोद घेऊन तातडीने हे मीटर बदलून मिळतील काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. सुनील तटकरे : माननीय सदस्यांनी मघाशी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना मी याबाबत सांगितले आहे की, जर मीटर नादुरुस्त झाल्याची तक्रार ग्राहकांनी केली तर विशिष्ट कालावधीत अधिकाऱ्यांनी मीटर बदलून दिले नाही तर मीटरचे रिडिंग घेणाऱ्यावर सुध्दा कारवाई करु.

सभापती : शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची अशी ही लक्षवेधी सूचना आहे. वीज मंडळामार्फत अनेक ठिकाणी फॉल्टी मीटर बसविण्यात आल्यामुळे ग्राहकांच्या वीज बिलामध्ये वाढ होते. त्यादृष्टीने या विषयावर फक्त चर्चा न करता शेतकरी आणि ग्राहकांवर होणाऱ्या अन्यायाच्या बाबतीत माननीय मंत्र्यांनी या बाबतीत लक्ष घालावे. अशी माझी त्यांना विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 1 संदर्भात माननीय सभापतींनी दिलेला निर्णय

सभापती : सभागृहाच्या आजच्या कामकाजामध्ये पहिल्या क्रमांकावरील दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना मी तहकूब केली आहे. या संदर्भात सन्माननीय मंत्री डॉ. विमलताई मुंदडा यांचेबरोबर मी सायंकाळपर्यंत चर्चा करणार आहे. त्याचबरोबर माननीय राज्यमंत्र्यांकडून सुध्दा याबाबतीत मी संपूर्ण माहिती घेईन. सदरची लक्षवेधी सूचना पुन्हा केव्हा चर्चेला घ्यायची याबाबत मी वेगळा निर्णय घेईन. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेवर आज चर्चा होणार नाही. सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मी निर्णय घेतला आहे.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अलिबाग तालुक्यातील वरसोली व चाळमळा दरम्यान बांधलेल्या ग्रोयन्स पध्दतीच्या बंधाऱ्याची धूप होऊन गावांना समुद्राच्या पाण्यापासून निर्माण झालेला धोका

मु. शी. : अलिबाग तालुक्यातील वरसोली व चाळमळा दरम्यान बांधलेल्या ग्रोयन्स पध्दतीच्या बंधाऱ्याची धूप होऊन गावांना समुद्राच्या पाण्यापासून निर्माण झालेला धोका यासंबंधी सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय बंदरे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) वरसोली व चाळमळा दरम्यान मच्छिमारांच्या नौकांसाठी ग्रोयन्स पध्दतीचा बंधारा सन 2005 मध्ये बांधून त्या ठिकाणी खाडी निर्माण होणे, त्यामुळे दोन्ही गावातील मच्छिमारांनी पकडलेल्या मच्छीची वाहतूक करणे सोईचे होणे, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र, पुणे- खडकवासला यांनी सन 2005 पूर्वी सर्व्हेक्षण करणे, तांत्रिक सल्ल्यानुसार बंधाऱ्याचे पुढील बांधकाम सुरु करण्याचे प्रस्तावित करणे, सदर बंधाऱ्याच्या संरक्षणासाठी अद्याप निधी उपलब्ध करुन दिलेला नसणे, त्यामुळे समुद्राच्या तीव्र लाटांनी बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूकडून धूप होणे व बंधाऱ्याचे मूळ स्वरुप नष्ट होणे, पर्यायाने बंधाऱ्याचा चॅनेलमध्ये गाळ साचणे, पाण्याचा निचरा होऊ न शकल्याने वरसोली व चाळमळा गावांना समुद्राच्या पाण्यापासून पुराचा धोका निर्माण होणे, सबब स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे व चिंतेचे वातावरण व याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर (बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, रुपये 29,38,50,156/- एवढ्या अंदाजित रकमेचे सुधारित अंदाजपत्रक सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे प्राप्त झाले असून अंदाजपत्रकाची छाननी झाली आहे. सदर प्रस्तावासंबंधी आवश्यक अनुपालन अहवाल पत्तन अभियंता, कोकणभवन यांचेकडून केव्हा प्राप्त झाला ? हे काम किती दिवसात पूर्ण होईल ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, अहवाल प्राप्त झालेला आहे आणि मेरीटाईम बोर्ड त्याबाबतीत निर्णय घेणार आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांकडून उत्तर आलेले नाही.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, अहवाल प्राप्त झालेला आहे. मेरीटाईम बोर्ड तपासणी करीत आहे.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना कोकणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. कोकणातील चार जिल्ह्यांमधील धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांसंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. याबाबतीत या चार जिल्ह्यांकडे शासन कायम दुर्लक्ष करीत आहे. धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या बाबतीत कोकणपट्टीतील बऱ्याच गावांना धोका निर्माण झालेला आहे. उभादांडा, देवबाग अशी किती तरी गावांची नावे सांगता येतील. त्या ठिकाणी दहा पंधरा वर्षांपूर्वी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे परंतु पैसे मिळालेले नाहीत. माझी शासनाला विनंती आहे. शासनाचे असे म्हणणे आहे की, हे काम डीपीडीसीतून घ्यावे. मी उदाहरण म्हणून सांगेन की, सिंधुदुर्ग जिल्ह्याचा 40 कोटी रुपयांचा प्लॅन आहे. त्यातूनही 3 कोटी रुपये दिलेले आहेत. आधी यासाठी शासनाकडून स्टेट फंडातून पैसे मिळावयाचे तसे पैसे आता मिळतील काय ? या बंधाऱ्यांच्या संदर्भात या चार जिल्ह्यात वेगळा विचार करणार काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, बंधाऱ्यांसंबंधीचे आर्थिक अंदाजपत्रक जिल्हा नियोजन मंडळाकडे असते. शासकीय अंदाजपत्रकात त्याची तरतूद नाही. अशी तरतूद असावी याबाबत आपण बराच प्रयत्न केलेला आहे. मेरीटाईम बोर्डाकडून तसा प्रस्ताव आलेला आहे. तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. राज्याच्या बजेटमधून बंदरे खात्याचे सर्व प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/ KTG/ SBT

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर .....

सोडविले पाहिजेत. ते स्टेट बजेटमध्ये घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. हल्ली डीपीडीसीमधून हे पैसे खर्च होतात.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, डीपीडीसीची 40 कोटीची योजना आहे आणि या 29 कोटी रुपयांचे हे काम आहे. आधी स्टेट फंडातून पैसे देण्यात येत होते तसे या चार जिल्ह्यांच्या बाबतीत खास बाब करुन शासन पैसे देणार काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. स्टेट बजेटमधून ते करावे यादृष्टीने प्रयत्न करीत आहोत.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, आदरणीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. डीपीडीसीमधून हे काम होणार नाही. हा केवळ रायगड जिल्ह्याचा प्रश्न नसून कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि काही प्रमाणात ठाणे जिल्ह्यामध्ये सुध्दा अशा प्रकारची धूप होते. तेथील मच्छिमार किंवा जे इतर लोक आहेत त्यांना त्याचा त्रास होतो. आमच्यासारख्या लोकांनी संबंधित खात्याच्या मंत्र्यांना पत्र पाठवून आणि भेटून चर्चा केलेली आहे की, ज्या ठिकाणी धूप होते त्या ठिकाणी काम केले पाहिजे. त्यासाठी डीपीडीसीमधून पैसे द्यावयाचे असे न करता शासनाने या मागणीला आग्रहाने प्राधान्य द्यावे अशी माझी मागणी आहे.

तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते) : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर प्रश्न विचारतील.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी फक्त विनंती केलेली आहे त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी प्रश्न विचारावा.

यानंतर श्री. गिते ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय,

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, वरसोली व चाळमळा दरम्यान मच्छिमारांच्या नौकांसाठी ग्रोयन्स पध्दतीचा बंधारा बाबत मी लक्षवेधी सूचना विचारलेली आहे. संपूर्ण कोकणातील बंधा-यांचे प्रश्न उपस्थित करुन माझ्या लक्षवेधी सूचनेवर अन्याय होत आहे. माननीय मंत्री महोदयांकडून माझ्या एकही उपप्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : मी आपणास पुन्हा प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करुन देईन. सन्माननीय सदय श्री. परशुराम उपरकर यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, कोकणातील सर्व जिल्हयातील बंधा-यांच्या बाबतीत मागील वर्षी या सभागृहात चर्चा झालेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी या बंधा-यांसाठी डी.पी.डी.सी.मधून पैसे घ्यावेत अशा प्रकारचे उत्तर दिले आहे. यासंदर्भात मागील चर्चेच्या वेळी शासनाकडून कोकणातील बंधा-यांच्या कामासाठी बजेटमधून पैसे उपलब्ध करुन दिले जातील अशा प्रकारचे उत्तर दिले होते. परंतु या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदय हे अतिशय चाकोरीतील उत्तर देत आहेत. कोकणातील ज्या बंधाऱ्यांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, त्या बंधा-यांच्या कामासाठी येत्या अर्थसंकल्पात माननीय मंत्री महोदयांकडून तरतूद करण्यात येईल काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, कोकणातील चार जिल्हयातील बंदरांचा विकास आणि खाडींसंबंधातील कामांसाठी डी.पी.डी.सी.कडून निधी उपलब्ध करुन दिला जातो. या कामांचा राज्यस्तरीय योजनेमध्ये समावेश करावा व त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी अशा प्रकारचा प्रस्ताव नियोजन मंडळाकडे पाठविला आहे. हा विषय मंत्रिमंडळासमोर ठेवला जाणार आहे. त्यामुळे सदरहू प्रस्ताव नियोजन मंडळाकडे पाठविला असून, त्या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतरच त्या कामांचा राज्यस्तरीय योजनेमध्ये समावेश करता येईल.

श्री. दिवाकर रावते : कोकणात बंधा-यांच्या कामांचा मोठया प्रमाणात अनुशेष आहे. सदर बंधाऱ्यांची कामे अनुशेष क्षेत्रातील असल्यामुळे ती कामे पूर्ण करण्यासाठी प्राधान्याने येत्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : यासंबंधातील प्रस्तावास नियोजन मंडळाकडून मान्यता मिळाल्या तो प्रस्ताव शासनाकडे जाईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : कोकणात बंधा-यांच्या कामांचा अनुशेष खूप आहे. तो दूर व्हावा व त्या विभागातील बंधा-यांची कामे पूर्ण व्हावीत म्हणून येत्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊ.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या बंधा-याचे अंदाजपत्रक दोन टप्पात बनविले आहे ही गोष्ट खरी आहे काय ? या बंधा-याच्या कामावर मेरीटाईम बोर्डाने 7 कोटी रुपये खर्च केलेला आहे ही गोष्ट देखील खरी आहे काय ? परंतु या बंधा-यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला नाही त्यामुळे सदर काम अपूर्ण आहे व त्यामुळे 7 कोटी रुपयांचा मेरीटाईम बोर्डाचा निधी वाया जाणार आहे. म्हणून वरसोली बंधा-यांच्या कामासाठी स्टेट पूलमधून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांचे म्हणणे तितकेसे बरोबर नाही.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर.....

याचे कारण 2004 मध्ये त्याला मंजुरी मिळविली, ते काम चालू झाले. परंतु समुद्राच्या लाटांमुळे आणि तुफानामुळे ते काम पूर्ण होऊ शकले नाही. 500 मीटर काम करावयाचे होते, त्याऐवजी 135 मीटर इतके काम झाले, परंतु ते काम पूर्ण होऊ शकले नाही. मेरीकडे काम दिले होते. मेरीचे काम समाधानकारक होते. त्यानंतर हे काम करण्यास सीडब्ल्यूपीला सांगितले. त्यांनी रिव्हाईज एस्टीमेट करुन दिल्यानंतर पुन्हा दुरुस्ती केली. पहिल्यांदा 2004 मध्ये काम झाल्यानंतर 2005 मध्ये दुरुस्ती केली. तरी समुद्राच्या लाटांमुळे ते काम करु शकत नव्हते. म्हणून पुन्हा दुसरे एस्टीमेट केले आणि काम सुरु केले. परंतु ते काम पूर्ण होऊ शकले नाही. म्हणून पुन्हा अधिकाऱ्यांनी दुसरे एस्टीमेट तयार केले. कायमस्वरुपी हे काम करावयाचे असेल तर एक-एक हजार मीटर काम केले पाहिजे तरच काम चांगले होऊ शकेल आणि एवढे बजेट आपल्याकडे नाही म्हणून 500-500 मीटर काम सुरुवातीला करावे असे प्रस्तावित केले आणि त्याप्रमाणे अभियंत्यांनी एस्टीमेट केले ते 32 कोटी रुपयांचे होते. ते एस्टीमेट मेरिटाईम बोर्डाकडे पाठविले. मेरिटाईम बोर्डाने त्यामध्ये दुरुस्ती करुन ते रु.29, 38, 40, 156 इतक्या किंमतीचे केले आणि एस्टीमेट मंजूर केले असून ते प्रस्तावित आहे. बजेट उपलब्ध झाल्यानंतर या कामाला सुरुवात करण्यात येईल. परंतु शासनाकडे राज्यस्तरीय म्हणून मेरिटाईम बोर्डाने हा प्रस्ताव पाठविला आहे. शासनाने मंजुरी दिली तर राज्यस्तरीय बजेटमध्ये मेरिटाईम बोर्डाची सर्व कामे होतील. सध्या मेरिटाईम बोर्डाकडे बजेट आहे त्यामधून एवढी मोठी बंधाऱ्यांची कामे होऊ शकत नाहीत. म्हणून राज्यस्तरीय योजनेतून ही कामे घेतली पाहिजेत. त्यासाठी आमचा प्रयत्न सुरु आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी चुकीचे रेकॉर्ड होऊ नये म्हणून सांगतो. त्याठिकाणी समुद्राच्या लाटांपासून बांधकाम थांबलेले नाही. मी त्या गावचा जावई आहे, मी रोज तेथे जात असतो. हे का चालले आहे तेच मांडण्याचा प्रयत्न करतो. पहिल्यांदा 8 कोटी रुपयांचे काम झाले. पुढील वर्षी 16 कोटीचे काम होणार होते. आता दर वाढल्यामुळे 29 कोटीपर्यंत अंदाजपत्रक तयार झाले आहे. त्याठिकाणी पावसाळयात लाटा येतात. आता लाटा येत नाहीत. म्हणून हे काम स्टेट पूलमधून होत नसेल तर मेरिटाईम बोर्डाच्या फंडातून होणार आहे का? मेरिटाईम बोर्डाला सध्या चांगले उत्पन्न मिळत आहे. 8 कोटी रुपयांचे झालेले काम वाया जाऊ नये म्हणून मेरिटाईम बोर्डाच्या फंडातून हे काम करण्यात येईल का? दोन कोळीवाडयांचा प्रश्न

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

आहे. 700 मच्छिमारांच्या बोटी त्याठिकाणी येतात. त्याठिकाणी हा बंधारा बांधण्यासाठी त्याचे एस्टीमेट तयार करण्यापासून मेरी, नाशिक ते खडकवासलापर्यंत जाण्यासाठी मी त्यात भूमिका घेतली आहे. आमच्या क्षेत्रातील आमदारांची बैठक घेऊन हा प्रश्न सोडविण्यात येईल काय?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, मी यापूर्वी जे सांगितले ते अगदी योग्य आहे. परंतु सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर मी बैठक घ्यायला तयार आहे. यापूर्वी मी दोन वेळा कोकणातील आमदारांची बैठक बोलावण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणीही उपस्थित राहिले नाहीत. इतकेच नव्हे तर मी रत्नागिरी येथे जाऊन बैठक घेतली. सर्व आमदारांना बोलावले होते. परंतु एकच आमदार बैठकीला उपस्थित राहिले. कोकणाबाबत आपल्याला आपुलकी आहे. आपण जरुर बैठकीला उपस्थित रहावे, हे प्रश्न आम्हाला सोडवायचे आहेत.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी फार चांगली माहिती दिलेली आहे. त्यांनी असे सांगितले की, कोकणातील आमदार ज्यावेळेस स्पेशल चर्चा घेण्यासंबंधीची मागणी करतात त्यावेळी कोणीच उपस्थित नव्हते.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय मंत्री महोदयांनी कोकणातील आमदारांची बैठक आयोजित केली परंतु कोणीच उपस्थित नव्हते, असे सांगितले. परंतु चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी अशी विनंती करतो की, अशी जी बैठक माननीय मंत्री महोदयांनी आयोजित केली होती की त्या बैठकीला कोकणातील एकही आमदार उपस्थित राहिला नाही असे त्यांनी सांगितले, त्या बैठकीचे निमंत्रण पत्र व आम्हाला ते दिल्याची रिसीट दाखवावी. कारण बैठक आयोजित केली आणि कोकणातील आमदार गेलो नाही असे होणार नाही. म्हणून माझी अशी सूचना आहे की, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, ते गाव त्यांची सासुरवाडी आहे. त्यांच्या सासुरवाडीलाच माननीय मंत्री महोदयांनी बैठक आयोजित करावी, जेणेकरुन सन्माननीय सदस्य देखील येतील.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : मी कोकणात चार वेळा गेलो होतो, सर्व बंधाऱ्यांना भेटी दिल्या, खाडीला भेट दिली तसेच ही कामे लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने सतत माझा प्रयत्नही असतो. या कामासंबंधीचा मास्टर प्लॅन देखील मी तयार करण्यास सांगितला आहे. मग त्यात मच्छिमार बंधारा अथवा कुठलेही काम असो त्याबाबत मी प्रयत्नशील असतो. तसेच सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार कोकणातील आमदारांची बैठक घेण्यासही मी तयार आहे. अशा प्रकारे ज्या ज्या गोष्टी करता येण्यासारख्या आहेत त्या सर्व करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते) : सभागृहाची बैठक दुपारी अर्ध्या तासाकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.12 ते 3.42 पर्यंत स्थगित)

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोय, सभागृहात एक सुध्दा कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

उपसभापती : सभागृहाची बैठक 4.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.43 ते 4.00 वाजेपर्यंत स्थगित.)

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगिती नंतर

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)

<u>विशेष उल्लेख</u>

पृ.शी :लोकमान्य हायस्कूल, मौदा. जि.नागपूर येथील शिक्षकांना संस्था चालकाने सेवामुक्त करणे

मु.शी :लोकमान्य हायस्कूल, मौदा,जि. नागपूर येथील शिक्षकांना संस्था चालकांनी सेवामुक्त करणे याबाबत श्री.व्ही.यु.डायगव्हाणे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) :माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे . त्यांनी ती मांडावी.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक):सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो .

"लोकमान्य हायस्कूल, मौदा (जि. नागपूर) या शासन मान्य अनुदानित माध्यमिक शाळेतील सेवेत कायम असलेल्या सर्वच शिक्षक कर्मचा-यांना दिनांक 15.5.2008 पासून शाळा बंद करावयची आहे हे कारण देऊन संस्थाचालकांनी सेवामुक्त केले आहे. या निर्णयाला माननीय पीठासीन अधिकारी शाळा न्यायधिकरण, नागपूर यांनी दिनांक 23 जुलै 2008 रोजी पुढील प्रमाणे स्थगिती निर्णय दिला आहे .

"(1) Application is allowed. (2) The order of terminating the services of the Appellants issued by the Respondent No. 1 dated 15-5-2008 is stayed till the final decision of the appeal. (3) The Respondents No. 1 and 2 shall allow the Appellants to join their duties and pay their regular salary."

या आदेशचे संस्थेने पालन केले नाही . शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांचे दिनांक 29.7.2008 च्या पत्राव्दारे 24 तासाच्या आत न्यायाधिकरणाच्या आदेशाचे पालन करावे असे कळविले आहे. शिक्षण उप संचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी त्यांच्या 1 सप्टेंबर 2008 च्या पत्राव्दारे सर्व कर्मचा-यांना तात्काळ रुजू करावे अन्यथा शाळेविरुध्द कारवाई करण्यात येईल

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे कळविले आहे. एवढे करुनही संस्थाचालक कर्मचा-यांना रुजू करुन घेण्यास तयार नाही. या गंभीर बाबी लक्षात घेऊन सर्व कर्मचारी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनांनी संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करावी अशी मागणी केली आहे.या गंभीर प्रकरणामुळे शासनाने लक्ष द्यावे यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : उरण तालुक्यातील (जि.रायगड) ओएनजीसी प्रकल्पाच्या प्रदूषणा मुळे नागरिकांना होणारा त्रास

मु.शी : उरण तालुक्यातील (जि. रायगड) ओएनजीसी प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे नागरिकांना होणारा त्रास याबाबत श्री. जयंत प्र.पाटील. वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) :माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे . त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो .

" रायगड जिल्हयात देशातील सर्वात मोठया ऑईल नॅचरल ॲण्ड गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी) च्या उरण येथील प्रकल्पातून वाया जाणारा वायू जाळल्याने त्याचा धूर चिमणीव्दारे उरण परिसरात पसरत असल्याने या धुरामुळे येथील नागरिकांना त्रास होत आहे.

या परिसरात येणारा वायूचा उग्र वास, वायू गळतीमुळे लागलेल्या आगीचा परिणाम येथील जनता भोग असतांना प्रकल्पातील चिमणीव्दारे जाळलेल्या वायूचा धूर आता त्रासदायक ठरू लागला आहे.

हा दररोजचा निघणारा ओएनजीसीचा धूर विविध आजाराच्या माध्यमातून उरणकरांसाठी भविष्यात त्रासदायक ठरणारा आहे.

सबब शासनाने या गंभीर प्रकरणी योग्य ती दखल घ्यावी यासाठी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी पीपल्स एज्युकेशन सोसायटीला क्रीडा संकुलासाठी मंजूर केलेली रक्कम अद्याप न देणे

पृ.शी पीपल्स एज्युकेशन सोसायटीला क्रीडा संकुलासाठी मंजूर केलेली रक्कम अद्याप न देण्याबाबत श्री.रामनाथ मोते वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) :माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे . त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक):सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो .

गोरगरीब व दिनदुबळया मुलाना शिक्षणाची कवाडे खुली व्हावीत या हेतुने भारतरत्न डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांनी पीपल्स एज्युकेशन. सोसायटीची स्थापना केली होती. संस्थेची सहा महाविद्यालये असुन सुमारे 15 हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेने शिवडी - वडाळा परिसरात 5 एकर जागेवर क्रीडा संकुल उभारण्यासाठी जागा राखीव ठेवली आहे. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवा निमित्त 2004 मध्ये राज्य शासनाने क्रिडा संकुलासाठी चार कोटी व स्मृती सभागृहासाठी दोन कोटी रुपये मंजूर केले. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने या संबंधी शासन निर्णय (जीआर) निर्गमित केला आहे. मंजूर रकमे पैकी फक्त 50 लाख रुपये शासनाने दिले आहेत निधीची लेखा परीक्षण अहवाल सादर करुनही उर्वरित साडेपाच कोटी रुपये मंजूर रककम अद्यापी देण्यात आली नाही.

निधी अभावी संस्थेने सुरु केलेले काम ठप्प झाले असून गेल्या 4 वर्षात शासनाने निधी देण्यास टाळाटाळ केली आहे. हा निधी तातडीने मिळावा यासाठी तसेच शासनाने दिलेले आश्वासन पाळावे यासाठी अनेक सेवा भावी संस्थांनी शासनाच्या निर्णया विरुध्द आदोलन सुरु केलेले आहे.

या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनाला विनंती करतो की पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे थकित मदत निधी तातडीने देण्याबाबत कार्यवाही करावी.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शुद्धीपत्र नाही

पृ. शी. : सिद्धीविनायक मंदिरा जवळील महापालिकेच्या खुल्या मैदानाचा वापर करून तिरूपती देवस्थानाच्या धर्तीवर विशेष योजना करणे.

मु. शी. : सिद्धीविनायक मंदिरा जवळील महापालिकेच्या खुल्या मैदानाचा वापर करून तिरूपती देवस्थानाच्या धर्तीवर विशेष योजना करणे. याबाबत श्री.सुभाष चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : मा□□य सदस्य श्री.सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" मुंबई प्रभादेवी येथील जगप्रसिद्ध सिद्धीविनायक मंदिराच्या बाजूने संरक्षक भिंत उभारण्यात आली आहे. तेथील नागरिक, पादचारी, भाविक तसेच वाहनांच्या रहदारीला या संरक्षक भिंतीचा अडथळा होतो. यासाठी उपाय म्हणून विशेष नियंत्रण यंत्रणा राबविण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे रविंद्र नाट्यमंदिर शेजारी महानगरपालिकेचे खुले मैदान अस्तित्त्वात आहे. त्या जागेचा योग्य तो वापर करून तिरूपती देवस्थानाच्या धर्तीवर या ठिकाणी विशेष योजना कार्यरत करण्याची गरज आहे. हा सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाचा विषय मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात मांडतो आहे. तो स्वीकृत करावा ही विनंती. "

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यात 'कोतवाल' पदासाठी झालेल्या निवड प्रक्रियेमध्ये झालेला भ्रष्टाचार व त्याबाबत चौकशी व्हावी म्हणून सुरू असलेले उपोषण.

मु. शी. : लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यात 'कोतवाल' पदासाठी झालेल्या निवड प्रक्रियेमध्ये झालेला भ्रष्टाचार व त्याबाबत चौकशी व्हावी म्हणून सुरू असलेले उपोषण याबाबत श्री.केशवराव मानकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री.केशवराव मानकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" लाखांदूर तालुका, जिल्हा भंडारा, येथील तहसिल कार्यालयामार्फत प्रसिद्ध झालेल्या जाहीरनाम्यातील अटींनुसार लाखांदूर तालुक्यातील 12 गावांतील तलाट्यांसाठी 12 कोतवालांची पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. त्या संबंधात जिल्हाधिकारी यांचे आदेश क्र. 2/आस्था.-3/कावि-766/08, दिनांक 5 नोव्हेंबर 2008 आणि जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र क्र. 2/आस्था-3/कावि-837/08, दिनांक 28 नोव्हेंबर 2008 च्या आदेशानुसार तहसिल कार्यालयाच्या जाहिरात क्र. क्रलि/संकीर्ण/कावि/1707/08-09, दिनांक 29 नोव्हेंबर 2008 या बरोबरच दुरूस्ती क्र. कावि/संकीर्ण/कावि/1253/08-09, नोव्हेंबर 2008 नुसार कोतवालांची पदे भीरण्यासाठी जाहिरात दिली गेली होती. त्यासाठी कोतवालांच्या पदावरून निवृत्त झालेल्या किंवा मृत पावलेल्या कोतवालांच्या वारसदारांचाही समावेश असेल अशी त्यात अट होती. परंतु लाखांदूर या ठिकाणी ही पदे भरत असताना तहसिलदार यांनी तसेच तेथील जो चपरासी आहे यानी भ्रष्टाचार केला आहे असा आरोप या संबंधात न्याय मागणारे उपोषणकर्ते श्री.कैलास पुंडलिक बोरकर यांनी केला आहे. तहसिल कार्यालयातील चपरासी श्री.अंबादास डोंगरे याने तहसिलदार श्री.पोटे यांच्या नावावर तीन कोंबड्या आणि 300 रूपये नगद अशी मागणी केली होती. या प्रकरणी जो भ्रष्टाचार झाला आहे त्याची चौकशी व्हावी म्हणून जे 10 उपोषणकर्ते उपोषणास बसलेले आहेत ते या अगोदर तहसिल कार्यालयासमोर आणि आता 15 डिसेंबर पासून विधान भवनासमोर उपोषणास बसले आहेत. त्यांची

..... एनएन - 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मानकर ....

मागणी आहे की, या भरतीमध्ये कोतवालांच्या वारसांवर जो अन्याय झालेला आहे, त्यांना डावलले गेले आहे त्या अन्यायाची ते दाद मागत आहेत. कारण सेवानिवृत्त झालेल्या कोतवालांचे जे वारसदार आहेत त्यांना अनुकंपा तत्त्वावर 'कोतवाल' पदासाठी प्राधान्य दिले गेले नाही. या भरतीमध्ये तहसिलदाराने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. तरी माजी कोतवालांच्या वारसांना ही पदे मिळाली पाहिजेत व या ठिकाणी ज्या अवैध नियुक्त्या केल्या गेल्या आहेत त्या रद्द केल्या पाहिजेत. तसेच याबाबत तहसिलदार आणि तेथील चपरासी यांना निलंबित करून उच्च स्तरीय चौकशी करावी अशी माझी या निमित्ताने विनंती आहे, आग्रह आहे तो मी या विशेष उल्लेखाद्वारा येथे मांडत आहे. "

***

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : 'संतुलन'च्या वतीने खाण कामगारांसाठी पाषाण शाळांना दुर्गम भागातील शाळेच्या दर्जानुसार कायमस्वरूपी विशेष अनुदानित म्हणून मान्यता मिळणे.

मु. शी. : 'संतुलन'च्या वतीने खाण कामगारांसाठी पाषाण शाळांना दुर्गम भागातील शाळेच्या दर्जानुसार कायमस्वरूपी विशेष अनुदानित म्हणून मान्यता मिळणे याबाबत ॲड.श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□□य सदस्या ॲड. श्रीमती उषा दराडे यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

ॲड.(श्रीमती) उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडते.

" 'संतुलन'च्या वतीने नागपूर अधिवेशन काळामध्ये धरणे आंदोलन चालू आहे. राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावेत म्हणून खालील मागण्या केलेल्या आहेत.

संतुलन पाषाण शाळांना दुर्गम भागातील शाळेच्या दर्जाखाली कायम स्वरूपी विशेष अनुदानित मान्यता द्यावी. जोपर्यंत खाण तोपर्यंत शाळा हे धोरण ठरवावे. कामगारांच सतत स्थलांतर होत असल्याने व खाण कायदा 1952 मधील तरतुदीनुसार वय वर्षे 18 पर्यंतच्या मुला-मुलींना खाण क्षेत्रात काम करण्यास प्रतिबंध आहे. कायद्याला योजनेची नितांत गरज असून 15 ते 18 वयोगटातील मुला-मुलींसाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक संतुलन पाषाण शाळांना विशेष अनुदानित मान्यता देणे गरजेचे आहे.

खाण कामगारांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती दुर्बल व सतत स्थलांतर असल्यामुळे कमवा व शिका या संकल्पनेतून खाण क्षेत्रातील अपघातग्रस्त, स्थलांतरित, निराश्रित कामगार कुटुंबातील वय वर्षे 6 ते 18 पर्यंतच्या मुली-मुलांना जिल्हा स्तरीय निवासीपाषाणशाळा व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांना विशेष अनुदानित मान्यता देणे गरजेचे आहे.

खाण कायदा 1952 मधील तरतुदीनुसार वय वर्षे 6 पर्यंतच्या मुली-मुलांना खाण क्षेत्रात बालसंगोपन केंद्र उभारण्याची तरतूद आहे. त्या अंतर्गत संतुलन बाल शिक्षण केंद्रांना विशेष अनुदानित मान्यता देणे गरजेचे आहे.

.... एनएन 5 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. दराडे ....

बाल मजूर मुक्त महाराष्ट्र या शासकीय धोरणाची अमलबजावणी करून बालमजूर मुक्त खदान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक खाण क्षेत्रात संतुलन पाषाण शाळा लागू करावी अशा प्रकारची विनंती या सार्वजनिक तातडीच्या विषयावर मी विशेष उल्लेखाद्वारा करीत आहे. "

***

(यानंतर श्री. सरफरे ....ओओ 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यात गर्भलिंग चाचणीव्दारे स्त्रीभ्रूण हत्येचे वाढलेले प्रमाण

मु. शी. : राज्यात गर्भलिंग चाचणीव्दारे स्त्रीभ्रूण हत्येचे वाढलेले प्रमाण याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□□य सदस्य श्री. मधुकर चव्हाण यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"मुलगी नको मुलगाच हवा या मानसिकतेमुळे महाराष्ट्रात स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाण वाढले आहे. राज्यात कायद्यानुसार गर्भलिंग चाचणी हा फौजदारी गुन्हा असला तरीही अशा चाचण्या करुन 3 ते 5 हजार रुपये घेऊन, गर्भलिंग चाचणी करुन वर्षाकाठी लाखो मुलींना मातेच्या पोटातच मारले जाते. प्रत्येक रुग्णालयाने दर महिन्याच्या 5 तारखेला सोनोग्राफी चाचणीचा अहवाल महापालिकेला, शासनाच्या संबंधित रुग्णालयांना सादर करणे बंधनकारक असतांनाही, रुग्णालये तो सादर करीत नाहीत. संबधित डॉक्टरांचे शिफारसपत्र नसतानाही सोनोग्राफी चाचणी केली जाते. सोनोग्राफीसाठी केल्या जाणाऱ्या अर्जात कायद्याच्या 19 अटी नमूद असताना त्यातील काही अटींचे जाणीव पूर्वक पालन केले जात नाही. परिणामत: बेकायदेशीररित्या गर्भलिंग चाचणी करुन स्त्रीभूण हत्येचे प्रमाण राज्यात वाढणे ही एक अत्यंत चिंतेची बाब आहे. रष्ट्रीय गर्भलिंगनिदान मूल्यमापन समितीच्या अभ्यासानुसार स्त्रीगर्भाची हत्या करण्याचा व्यवसाय झाला आहे. त्याचे प्रमाण ग्रामीण भागात दिवसें दिवस वाढत आहे. यासंबंधी शासनाच्या प्रचलित नियमाची काटेकोरपणे व कठोरपणे अंमलबजावणी करावी. तीन महिन्यात कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घ्यावा. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत असून शासनाने त्याची नोंद घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ. शी. : राज्यातील शाळांमध्ये कला व क्रीडा शिक्षक नियुक्त करणे

मु. शी. : राज्यातील शाळांमध्ये कला व क्रीडा शिक्षक नियुक्त करणे याबाबत श्री.विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री. विक्रम काळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम होते. शालेय पातळीवर इ. 1 ते 10 वीपर्यंत मराठी ते इतिहास-भूगोल पर्यंत सर्व विषय शिकविले जातात. पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वंकष विकास व्हावा म्हणून कला, क्रीडा यांचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे हेही अभिप्रेत आहे.

प्रत्येक शाळेमध्ये मराठी पासून ते इतिहास-भूगोल पर्यंत विषय शिकविण्यासाठी संबंधित विषय तज्ज्ञ आहेत. परंतु प्रत्येक शाळेत किमान इ. 1 ली ते 7 वीपर्यंत एक तरी क्रीडा शिक्षक असावा व तो नेमणे बंधनकारक करावे. आज राज्यात हजारो कला व क्रीडा शिक्षक पदवीधर होऊन बेकार आहेत. त्यांनाही संधी मिळेल व विद्यार्थ्यांनाही ज्ञान मिळेल.

तेव्हा शिक्षण खात्याने इ. 1 ली ते 7 वी पर्यंत एक कला शिक्षक व इ. 5 वी ते 10 वच्यासाळी एक बी.एड. झालेला क्रीडा शिक्षक नेमण्यासाठी त्वरीत आदेश काढावा".

धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईंट ऑफ प्रोसिजर संबंधी

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. सभागृहात मांडण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनेला नियमाप्रमाणे 30 दिवसाच्या आत संबंधित माननीय सदस्यांना लेखी उत्तर मिळाले पाहिजे. मागील अधिवेशनात मांडण्यात आलेल्या 7-8 विशेष उल्लेखाच्या सूचनांना पाच महिन्यानंतर काल उत्तरे पाठविण्यात आली. याठिकाणी माननीय सभापती, माननीय उपसभापती आणि माननीय तालिका सभापती संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देतात की, याबाबत कुणी तरी नोंद घ्यावी. माझी आपणास विनंती आहे की, याठिकाणी माननीय कॅबिनेट मंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री आणि माननीय राज्यमंत्री उपस्थित असतात. ज्याप्रमाणे लहान मुलांच्या वर्गामध्ये एक मॉनिटर असतो. किंवा ज्याप्रमाणे एखादा प्रवक्ता कामकाजाची नोंद घेत असतो.त्याप्रमाणे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना आपण याची नोंद घेण्यासाठी सक्ती केली पाहिजे. नाहीतर या विशेष उल्लेखाच्या सूचनांचा काही उपयोग होत नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये आपण विशेष उल्लेखाच्या सूचनांबाबत निदेश दिले होते. अनेक माननीय सदस्यांनी याबाबत तक्रारी केल्या तरी सुध्दा त्यानंतर चौकशी करण्यात आली नाही. विधानमंडळाच्या सचिवांना सांगण्यात आले होते की, गेल्या वर्षभरामध्ये किती विशेष उल्लेखाच्या सूचना मांडण्यात आल्या? त्यांची चौकशी करण्यात आली काय? त्यापैकी किती विशेष उल्लेखांच्या सूचनांना उत्तरे आली? यांचा अहवाल पटलावर ठेवण्यात यावा. त्याबाबत माननीय सभापतींनी निदेश दिले होते. हे अधिवेशन 30 तारखेपर्यंत चालणार आहे अशाप्रकारची चर्चा सुरु आहे. तोपर्यंत याबाबत आपल्याला कळेल काय? नाहीतर हे विशेष उल्लेख मांडण्याचे आपण बंद करावे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

अधिकारी सगळे लिहून घेतात हे मान्य आहे परंतु कोठे तरी, केव्हा तरी हें केले तर सन्माननीय सदस्यांना बरे वाटेल.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यंनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो बरोबर आहे. हे अधिवेशन सुरु होण्याच्या चार आठ दिवस पर्यंत आम्हाला विशेष उल्लेखाची उत्तरे येत होती. विलंबाने मिळालेल्या उत्तराच्या बाबतीत पुढे काय करावयाचे हे समजत नाही आणि त्या प्रश्नाला न्याय मिळत नाही. त्या दृष्टीकोनातून ही जी सूचना आलेली आहे त्याबाबतीत आपण गांभीर्याने विचार करावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अडीच-तीन वर्षापूर्वी असा प्रधात होता की, रोज औचित्याचे मुद्दे उपस्थित केले जावयाचे. औचित्याचा मुद्दा होतो की नाही असे इतर सन्माननीय सदस्यांना वाटले तरी सन्माननीय सदस्यांना स्वत:ला वाटणाऱ्या ज्वलंत प्रश्नासंबंधी औचित्याचा मुद्दा उपस्थित करता येत होता. सभागृहाचा थोडा वेळ गेला तरी ज्या प्रश्नाला कोठेच न्याय मिळत नाही आणि ज्याबाबतीत शासनाकडून लगेच उत्तर अपेक्षित आहे अशा बाबतीत माननीय मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित असले तर सभागृहामध्ये उत्तर मिळत होते. विशेष उल्लेखाच्या बाबतीत उत्तरे मिळतील म्हणून औचित्याचे मुद्दे बंद झाले आणि आठवड्यातील एक दिवस म्हणजे शुक्रवारी औचित्याचे मुद्दे घ्यावयाचे निर्देश माननीय सभापतींनी दिले तसेच कामकाज सल्लागार समितीमध्ये सर्व गट नेत्यांनी ते मान्य केले. आता औचित्याचे मुद्दे मांडता येत नाहीत आणि विशेष उल्लेखाचीही उत्तरे येत नाहीत. त्यामुळे मला असे सुचवावयाचे आहे की, औचित्याच्या मुद्यांबाबत आणखी एखादा दिवस वाढवावा. कारण सोमवारी आल्यानंतर महत्वाच्या प्रश्नाच्या बाबतीत शुक्रवारपर्यंत वाट बघत बसावयाचे असे होते. नियम 93 च्या सूचनेचेही उत्तर येत नाही. चर्चा होत नाही. माननीय तालिका सभापतींनी, सन्माननीय सभापतींना सांगून याबाबत निर्णय घ्यावा.

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना मी आदरणीय सभापती महोदयांपर्यंत पोहोचवीन. तत्पूर्वी शासनाने सुध्दा सन्माननीय सदस्यांच्या भावनांची दखल घ्यावी अशी मी शासनाला सूचना करतो.

श्री. अनिस अहमद : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LX OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976.)

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक 60 महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक 60 महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

तालिका सभापती : या विधेयकाचा हेतू माननीय मंत्रिमहोदयांना स्पष्ट करावयाचा आहे काय ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शासनाने हे विधेयक का आणले हे माननीय मंत्रिमहोदयांनी आम्हाला सांगावयास पाहिजे. आम्हाला काय पाहिजे ते आम्ही सांगू आणि ते काय देणार आहेत त्याबाबत त्यांनी सांगावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 60- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) विधेयक, 2008 या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, शासनाने चांगले विधेयक आणल्याबद्दल शासनाचे मी अभिनंदन करतो. या महाराष्ट्रामध्ये मुंबई शहरासाठी इमारत दुरुस्ती मंडळ, 1976 चा कायदा आहे. त्याच्या अंतर्गत हे मंडळ आहे. मुंबई शहरामध्ये 16 ते 17 हजार जुन्या इमारती आहेत. या इमारतींची शासनातर्फे दुरुस्ती केली जाते. महाराष्ट्रामध्ये एकमेव कायदा आहे, किंबहूना, जगामध्ये असेल. 1960 नंतर राज्यात काँग्रेस पक्षाने चांगले कायदे केले त्याच्यातील हा एक कायदा आहे. मुंबईत या घरांचा मालक कोणी तरी असतो, त्यात भाडेकरु रहात असतात आणि त्या घरांच्या दुरुस्तीची जबाबदारी शासन घेते. पूर्वी एक चौ.मी.साठी 500 रुपये दुरुस्तीचा खर्च दिला जात होता, नंतर तो 750 रुपये, त्यानंतर 1000 रुपये करण्यात आला. युतीच्या काळात तो 1200 रुपये करण्यात आला. मुंबईतील सर्व पक्षीय आमदारांची हा खर्च 2000 रुपयांपर्यंत वाढविण्याची मागणी होती. याचे कारण असे की, स्टील, सिमेंट व आवश्यक ती साधनसामग्री दुरुस्तीसाठी लागते त्यांची इ ालेली दरवाढ, वाढलेली महागाई, मजुरीचे वाढलेले दर या सर्व कारणांमुळे दुरुस्तीचा खर्च वाढविणे आवश्यक झाले होते. मागील अधिवेशनात याबाबतचे विधेयक येणार होते, परंतु अधिवेशन लवकर संपल्यामुळे हे विधेयक सभागृहासमोर येऊ शकले नाही. त्यामुळे शासनाने अध्यादेश काढून या कायद्याच्या कलम 88 च्या पोट-कलम (3) मध्ये दुरुस्ती केलेली आहे. माननीय राज्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आम्ही उगाचच आपल्याला रोखतो अशातील भाग नाही. आम्हाला अधिक कळते, आपल्याला कळत नाही असेही नाही. परंतु हा संवेदनशील विषय आहे. यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृहनिर्माण, नगरविकास अशी खाती नसावयाची. ज्याप्रमाणे गृह खाते महत्वाचे असते त्याप्रमाणे अर्थ खाते महत्वाचे असते, आरोग्य खाते महत्वाचे असते. आज 70 टक्के जनता ग्रामीण भागामध्ये राहते त्यामुळे आरोग्य विभाग महत्वाचे आहे. आज महाराष्ट्रात 48 टक्के लोकसंख्येचे शहरीकरण झालेले आहे. त्यामध्ये 27-28 टक्के नागरीकरणाचा समावेश आहे. म्हणजे राज्यात 48 टक्के शहरीकरण झालेले आहे, याचा अर्थ 10

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.मधुकर चव्हाण.....

कोटी जनतेपैकी 4 कोटी 80 लाख लोक शहरात राहतात. या शहरातील लोकांचे नागरी प्रश्न आहेत. पाण्याचे प्रश्न, रस्त्यांचे प्रश्न, वाहनांची व्यवस्था असे निरनिराळे प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवावयाचे असतील तर राज्याला स्वतंत्र गृहनिर्माण मंत्री पाहिजेत. परंतु सध्या हे खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. या खात्याला राज्यमंत्री आहेत, त्यांच्याकडे याबाबतची फाईल जाते, पण धोरणात्मक निर्णय घेण्याचे त्यांना अधिकार नाहीत. ज्यावेळी दोन पक्षाचे सरकार असते त्यावेळी त्यांच्यात एकजिनसीपणा नसतो, त्यांच्यात बेबनाव असेल, एकमेकाला अडविण्याचा प्रयत्न होत असेल तर त्यावेळी सामान्य जनतेचा गोंधळ उडतो. तसाच गोंधळ या सरकारचा झालेला आहे. काल सकाळ या वर्तमानपत्रात आलेल्या बातमीमध्ये सरकारने अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतुदीपैकी नोव्हेंबर, 2008 पर्यंत केलेल्या खर्चाची टक्केवारी दिलेली आहे. गृहनिर्माण विभागाने केलेल्या तरतुदीपैकी केवळ 3.8 टक्के खर्च केलेला आहे. या विभागाने जास्तीत जास्त 10 टक्के खर्च दुरुस्तीच्या कामावर खर्च केला असता तर समजू शकलो असतो. परंतु शासनाने वाजंत्री आणून, नाशिक बाजा लावून गृहनिर्माण योजना जाहीर केली होती. त्या योजनेच्या अंमलबजावणीस अद्याप सुरुवात झालेली नाही.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण....)

सभापती महोदय, एक चांगल्या प्रकारचे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. या सभागृहाच्या गॅलरीमध्ये अदृश्य स्वरुपामध्ये अधिकारी बसलेले आहेत. मी त्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की हे जे प्रति चौ.मीटर दर वाढविलेले आहेत त्यातील अर्धे पैसे हे ठेकेदाराच्या खिशात जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. हया ज्या इमारती दुरस्त केल्या जातात त्या 30, 40, 50 वर्षापासून 100 वर्षाच्या आसपास आहेत. ह्या इमारती दुरुस्त करताना साल्व्हेज काढले जाते. जुन्या इमारतीमध्ये लोड बेअरिंगसाठी बर्मा टीकवुडे वापरलेले असते. समजा एखादा बिम ठेकेदाराने काढून त्या ठिकाणी नवीन बसविला तर त्या बिमची बाजारातील किंमत 5-6 लाख रु. असते. मात्र ठेकेदार ही किमत 1 किंवा 2 लाख रु. दाखवतो. एखाद्या खिडकीची दुरुस्ती करावयाची असेल तर खिडकीची जुनी चौकट काढून तेथे नवीन चौकट लावली जाते, दरवाजाची दुरुस्ती करावयाची असेल तर दरवाजाची जुनी चौकट काढून नवीन चौकट लावली जाते. ह्या जुन्या सामानाची किंमत ठेकेदार कमी दाखवतो याकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे. लोखंड, सिमेंट, खडी, रेती यांचे दर वाढल्यामुळे दोन हजार रु.ची केलेली वाढ योग्य आहे. त्यानंतर एस्टिमेट करताना अनफोरसिन वर्क दाखविले जाते. ज्यावेळी एखादी इमारत वरवर दुरुस्तीसाठी घेतली जाते त्यावेळी असे अनफोरसीन वर्क अपेक्षित असते. हे अनफोरसीन वर्क 40 टक्के धरले आहे. या अनफोरसिन कामाचे पैसे कुणाच्या खिशात जाता कामा नयेत. आता या अनफोरसिन वर्क बरोबर दुसरे 10 टक्के ॲडिशनल वर्क काढलेले आहे. ॲडिशनल वर्क हा काय प्रकार आहे ? एस्टिमेट तयार करताना अनफोरसिन वर्क मी समजू शकतो. परंतु सुपरव्हिजन चार्ज हा काय प्रकार आहे ? मी ज्यावेळी म्हाडाचा अध्यक्ष होतो त्यावेळी हा सुरपव्हिजन चार्ज 4 ते 6 टक्के होता. या इंजिनिअर्सना पगार दिला जात असताना त्यांना वेगळा सुपरव्हिजन चार्ज कशासाठी दिला जातो? मध्यंतरी श्री. खुल्लर आणि श्री. क्षत्रियसाहेब असताना हे सुपरव्हिजन चार्ज केमी केले होते. त्यानंतर आर्किटेक्टची फी 6 टक्के आहेत. सभापती महोदय, ह्या जुन्या इमारतीमध्ये गरीब, मध्यमवर्गीय मराठी माणूस राहतो. मुंबईतील लोकसंख्येपैकी 52 टक्के लोक जुन्या इमारतीमध्ये राहातात. या जुन्या इमारतींचे दर आठवडयाला इन्स्पेक्शन करण्याचे आर्किटेक्टचे काम असते. साईटचे इन्स्पेक्शन करण्याचे याचे काम आहे. तसेच सिमेंट, खडी, वाळू यांचे मिक्सिंग योग्य

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...

प्रकारे केलेले आहे की नाही याचे सॅम्पल घेऊन ते बोर्डाच्या लॅबमध्ये तपासण्याचे आर्किटेक्टचे काम आहे. सभापती महोदय, ज्या इमारती पडतात, किंवा पुन्हा पुन्हा दुरुस्त करुन पडतात अशा वेळी मुडदे उचलण्याची पाळी येऊ नेय म्हणून पैशाचा योग्य प्रकारे विनियोग होतो की नाही हे पाहिले पाहिजे. कामाचे मोजमाप झाल्यानंतर बिले देण्याची कामे हॉटेलमध्ये होतात. जवळपास 450 ते 500 अधिकारी एकाच ठिकाणी आहेत, त्यांची कधीही बदली झालेली नाही. त्यांनी बाहेर देखील कामे घेतलेली असतात. सभापती महोदय, मध्यमवर्गीय, निम्नवर्गीय लोकांशी या रिपेअर बोर्डाचा सबंध येतो. तेव्हा हे जे एस्टिमेट तयार केले जाते त्यामध्ये कालानुरुप सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. एखाद्या वेळेला ओव्हर एस्टिमेट झाले, ॲडिशनल वर्क झाले की एक्सेस अमाऊण्ट दाखविली जाते. मग ते रहिवाशी आमदारांकडे येऊन सांगातात की, इमारतीचा खर्च 10 लाख रु. आहे. रिपेअर बोर्ड 8 लाख रु. देणार आहे, उर्वरित दोन लाख रुपये तुम्ही द्यावेत. अशा वेळेला आम्ही 2 लाख रु. आमदार फंडातून देतो. कित्येक वेळा रहिवाशी आमदाराकडे येण्याऐवजी ठेकदारच आमदाराकडे येतो आणि सांगतो की, साहेब 10 इमारती दुरुस्त करावयाच्या आहेत. त्यासाठी पैसे द्या. मग त्याला सांगितले जाते की, तू स्वतः कशाला आलास. ज्या इमारती दुरुस्त करावयाच्या आहेत त्या इमारतीतील रहिवाशांना घेऊन आमच्याकडे येते. मग आम्ही पत्र देतो. सभापती महोदय, एकाच ॲडिशनल वर्कसाठी दोन-दोन तीन-तीन पत्रे आणली जातात.

.....नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. मधुकर चव्हाण...

काम 5 लाखाचे असले तरी अतिरिक्त काम दाखवून 15 लाख रुपयांची देयके काढली जातात. लोकप्रतिनिधींना या सगळया गोष्टींची माहिती असते. परंतु लोकप्रतिनिधींना लोकसेवा करावयाची असते, मतदारांना दिलेला शब्द पाळावयाचा असतो, त्यांना आनंदी ठेवावयाचे असते. चाळीची दुरुस्ती करावयाची असते त्या भावनेने कायकर्ते लोकप्रतिनिधींकडे येत असतात. लोकांच्या भावना लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींना कोणत्याही पध्दतीने कामे करुन घ्यावी लागतात. या ठिकाणी 1200 रुपयांऐवजी 2000 रुपये असा उल्लेख केलेला आहे. तसे करणे आवश्यक आहे. तुम्ही दुस-या नियमात बदल करीत आहात, तो बदल देखील करणे आवश्यक आहे. प्रत्येक वेळेला 500 रुपयांचे 750 रुपये, 750 रुपयांचे 1 हजार रुपये आणि 1 हजार रुपयांचे 1200 रुपये करावयाचे झाले तर त्यासाठी प्रत्येक वेळेला विधेयक सभागृहासमोर आणावे लागते. हा काही फार मोठा धोरणात्मक, सर्वस्पर्शी निर्णय नाही. या निर्णयामुळे समाजात फार मोठा बदल होणार आहे, या बाबतीत सभागृहात अनेक तास चर्चा झाली पाहिजे अशातला हा विषय नाही. पैसे वाढविण्याचा हा मुद्दा नाही. तो मुद्दा एवढयाचसाठी ठेवला आहे की, वाढविलेले पैसे योग्य आहेत की नाही ? त्यावर चर्चा करतील. We are the custodian of public interest. या ठिकाणी बसलेलो सर्व लोक शासनाच्या कोषागाराचे विश्वस्त आहोत, आणि म्हणून तो मुद्दा या ठिकाणी चर्चेला आला पाहिजे. लहान, लहान गोष्टीत बदल करावयाचा असेल तर त्यासाठी सभागृहात विधेयक आणावे लागते. परंतु लहान, लहान गोष्टी करण्यासाठी वारंवार सभागृहापुढे यावे लागू नये, म्हणून यासंबंधीचे संपूर्ण अधिकार प्रशासनाला देण्यास आमची काही हरकत नाही. परंत प्रशासनाने सुध्दा यासंबंधीची पूर्णपणे काळजी घेतली पाहिजे. हा अधिकार आम्ही प्रशासनाला देतो आहोत. तो देणे आवश्यक आहे. लहान, सहान गोष्टीसाठी कायदे मंडळात येऊन कायदे करण्यापेक्षा एक मूळ कायदा करुन, त्याची नियमावली तयार करुन यासंबंधीचे अधिकार प्रशासनाला दिले पाहिजेत. हे दुधारी शस्त्र आहे. म्हाडा, रिपेअर बोर्ड, गृहनिर्माण विभागातील प्रधान सचिव, त्या विभागातील इतर अधिकारी यातील काही अधिकारी प्रामाणिकपणे काम करतात. काही अधिकारी मात्र या कायद्याचा दुरुपयोग करतात. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, सॅलवेजकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. म्हाडाच्या तसेच रिपेअर बोर्डाच्या इंजिनिअरने त्या बाबतची पाहणी केली पाहिजे. लाकडांच्या वखारीत गेलात तर तेथे नवीन लाकूड येत नाही. सागाचे लाकूड येत नाही, बर्माचे लाकूड येत नाही. जुने लाकूड

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

असते, त्यावर कार्पेंटर कडून रंधा मारुन ते लाकूड चांगले करुन वापरले तर त्या लाकडाचा मोठया प्रमाणात उपयोग होऊ शकतो. परंतु जुन्या इमारतीचे चांगले लाकूड कंत्राटदार कवडी मोलाच्या भावाने विकत घेतात आणि जास्त किंमतीने विकतात. अशा प्रकारे कंत्राटदारांचा फायदा या अधिका-यांकडून होत आहे. सॉल्वेजच्या नावाखाली अधिकारी आणि कंत्राटदार बोर्डाच्या तोंडाला काळे फासता आहेत. अनफोरसीन वर्क आहे. त्यावेळी आपले अधिकारी वेळोवेळी भेट देतो आहे किंवा नाही, इमारतींमध्ये जाऊन प्रत्यक्षात मोजमाप करतो आहे किंवा नाही ? यासबंधीची माननीय मंत्री महोदयांनी काळजी घेतली पाहिजे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी आहे की, अनेक वेळेला 'Repair amounts to reconstruction' अशा त-हेची परवानगी दिली जाते. ही परवानगी देत असताना तो एक्स्प्लॉईट तर करीत नाही ना यासबंधी देखील माहिती घेतली पाहिजे. एखाद्या इमारतीत 40 भाडेकरु रहात असतात, ती इमारत पडली तर 'Repair amounts to reconstruction'. म्हणजे दाखविण्यासाठी तो दुरुस्त करतो. But, it is as good as re-construction. कंत्राटदार 40 खोल्याचे 45 ते 50 खोल्या तयार करतो. त्यातील अतिरिक्त गाळे मास्टरलिस्टमध्ये जातात. रोड वायडनींग असतात, विकास आराखडयात बाधीत झालेल्या इमारती असतात,त्या मूळ इमारतींची मास्टर यादी तयार केली जाते. मग या जुन्या इमारतीमध्ये हे लोक का राहतात? पहिल्या फेजमध्ये दुरुस्ती होते, दुस-या फेजमध्ये दुरुस्ती होते, तिस-या फेजमध्ये दुरुस्ती होते. इमारतींची दुरुस्ती किती फेजमध्ये करावयाची हे निश्चित ठरविले गेले पाहिजे. आमदार फंड देईल, परंतु त्यांनी किती वेळा आमदार फंड द्यावयाचा? एखाद्या रुग्णाला कितीही चांगले टॉनिक दिले तरी त्याचा आजार बरा होत नाही. औषधांनी त्याचे थोडे आयुष्य वाढवू शकतो. परंतु त्या रुग्णास आपण तरुण करु शकत नाही. रिपेअरचा खर्च 1200 रुपयांवरुन 2000 रुपये केला आहे.जेथे आवश्यकता असेल आणि जेथे स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी असेल, तेथे कॉस्मेटिक रिपेअर केले पाहिजे. हा पैसा खर्च केल्यानंतर त्या इमारतीचे वय दहा,वीस वर्षांनी वाढेल तरच खर्च करा. या ठिकाणी 1200 रुपयांवरुन 2000 रुपये रिपेअर करण्यासाठी प्रोव्हीजन केलेली आहे."राम नाम जपना, पराया माल अपना" असे अधिका-यांनी करु नये. सदर प्रोव्हीजन इमारतीचे आयुष्य वाढेल यासाठी खर्च करावा अशी माझी शासनास विनंती आहे.

...3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

सभापती महोदय, मला या अनुषंगाने दोन, तीन गोष्टी सांगावयाच्या आहेत. जुन्या इमारतींच्या दुरुस्तीवर 5 हजार कोटी रुपये खर्च केला आहे. जुन्या इमारती दुरुस्ती करण्यासंदर्भात सुकथनकर समितीने अहवाल दिला आहे. हे एकमेव बोर्ड असे आहे की, त्यास दिघे कमिटी नेमली गेली. सुकथनकर कमिटी नेमली गेली. चेबूर येथून आमदार म्हणून निवडून आले होते, त्यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली होती. शासनाने या कमिटयांचे अहवाल स्वीकारले आहेत. परंतु त्या अहवालातील शिफारशींकडे मात्र शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. माझे असे मत आहे की, सुकथनकर समितीने रिपेअर बोर्डाला जो अहवाल दिला आहे, त्याचा आपण अभ्यास केला पाहिजे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

सभापती महोदय, मला वाटते, शासन हा चांगला कायदा करीत आहे. परंतु हा कायदा केल्यानंतर त्याची अंमलबजावणी प्रभावी झाली नाही तर केलेल्या कायद्याचा काही उपयोग होत नाही. अनेक ठिकाणी अतिरिक्त गाळे तयार झाले आहेत. हे अतिरिक्त गाळे आपण मास्टर लिस्टमधील लोकांना दिले पाहिजेत, परंतु म्हाडामध्ये जे दलाल आहेत त्यांनी जुनी कागदपत्रे तयार केली. व्हॅकेशन नोटीस तयार केली, भाडे पावत्या बनविल्या, फाईल तयार केली आणि त्या आधारे मास्टर लिस्टमध्ये नाव इन्क्लूड केले. नाव इन्क्लूड केल्यानंतर 25-30 वर्षे ज्यांची इमारत नव्याने उभी राहिली नाही असे भाडेकरु ट्रान्झिट कॅम्पमध्ये खितपत पडले आहेत त्यांना अतिरिक्त गाळे न देता दलालांच्या माध्यमातून खोट्या केसेस तयार केलेल्या लोकांना अतिरिक्त गाळे दिले जातात याची गंभीर नोंद याठिकाणी घेतली पाहिजे. मुंबई शहरातील लोक का जात नाहीत? जुन्या इमारतींची पुन्हा पुन्हा दुरुस्ती का करावी लागते? 1200 रुपये 2000 रुपयांपर्यंत का वाढवावे लागतात? लोक आग्रह करतात की शक्यतो आमची इमारत दुरुस्त करा, तोडू नका. एकदा आम्ही ट्रान्झिट कॅम्पमध्ये गेलो तर काय होईल? रामाला 14 वर्षे वनवास भोगावा लागला. 14 वर्षांनी राम परत आला. येथे 20 वर्षे, 25 वर्षे, 30 वर्षे ट्रान्झिट कॅम्पमध्येच रहावे लागते. ज्याठिकाणी जनावरांना देखील राहता येत नाही अशा ठिकाणी सर्वसामान्य माणसाला रहावे लागते. 40 संडास असतील तर त्यापैकी 10 तुंबलेले असतात. 10 संडासाचे दरवाजे तुटलेले, 5 खिडक्या तुटलेल्या असतात. आरे कॉलनीतील गाईंनी चांगले दूध द्यावे म्हणून त्यांना सकस खाद्य दिले जाते. त्यांची निकोप काळजी घेतली जाते. याठिकाणी माणसांची काळजी घेतली जात नाही. ही सगळी ट्रान्झिट कॅम्प आडवी आहेत. म्हणून तेथे लोक जायला तयार नाहीत. एफएसआय कन्झूम झालेला नाही. मालवणी, बोरीवली, कांदिवली, कफ परेड येथे ग्राऊंड कन्स्ट्रक्शन असलेली ट्रान्झिट कॅम्प पाडून तेथे इमारती बांधल्या पाहिजेत. सायन येथे 5000 गाळे आहेत. त्याठिकाणी एफएसआय फुकट केला. मल्टी स्टोरीड कन्स्ट्रक्शन बांधून ते गाळे विकायचे असे ठरले होते. आपण काय केले आम्हाला माहित नाही. बी.जी.शिर्के हे शासनाचे जावई आहेत का? सगळी कामे त्यांना दिलेली आहेत. मी असे म्हणत नाही, कोणी चांगले काम करीत असेल तर त्यांना अवश्य काम द्यावे. परंतु युतीमध्ये एकमेकांना सांभाळून घेतो त्याप्रमाणे सगळ्यांना काम दिले पाहिजे. आपण स्पर्धा लावतो. स्पर्धेमधून गुणवत्ता वाढते. पूर्वी फियाट आणि अम्बॅसेडर या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

गाडयांची मोनोपोली होती. आता नवनवीन गाड्या आल्यामुळे किंमती कमी झाल्या, गुणवत्ता वाढली. करोडो रुपयांची कामे एकाच माणसाला दिली तर व्हेस्टेड इंटरेस्ट तयार होतो. म्हणून मग त्यातून गृहनिर्माणाची व्यवस्था चांगली होत नाही. जुन्या चाळी 100-100 वर्षे टिकल्या. 1975, 1980, 1990 साली बांधलेल्या इमारती, पाच वर्षानंतर सिमेंट पडायला लागते, दरवाजे, खिडक्या पडायला लागतात. म्हणून वाढीव पैशाचा उपयोग रिपेअर बोर्डाला झाला पाहिजे. हे चांगले बोर्ड आहे. 60 वर्षाच्या काळात कॉंग्रेसने जे कायदे केले त्यापैकी हा एक चांगला कायदा केलेला आहे. एक रुपया गोळा झाला तर त्यातील 90 पैसे भाडेकरु आणि 10 पैसे लँडलॉर्ड देतो. त्यामधून 40-50 कोटी रुपये रिपेअर सेसच्या माध्यमातून गोळा होतात. युती शासनाच्या काळात शासन मदत देत होते. ते शासन 10-15 कोटी रुपये देत होते. आपल्या कायद्यात "May" हा शब्द होता तो आम्ही "Shall" असा बदलला. जेवढा पैसा गोळा केला जाईल त्याला मॅचिंग ग्रँट शासनाने द्यावी असे आहे. माझ्या माहितीप्रमाणे 300-350 कोटी रुपये शासनाने रिपेअर बोर्डाला दिलेले नाहीत. आणखी 10 कोटी रुपये म्हाडा देते, 10 कोटी रुपये मुंबई महानगरपालिका देते, त्यांनी सुध्दा पैसे दिलेले नाहीत. ते लोक कामे कशी करणार?

(नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

आम्ही टीका जरुर करु पण त्यांना पैसे दिले पाहिजेत. मुंबईतील जवळपास 40 ते 45 लाख गरीब जनता आज या घरांमध्ये राहत आहे. म्हणून हा कायदा चांगला आहे व त्यानुसार आपण 800 रुपये प्रति चौरस मीटरवरुन 1200 रुपये प्रति चौरस मीटर एवढी वाढ करण्याचे ठरविले ते जरुर करा पण मूळ मराठी माणसाला अशा घरांमध्ये राहता आले पाहिजे. आज अशा इमारतींचे मेजर रिपेअर असेल तर ट्रान्झिट कॅपमध्ये पाच-सहा वर्षे सुध्दा लोकांनाजावे लागते. मी म्हाडाचा चेअरमन असताना असा निर्णय घेतला होता की, 5 लाखाचे रिपेअरचे काम असेल तर तीन महिन्यात ते झाले पाहिजे, 10 लाखाचे काम असेल तर वर्षात आणि 15 लाखाचे काम असेल तर ते दीड वर्षात तरी झालेच पाहिजे. अशा प्रकारे जेवढी रक्कम जास्त असेल तेवढा कमी काळ दुरुस्तीला लागला पाहिजे. परंतु आता रिपेअरिंगचा कालावधी संपलेला असताना केवळ प्रॉपींग करुन ठेवलेले आहे व त्याचा परिणाम म्हणून लोक ट्रान्झिट कॅम्पमध्येच राहत आहेत. दोन-चार इंजिनिअर्स सस्पेंड होत आहेत अशा प्रकारे भाडेकरु आणि इंजिनिअर्स सुध्दा भयभीत होत आहेत, असे होऊ नये म्हणून हा उपलब्ध पैसा आहे तो काळजीपूर्वक वापरावा अशी मी विनंती करतो, आणि माझे भाषण पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानसभा विधेयक क्र. 60-महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, 1976 मध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक सभागृहात मांडलेले आहे. या विधेयकाचे स्वागत केले पाहिजे असे हे विधेयक आहे. या विधेयकाच्या कलम 88 (3) मध्ये आपण सुधारणा केलेली आहे. त्यानुसार दुरुस्तीचा खर्च प्रति चौरस मीटरला 1200 पेक्षा अधिक असता कामा नये अशी ही पूर्वीची तरतूद होती. त्यात आता चांगल्या प्रकारची सुधारणा सुचविलेली आहे आणि ती म्हणजे "करावयाच्या खर्चाच्या उक्त मर्यादेमध्ये सुधारणा करण्यासाठी इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चाची रक्कम राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्याचे अधिकार राज्यशासनाकडे घेणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते. या विधेयकावर बोलत असताना सन्माननीय सदस्यांनी चांगले मुद्दे मांडले आहेत, त्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही. पण त्याचबरोबर मी असे सुचविणार आहे की, आज मुंबई शहराला जी गरज आहे ती "इंटिग्रेटेड हाऊसिंग पॉलिसीची". केवळ म्हाडाच्या माध्यमातून मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबईतील घरांचा प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे एमएमआरडीए, मुंबई महानगरपालिका, नगरविकास विभाग, म्हाडा आणि घर दुरुस्ती मंडळ या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनी आपल्याला पुढे जावे लागणार आहे. आज देखील मुंबई शहरात 16289 इमारती आहेत, त्या सर्वच इमारतींची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यात सन 1940 च्या पूर्वीच्या 13532 इमारती आहेत, त्यांना 68 वर्षे झालेली आहेत. सन 1940 ते 1950 या काळातील 1494 इमारती आहेत, सन 1951 ते 1960 या दहा वर्षातील 1193 इमारती अशा एकूण 16289 इमारती आहेत. या दुरुस्तीच्या संदर्भात मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या घरांमध्ये जवळपास 52 लाख अधिकारी राहतात. कदाचित हा आकडा कमी जास्त असेल पण त्याचे गांभीर्य सन्माननीय सदस्यांनी सांगितले. एवढी लोकसंख्या या घरांमध्ये राहते म्हणून या घरांची दुरुस्ती चांगल्या प्रकारे व्हावी. मुंबई शहराचा विचार केला तर प्रामुख्याने हे एक बेट असून या आयलँडच्या संदर्भात साधारणत: 80 टक्के जमिनीवर इमारती आहेत आणि 20 टक्के जमीन खुली आहे, त्यात रस्ते, क्रीडांगण, गार्डन अशा प्रकारे फक्त 20 टक्के जमीनच खुली आहे. जगातील इतर देशांचा विचार केला तर प्रत्येक शहरात असे दिसून येईल की, 20 टक्के जमिनीवर घरे उभी आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

त्यातील 20 टक्के जमिनीवर घरे असून 80 टक्के जमीन मोकळी आहे. आपण केवळ 1250 रुपये घेत होतो त्यामुळे आपण त्यामध्ये वाढ केलेली आहे. यासंदर्भात राजपत्रात दिलेली माहिती आम्हाला मंजूर आहे. हाऊसिंगच्या संदर्भात आपण चांगले धोरण स्वीकारले आहे. परंतु नव्या हाऊसिंग पॉलीसीमध्ये वाढीव एफएसआय देण्याची व्यवस्था आहे, पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन्सचा विचार करण्यात आला आहे, स्टॉर्म वॉटर्सच्या पाईपलाईनच्या संदर्भात आपण विचार केला आहे. हाऊसिंगच्या संदर्भात असे अनेक प्रश्न आपल्या समारे उभे राहणार आहेत. हे सर्व या विधेयकाच्या चर्चेच्या माध्यमातून आपल्या लक्षात आम्ही आणून देत आहोत. जुन्या घरांचे भाडे फार कमी आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी म्हटल्या प्रमाणे शासन उपकराचे पैसे म्हाडाला देत नाही. त्यामुळे आम्ही शासनाला विनंती करीत आहोत की, शासनाकडे म्हाडाचे उपकराचे जे पैसे आहेत, ते पैसे शासनाने म्हाडाला लवकरात लवकर देणे गरजेचे आहे. शासनाला मागच्या वर्षाचे सेसचे 46 कोटी रुपये व अंशदानाचे 38 कोटी रुपये उपलब्ध झालेले आहेत. परंतु ही रक्कम कशी वाढेल याचा विचार करण्याची गरज आहे. मुंबईमध्ये दर वर्षी पावसाळयात हमखास 20-25 घरे कोसळत असतात. "ही इमारत धोकादायक आहे" असे त्या इमारतीवर लिहिले असले तरी त्या ठिकाणच्या लोकांना इतरत्र रहण्याची सोय नसल्यामुळे, पर्याय जागेची व्यवस्था नसल्यामुळे ते लोक त्याच इमारतीमध्ये रहतात. ट्रान्झीट कँपमध्ये लोक तर गेल्या 15-20 वर्षापासून राहत आहेत. ट्रान्झीट कँपच्या संदर्भात चांगले धोरण आखण्याची गरज आहे. इमारती कशा प्रकारे सुधारता येतील यासंदर्भात्ील सर्व धोरणे एकत्र करुन निर्णय घेतला तर चांगले होईल. ऊंच इमारती बांधण्याचा निर्णय घेतला तर त्या निर्णयाला सुध्दा काही लोक विरोध करतील. मुंबईमध्ये असलेल्या उपलब्ध जमिनीचा विचार करुन, मुंबईच्या लोकांच्या दृष्टीकोनातून इमारती उभ्या करण्याचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. हाऊसिंगच्या संदर्भात शासनाने जी वाढ केलेली आहे त्याबद्दल शासनाचे निश्चिपणे अभिनंदन करतो. याला मी पिसमील म्हणत नाही परंतु नूतनीकरणाची जास्त गरज आहे. त्याला शासनाने मदत करावी, असे मी या प्रसंगी सांगून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास अधिनियम 1976 यामध्ये पुढील सुधारणा करण्यासाठी सन 2008 चे वि.स.वि. क्रमंक 60 आज विधानपरिषदेत पारित करण्याकरिता सादर झालेंले आहे. या पूर्वी 16 सप्टेंबर, 2008 रोजी यासंदर्भातील अध्यादेश काढण्यात आला. त्याप्रमाणे त्या सुधारणा करण्याकरिता हे विधेयक येथे प्रस्तुत करण्यात आले आहे. 1200 रुपयांच्या जागी 2000 रुपये आपण वाढवलेले आहेत. शासनाला उशिरा सूचलेले शहाणपण असे म्हणता येईल परंतु शासनाला जे शहाणपण उशिरा सूचते ते फार भयानक असते. त्यामुळे या भांबावलेल्या परिस्थितीत काय करावे हा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, मला आठवते की, ज्यावेळी घरदुरुस्तीमंडळ सुरु झाले त्यावेळी 75 रुपये चौ.फुट असा दर होता त्यामध्ये आता वाढ होऊन तो 2000 रुपये करण्यात आलेला आहे. सिमेंट, स्टीलचे दर वाढले, असे कारण देण्यात आलेले आहे. परंतु हा निर्णय शासनाने अगोदरच घेतला असता तर अनेक लोकांचे जीव वाचले असते.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

मुंबईतील अनेक नादुरुस्त चाळी कोसळल्या नसत्या . सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांनी आताच आपले विचार व्यक्त करीत असतांना सांगितल्या प्रमाणे या इमारतीं किती आहेत ? या संदर्भात छाननी करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी आणि इतरही काही सन्माननीय सदस्यांनी अत्यंत पोटतिडकीने आपले विचार मांडले आहेत. ते विचार अत्यंत मोलाचे आणि महत्वाचे आहेत. परंतु त्या संदर्भात आम्हाला नेहमीच डोस पाजले जातात. सभागृहामध्ये पर प्रांतियांचा प्रश्न आला की समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्य आक्रस्ताळेपणाने उभे राहतात आणि जणु काही परप्रांतिय हे त्यांचेच पाव्हणे आहेत त्यांना पोसण्याचा तसेच त्यांना आमच्या उरावर बसविण्याचा ठेका त्यांनीच घेतला आहे अशा प्रकारे वारंवार त्यांच्याकडून बोलले जाते. इतकेच नव्हेतर हे सांगण्यासाठी शर्यत लागते. मुंबईचा विकास परप्रांतियांनी केला असे देखील सांगितले जाते. वास्तविक पिढयान् पिढया मराठी माणूस मुंबईमध्ये राहिलेला आहे . गिरगावात लाखो मराठी कुटूंबे राहतात . सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना देखील ही गोष्ट चांगली आठवत असेल. मुंबईमध्ये लाल बंडी घालून हातगाडी ओढणारी माणसे घाटावरचीच होती, पाटया डोक्यावर घेऊन फिरणारी माणसे घाटीच आहेत. शाहीर साबळे यांच्या नाटकात पाटीवाल्यांची स्थिती दाखवली होती. मुंबईमध्ये डबेवाले अजूनही टिकून आहेत .मुंबईतील माथाडी कामगारसुध्दा मराठी माणूसच आहे. "मराठी गडी यशाचा धनी " या प्रमाणे मराठी गडीच ही सगळी कामे करीत होता. मराठी माणसाकडूनच ही कामे केली जात होती ही सर्व मंडळी मुंबईमध्ये चाळीमध्ये राहत होती. मराठी माणूस कधीही

झोपडपट्टीत राहिला नाही तो जुन्या चाळीतच रहात होता. पूर्वी दादर आणि प्रभादेवी परिसरात सुंदर वाडया होत्या. त्या वाडयांमध्ये करंदाची झाडे देखील होती. अशा प्रकारे वर्षानुवर्षे मुंबईमध्ये राहणा-या मराठी माणसाच्या घराच्या संदर्भात आता प्रश्न निर्माण झाला आहे . मुंबईचा विकास कोणी केला यावर चर्चा न करता पिढयान्पिढया मुंबईत राहणा-या मराठी माणसाचे अस्तित्व मुंबईत राहणार आहे किंवा नाही असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. या घराच्या दुरुस्तीचा दर आता 2000 करण्यात आला आहे तरीसुध्दा अजूनही अनेक इमारती कोसळतात. मोडकळीस आलेल्या इमारतीची यादी नेहमीच जाहीर केली जाते. मोडकळीस आलेल्या 19 हजार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

इमारतीच्या पुर्नबांधणी करण्याचा निर्णय महिनाभरात शासन घेणार आहे असे माननीय मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख यांनी सांगितले होते. पूर्वी दुरुस्तीचा दर 1200 रुपये होता आता हा दर 2000 रुपये करण्यात आला आहे तरी देखील अनेक इमारतीची अवस्था अत्यंत जीर्ण स्वरुपाची आहे.. तेथील संडासांची अवस्था देखील अत्यंत वाईट आहे. त्या मानाने ग्रामीण भागात राहणारे लोक काही प्रमाणात सुखी आहेत.....

तालिका सभापती (भास्कर जाधव) : माननीय सदस्यांनी आपले भाषण थांबवावे . आता कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करण्यात येईल. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी भाषण पुढे सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी : कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) :सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

विधान परिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक सोमवार, दिनांक 22. डिसेंबर 2008 रोजी दुपारी 4.00 वाजता विधान भवन, नागपूर येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने विचारविनिमय करुन मंगळवार, दिनाक 23 डिसेंबर 2008 ते मंगळवार, दिनांक 30 डिसेंबर 2008 पर्यतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला.

<u>डिसेंबर 2008</u>

1) मंगळवार, दिनांक 23	: 1) सत्ताधारी पक्षातर्फे सुचविण्यात येणा-या विषयावरील प्रस्तावावर चर्चा 2) शासकीय विधेयके
2) बुधवार, दिनांक 24	1) विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात येणा-या विषयावरील प्रस्तावावर चर्चा 2) शासकीय विधेयके
3) गुरुवार, दिनांक 25	सुट्टी (खिसमस)
4) शुक्रवार, दिनांक 26	अशासकीय कामकाज (ठराव)
5) शनिवार, दिनांक 27	शासकीय विधेयके
6) रविवार, दिनांक 28	सुट्टी
7) सोमवार, दिनांक 29	1) अंतिम आठवडा प्रस्ताव 2) शासकीय विधेयके
8) मंगळवार, दिनांक 30	शासकीय विधेयके

तालिका सभापती : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला (नतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

पृ.शी. : गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) विधेयक, 2008.

L.A. BILL NO. LX OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976.)

(प्रश्न पुन्हा प्रस्तुत झाला.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली होती. आम्हाला अभिप्रेत होते की, आता चांगल काही तरी गृहनिर्माणाचे धोरण या राज्यात येईल. परंतु जे धोरण सरकारने या सभागृहात कधी मांडलेच नाही तरीही ते धोरण विधीमंडळाने मान्य केलेले गृहनिर्माण धोरण सरकारने आणले आहे असे सांगत ढोल पिटण्यात आले. तेव्हा मुंबईतील जुन्या इमारतींच्या बाबतीत या धोरणात तुम्ही काय केले तर त्यात पहिली धावपळ झाली की, एसआरए योजनेसाठी सुरूवातीस जो 2.69 एफएसआय होता तो वाढवून 3 करण्यात आला. त्यानंतर गिरण्यांचा, गिरण्यांच्या जमिनीचा आणि तेथील कामगारांच्या गृहनिर्माणाचा प्रश्न आला. गिरण्यांतील कामगारांना घरे द्यायची तर ती कशी द्यायची यावरच दीड दोन वर्षे काथ्याकूट झाला. शेवटी तुम्ही नगरविकास नियमावलीच्या कलम 33(9) मध्ये सुधारणा करून गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी तेथे 4 एफएसआय देण्याचे ठरविले. त्यानंतर या मुंबईतील जुन्या इमारती, जे या मुंबईतील मूळ मुंबईकर आहत, ज्यांचा या मुंबईवर प्रथम अधिकार आहे म्हणूनच मी मध्यंतरी श्री.के.एल.प्रसाद ला सांगितले होते की, मुंबई आमच्या बापाची आहे. त्या मूळ मुंबईकरांसाठी या सरकारने काय केले ? या मुंबईमध्ये सुरूवातीस कोणकोण कसे कसे आणि कोणते व्यवसाय या मुंबईत करीत होते, कोणते व्यवसाय कोणा मंडळींच्या हातात होते हे अगदी पुराव्यासह सांगण्याची माझी येथे तयारी आहे. मात्र मी ते सारे सांगत सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. पण शेजाऱ्याच्या मुलाचे कौतुक करण्याची सवय असलेल्याला आपले मूल देखील शेंबडे दिसते. आता त्याला त्या शेजाऱ्याच्या मुलाचे जास्त कौतुक का वाटत असते ते त्याचे त्यालाच माहीत. तेव्हा हा जो मूळ मुंबईकर आहे त्याची व्यथा आजपर्यंत या शासनाने समजून घेतलेल नाही. त्यामुळेच मी मधाशी म्हटल की, हे उशिरा आलेले शहाणपण आहे. सभापती

..... एक्सएक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी मागे सांगितले होते की, या मुंबईत 16 ते 18 हजार जुन्या इमारती आहेत आणि त्यातशंभर टक्के मराठी असलेला माणूसच राहतो. त्याबाबत काय झाले ? तर तुमचे हे धोरण म्हणजे उशिरा सुचलेले शहाणपण आहे पण त्याबाबत देखील निर्णय पूर्ण न घेतला नाही. या जुन्या इमारतींची दुरूस्ती करण्यासाठी गृहनिर्माण मंडळाने ठरवून दिलेला 1200 रूपयांचा निधी कमी पडत होता, त्यापेक्षा किती तरी जास्त खर्च प्रत्यक्षात येत होता. एखाद्या इमारतीच्या दुरूस्तीचे बजेट 10-15-20 लाख रूपये येत असेल तर तुमच्या 1200 रूपये त्यासाठी मिळणार आणि बाकी 8 लाख रूपये भाडेकरूंनी जमा करायचे. आता हा तेथील भाडेकरू जो 12 ते 15 रूपये दरमहा भाडे भरत एका एका खोलीमध्ये किमान 7 ते 8 जणांच्या संख्येने पिढ्यान् पिढ्या नाईलाजाने का होईना तेथे रहात आहे, नांदत आहे अशा भाडेकरूंना हे उर्वरित 7-8 लाख रूपये भरण्याचे बंधन आपण टाकता. पण तेवढे पैसे देणे त्याला शक्य नसते त्यामुळे मग तो आमदारांकडे भीक मागत फिरतो. उपनगरातील आमदारांचा तर यात संबंधच येत नाही. पण मुंबईतील आमदार असतील त्यांना तो सांगू लागतो की, आम्हाला आमची इमारत दुरूस्त करण्यासाठी 10 लाखाची गरज आहे. तुम्ही तुमच्या आमदार निधीतील 1 लाख रूपये दिले तर त्यातून आमची मोरी होऊ शकेल. दुसऱ्या आमदाराकडे जाऊन सांगतो की, तुम्ही 1 लाख रूपये दिले तर आमची गॅलरी त्यातून होऊ शकेल. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... वायवाय 1 ...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 12 ते 5 वाजेपर्यंत होती. सभागृहाच्या कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाज संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, नियम 289 खाली स्वीकारण्यात आलेल्या चर्चेला आज संध्याकाळी 5 वाजता सुरुवात होणार होती. उद्या सकाळी सभागृहाची विशेष बैठक घेऊन ती चर्चा करण्याचे ठरविले आहे काय?

तालिका सभापती : मी याबाबत चौकशी करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण ही चर्चा उद्या सकाळी घ्यावी. यामध्ये किती मेले याचा आकडा सभागृहासमोर येईल. माननीय सदस्यांनी याठिकाणी उपस्थित केलेल्या त्यांच्या भावनेशी आम्ही सहमत होऊ.

सभापती महोदय, या इमारतींची इतकी दुर्देवाची परिस्थिती आहे. इमारतीच्या दुरुस्तीकरिता लोक आमच्याकडे आमदार निधी मागण्यासाठी येतात. मी ग्रामीण भागात माझा आमदार निधी जास्तीत जास्त खर्च करतो. परंतु नाईलाजास्तव माझ्याकडे कुणी शाखाप्रमुख, गट प्रमुख आमदार निधी मागण्यासाठी येतात. नाहीतर कुणीतरी ओळख काढून पैसे मागण्यासाठी येतात. अशा इमारतीला दिलेले पैसे पुरत नाहीत. आणखी जरी त्यांना पैश्याची गरज असली तरी कुणी आमदार त्यांना पैसे देत नाहीत. आणि जरी एखाद्याने दिले तरी त्यामधून काम पूर्ण होत नाही. याचे परिणाम असे होतात की, धड ती इमारत रिपेअर होत नाही. अर्धवट अवस्थेत ती दुरुस्त होते.आणि मग माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे् त्या इमारतीमधील जुन्या लाकडांना प्रचंड मागणी येते. त्या इमारतीतील जुन्या लाकडाच्या लोभापायी ती इमारत दुरुस्त केली जात नाही. असे प्रकार मुंबईमध्ये घडत आहेत. भेंडीबाजार मधील दत्त निवास नावाची इमारत कोसळली. इमारत पडल्यानंतर मदतीसाठी अग्निशमन दल गेले, मंत्रिमहोदय तिथे बघायला गेले. त्यामध्ये कुटुंबेच्या कुटुंबे गाडली गेली. भेंडीबाजारातील त्या इमारतीत 20 जण ठार झाले. दुसऱ्या एका चाळीचा भाग कोसळला त्यामध्ये कुणीही मेले नाही. त्यामुळे गिरगावात लोकांमध्ये घबराट पसरली. अशाप्रकारच्या घटना सतत घडत असतात. मुंबई शहरात 16 ते 18 हजार जुन्या इमारती असून त्यातील 896 इमारती कोणत्याही क्षणी कोसळतील, असे म्हाडाने जाहीर केले आहे. त्यामधील भाडेकरुंना जर आपल्याला वाचवावयाचे असेल तर या इमारती तातडीने रिकाम्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KGS/ MMP/ KTG/

श्री.दिवाकर रावते....

केल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे ते म्हाडाचे अध्यक्ष होते, त्यांना खूप माहिती आहे.परंतु त्यांना नेणार कोठे? संक्रमण शिबीर बांधल्याशिवाय अणि त्यांना पर्यायी जागा दिल्याशिवाय त्यांच्या खोल्या खाली करता येत नाहीत. त्या खाली करता येत नसतील तर या मृत्यूच्या सापळयामध्ये हजारो कुटुंबे अडकून पडली आहेत. हे मी अधिकृत आणि अधिकारवानीने सांगतो. माननीय श्री. मनेहर जोशी व कै. श्री. वामनराव महाडीक यांच्या प्रयत्नाने या घरदुरुस्ती मंडळाची निर्मिती झाली. माननीय श्री. मनोहर जोशी हे नगर सेवक असतांना दादरमध्ये एका सेसायटीमध्ये या विषयावर चर्चा झाली. त्यावेळी ही चाळ कशी दुरुस्ती करावी, सोसायटीची ताकद नव्हती, सोसायटी मध्यमवर्गीयांची होती. तर मग काय करणार? श्री. मनोहर जोशी यांनी विधीमंडळामध्ये अशासकीय विधेयक मांडले. त्यामधून इमारत व घरदुरुस्ती मंडळाची संकल्पना तयार होऊन हे घरदुरुस्ती मंडळ स्थापन झाले. ते सुरुवातीपासून या प्रश्नामध्ये धुसले होते. आमच्या दादरमध्ये सर्वात जास्त जुन्या इमारती असल्यामुळे आणि त्याची जाण आम्हाला असल्यामुळे शिवशाही असतांना 500 संक्रमण शिबिरांचे सिपोरेक्स पध्दतीने बांधावयाचे काम टेंडर पध्दतीने श्री. बी.जी. शिर्के यांना दिले. त्यावेळी ठरविले की, मंडळाला जास्तीत जास्त संक्रमण शिबिरे उपलब्ध झाल्याशिवाय इमारत पाडता येणार नाही आणि त्या पुनर्वसित करता येणार नाही.

(यानपंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्याचे काय झाले ? आज मोठ्या प्रमाणावर इमारती गंभीररीत्या आजारी असून कोणत्याही क्षणी मृत्यूच्या छायेत जातील आणि आपल्याबरोबर त्या ठिकाणी असलेल्या भाडेकरुंना घेऊन जातील. त्या भाडेकरुंना हलविण्यासाठी जागा नाही. याचे कारण काय आहे ? रेल्वेच्या हद्दीमधील झोपड्या ताबडतोब हलविण्याकरिता ती घरे देऊन टाकली. रेल्वेच्या हद्दीतील झोपड्या काढा असा विषय आला होता. आपले विकासवीर श्री. चंद्रशेखर हे एमएमआरडीएच्या वतीने उपनगरामध्ये जो विकास करीत होते त्या विकासाच्या संदर्भात निर्णय घेतला. घटनात्मकदृष्ट्या आपण न्याय आणि अन्यायाच्या बाबतीत काय करणार ? मुंबई शहरामध्ये 1995 पर्यंतच्याच झोपड्यांना कायदेशीर करण्यात आले आहे. त्यानंतरच्या झोपड्या पाडल्या पाहिजेत. 2000 पर्यंतच्या झोपड्या कायदेशीर करण्याची मागणी आहे परंतु अजून 2000 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण नाही. विकास कामाच्या ठिकाणी 15 दिवसांपूर्वी बांधलेल्या झोपड्यांना सुध्दा रस्ता रुंद करावयाच आहे, नाला दुरुस्त करावयाचा आहे, उड्डाण पूल बांधावयाचा आहे यासाठी प्रकल्पबाधित म्हणून ही सगळी घरे देऊन टाकली. उलट त्या झोपड्या तोडून त्यांना हकलून लावावयास पाहिजे होते. एक महिन्यापूर्वी, दोन महिन्यांपूर्वी ज्यांनी झोपड्या बांधल्या त्यांना घरे दिली. जे विकासकामामध्ये येतात अशा लोकांना घरे दिली. कालपरवा ज्यांना ठरवून त्या ठिकाणी आणले आणि झोपड्या बांधल्या त्यांना घरे दिली. जे विकास कामामध्ये येतील त्यांना उठवावयाचे आणि विकास करावयाचा, तोंडात बोटे घालण्यासारखा विकास करावयाचा यासाठी त्या लोकांना घरे दिली. यासाठी आपण किती किंमत मोजली ? ती घरे आमच्या मोडकळीस आलेल्या इमारतीतील भाडेकरुंना द्यावयास पाहिजे होती. युती शासनाने जाणीवपूर्वक ट्रान्झीट कॅम्पचा भव्य कार्यक्रम राबविला होता. ती सगळीच्या सगळी घरे मुंबईशी संबंध नसलेल्या लोकांना दिली. मला कळत नाही. कधी कधी मला वाईट वाटते. तुमच्या या धोरणातून हिंदुस्थानमध्ये अशी परिस्थिती निर्माण होणार आहे की, आता जन्माला यावयाचे तर मुसलमानाच्या घरी. आमची जी मराठी माणसे पिढ्यान पिढ्या मुंबईमध्ये राहिली, ज्यांनी मुंबई उभी केली त्या लोकांना घरे मिळावयास पाहिजे होती. आगरी, कोळी, भंडारी यांची मूळ मुंबई आहे. त्या लोकांसाठी शासनाने काय केले ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रत्येक वेळी हिंदू-मुस्लीम असा विषय काढणे बरोबर नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना काविळ झालेली आहे काय ? मी हिंदू शब्द वापरलेला नाही. भेंडी बाजारमध्ये राहणारा प्रत्येक मुस्लीम मराठी आहे. कारण तो मराठी बोलतो. सन्माननीय सदस्यांना प्रत्येक गोष्टीची काविळ झाली आहे काय ?

श्रीमती उषा दराडे : आपण मराठी असा शब्द वापरला.

श्री. दिवाकर रावते : त्या ठिकाणी 80 टक्के मराठी लोक राहतात. त्या ठिकाणी "आई" म्हणणारे 100 टक्के लोक राहतात.

श्रीमती उषा दराडे : त्या ठिकाणी मुसलमान राहात नाहीत काय ?

श्री. दिवाकर रावते : मुंबईतील भेंडी बाजारमधील मुसलमान सुध्दा मराठी मुसलमान आहेत.

श्रीमती उषा दराडे : तीही माणसे आहेत. तेही मोडकळीस आलेल्या घरामध्ये राहात. प्रत्येक ठिकाणी राजकारण आणावयास नको.

श्री. दिवाकर रावते : तेथे तुंबलेले संडास आम्ही वापरलेले आहेत. आपल्याला ते कळणार नाही. मराठी शब्द उच्चारला तरी यांना राग येतो. हिंदू शब्द उच्चारला तरी राग येतो. त्यांनी कंव्हर्शन करुन घ्यावे.

श्रीमती उषा दराडे : आपण प्रत्येक गोष्टीमध्ये दरी का निर्माण करता ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये जी पिसाळलेली, भटकी कुत्री आहेत, ज्यांच्यापासून लोकांना त्रास होतो अशा कुत्र्यांना मारुन टाकण्याचा निर्णय हायकोर्टाने दिला आहे. या निर्णयामुळे मुंबईतील लोकांना दिलासा मिळाला असेल. सध्या मुंबई शहरात राहणा-या लोकांना या भटक्या कुत्र्यांच्या ओरडण्यामुळे रात्री झोप येत नाही. एक तर अनेक कुटुंबे एकाच छोटयाशा खोली राहतात. (अडथळा) मुंबईतील भेंडी बाजारामध्ये राहणारे मुसलमान देखील मराठी भाषेतून बोलतात. परंतु मी हिंदू हा शब्द उच्चारला तरीही समोरच्या सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे हया हरकत घेतात.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य यांनी माझे नाव घेऊन मला कावीळ झाली आहे काय असे म्हटले होते.

श्री.दिवाकर रावते : होय, मी म्हटले होते. कारण नसताना आपण माझ्या भाषणात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला त्यामुळे मी तसे म्हटले होते. सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई यांना माझ्या भाषणातील विषय आणि व्यथा जास्त कळतील. पण या मुंबईशी ज्यांचा संबंध नाही, ज्यांनी मुंबईसाठी काही केले नाही, उडाणटप्पू प्रमाणे मुंबईत येऊन येथे इ ोपडपट्टया बांधल्या त्यांच्यावर प्रेम करणा-यांबद्दल मी बोललो आहे. जे मूळ मुंबईकर आहेत त्यांचा शासनाने कधी गांभीर्याने विचार केला आहे काय ? या विधेयकाद्वारे 2000 रुपयांपर्यंत दुरुस्तीची रक्कम वाढविली जाणार आहे. पण मुंबईकरांना तुम्ही तेथेच मरा, तुम्ही आहात तेथेच रहा असे सांगणारे हे विधेयक आहे. 2000 रुपयांपर्यंत दुरुस्तीचा खर्च वाढविल्यानंतर या इमारती सक्षमपणे उभ्या राहू शकतील काय ? मुंबई शहरातील 18 हजार इमारतींच्या दुरुस्तीचा कार्यक्रम राबविता येत नसल्यामुळे मी एक प्रस्ताव शासनाला दिला होता. त्यातील 100 टक्के तरतुदी शासनाने स्वीकारल्या नाहीत. मी त्यावेळी शिवशाहीच्या मंत्रिमंडळामध्ये होतो. युतीच्या सरकारचे 5-6 महिने शिल्लक राहिले होते. त्यावेळी श्री.हरिभाऊ बागडे या खात्याचे मंत्री होते. मी वस्त्रोद्योग मंत्री होतो आणि मिल्सच्या जागेचा प्रश्न असल्यामुळे मी त्या बैठकीला गेलो होतो. परंतु नंतर युतीची सत्ता गेली. एक तृतीयांश जागा शासनाला, एक तृतीयांश जागा म्हाडाला व एक तृतीयांश जागा मालकाला देण्याचा तो प्रस्ताव होता. हाच निर्णय पुढील शासनाने राबविला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.दिवाकर रावते.....

त्यानंतर मी 4-5 वर्षापूर्वी शासनाकडे सूचना दिली होती. परंतु सध्याच्या शासनाने एफएसआय लुटण्याचे काम मागील 5 वर्षापासून सुरु केले आहे. या जागेपैकी महापालिकेला एक तृतीयांश जागा देऊन एक मोकळी जागा असावी म्हणून त्याचा टीडीआर मालकाला देण्याचा निर्णय घेतला. मुंबईमध्ये अनेक मोडकळीस आलेल्या इमारती आहेत. कुर्ल्यापर्यंत सर्व मिल्स मुंबई शहरामध्ये मोडतात. परंतु या जागेवर राहणा-या रहिवाशांना डोंबिवली सारख्या ठिकाणी पर्यायी जागा दिली जात असल्यामुळे ते तेथे जाण्यास तयार होत नाहीत. बोरीवलीला पूर्वी आदिवासी पाडे होते. तेथे कोणी उपरे आले नव्हते.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते उपरे आलेले नाहीत. त्यामध्ये काहींनी बेकायदेशीर झोपड्या बांधल्या. म्हणजे मूळ 25 टक्के आणि 75 टक्के बेकायदशीर घुसले. त्याबाबतीत कोर्टाने निर्णय दिला. त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाने करोडो रुपयांची जागा घेतली. परंतु त्याठिकाणी तेथील लोकांना जावेसे वाटत नाही. याठिकाणी जुन्या इमारतींमध्ये मुंबईचा मूळ नागरीक राहातो. त्याच्या तीन पिढ्या चाळीमध्ये राहिल्या. या लोकांना मुंबईमध्येच पर्यायी जागा मिळाली असती तर किती आनंद झाला असता ? म्हणून मी म्हाडाला मिलची 1/3 जागा देण्याची सूचना मांडली. माझे चुकत नसेल तर मिलची 1/3 जागा म्हणजे जवळ जवळ 1500 एकर जागा होते. या 1500 एकर जमिनीवर 350 चौ.फूटाच्या सदनिका बांधल्या असत्या तर मुंबईतील माणूस मुंबईतच राहिला असता. लालबागचा माणूस लालबागमध्ये, दादरचा दादरमध्ये, कुलाब्याचा कुलाब्यामध्ये या प्रमाणे तेथील लोक तेथेच राहिले असते. त्यासाठी एफएसआय वाढविता आला असता तर फार चांगली गोष्ट झाली असती. पण इन्फ्रास्ट्रक्चरचा प्रश्न पुढे आला. मिल चालू असताना जे पाणी लागत होते त्याच्या 1/3पाणी टॉवर बांधल्यानंतरही लागत नाही. मिलसाठी खूप पाणी लागायचे. सभापती महोदय, ज्या प्रमाणे एमएसएसआरडीसी स्थापन केले त्याप्रमाणे या जुन्या इमारतीतील लोकांना घरे देण्यासाठी हौसिंग कार्पोरेशन स्थापन करावे असे मला सांगावेसे वाटते. याचे कारण आता मुंबई ही एक आंतरराष्ट्रीय कमर्शियल सिटी होत आहे. जर 1500 एकरवर घरे बांधली असती तर हा जुन्या इमारतींमधील लोकांचा प्रश्न सुटला असता आणि नवे कमर्शियल प्रोजेक्ट देखील निर्माण झाले असते. लोकांना 350 चौ.फूटाची राहायला जागा मिळाली असती. मी जे प्रपोझल मांडले त्यावर शासनाने कोणतेही भाष्य केले नाही. त्यावर काय विचार करण्यात आला हे देखील माहीत नाही. ज्या इमारतींचा घर दुरुस्ती उपकर जमा करतो अशा इमारती नियम 33(7)मध्ये येतात. ह्या इमारती जवळपास 80 ते 100 वर्षे जुन्या आहेत. कारण आपल्या क्रायटेरियाप्रमाणे 1963 सालची इमारत यामध्ये घेतलेली नाही. अशा ह्या 80-100 वर्षे झालेल्या इमारतींची तात्पुरती डागडुजी केली किंवा दुरुस्ती केली तरी ह्या इमारती जिवंत राहू शकणार नाहीत. एकही इमारत 80 पेक्षा कमी वर्षाची नाही. अशा इमारतींच्या पुनर्वसनाचा प्रश्न पुढे आला त्यावेळी त्यांना 225 चौ.फूटाची सदनिका देण्याची सूचना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

करण्यात आली. या सूचनेचे स्वागत करण्यात आले. कारण 10x10 किंवा 10x15 च्या खोलीमध्ये तीन-तीन कुटुंबे राहातात. कारण त्यांना जागा घेता येत नाही. लग्न झालेले दोन भाऊ मध्ये पडदा टाकून राहातात. काही ठिकाणी सिनिअर कुटुंबाला गॅलरित झोपावे लागते. अशी चाळीतील कुटुंबे राहातात. या लोकांना 10x15च्या खोली ऐवजी 225 चौ.फूटाची सदनिका मिळत असेल तर ती आनंदाची बाब आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

शासनाने 225 चौरस फुटाची योजना काढली, त्याला शासनाने 2.5 एवढा एफ.एस.आय.दिला. झोपडपट्टीधारकांना आम्ही खूष करु शकतो म्हणून एस.आर.ए.मध्ये 269 चौरस फूटाची सदनिका देण्याचा निर्णय शसनाकडून घेण्यात आला. 269 चौरस फुटाचे गणित शासनाने कोठून आणले याची मला अद्याप माहिती मिळू शकलेली नाही. शासनाने 270 वा 275 चौरस फुटाची सदनिका देण्याचा का निर्णय घेतला नाही ? 269 चौरस फुटाची सदनिका देण्याचा निर्णय का घेतला यासंबंधीची माहिती मला कोणी सांगू शकले नाही. 269 चौरस फूटाची जागा द्यावयाची आणि एस.आर.ए.ला 3 एवढा एफ.एस.आय.देण्याचा शासनाने निर्णय घेतला. ही चांगली गोष्ट आहे. झोपडपट्टीधारकांना मोठी घरे मिळतील. बिल्डरला 0.5 एफ.एस.आय.वाढवून एकूण 3.00 एवढा एफ.एस.आय.मिळेल. ही गोष्ट देखील चांगली आहे. त्यातील छुप्या गोष्टी आहेत, त्याबाबतीत मी आता काही बोलत नाही. एस.आर.ए.योजनेवर बोलण्याचा आजचा हा विषय नाही. मुंबईचे जे मूळ नागरिक आहे त्यांना 225 चौरस फुटाची सदनिका दिली जाते, आणि बाहेरुन आलेले अहिरे- गहिरे ज्यांनी मुंबई शहरात अनधिकृतपणे झोपडया बांधून संपूर्ण शहराचा सत्यानाश केला. श्री.अंतुले यांना पाठिंबा देण्याऱ्या व्यक्तीचे नाव आपण आपल्या मुखाने कधीही घ्यावयाचे नाही. रेल्वे मंत्री आणि रसायने, खते आणि पोलाद मंत्री यांचे नाव मी घेऊ इच्छित नाही. या सदनात आम्ही वारंवार विचारले की, तुम्ही इनडिस्क्रीमिनेशन का करता ? शासनाने सुसर्वांना समान न्याय दिला पाहिजे. नंतर धारावी प्रकल्प उदयास आला. जुन्या चाळीत राहणा-यांच्या हिताचे धोरण शासनाने घेतले नाही. या प्रकल्पात आपल्या घबाड मिळवावयाचे असल्यामुळे दुस-यांना खूप ठेवावयाचे धोरण या प्रकल्पाच्या बाबतीत घेतले गेले. धारावी प्रकल्पातील कुटुंबियांना 350 चौरस फुटाची सदनिका द्यावयाची अशी संकल्पना शासनाने पुढे केली. धारावीतील वस्ती अतिशय जुनी आहे. मुंबईतील सात बेटांमधील धारावी एक मुख्य बेट आहे. धारावी येथील मूळ नागरिक कोळी बांधव आहेत. त्यानंतर धारावीतील वसाहत मोठया प्रमाणात वाढली. धारावी डेव्हलपमेंटसाठी मोठमोठया आंतराष्ट्रीय कंपन्या येणार आहेत. या ठिकाणच्या जुन्या भाडेकरुचे पुर्नवसन 400 चौरस फुटाच्या सदनिकेत करावे अशी आमची मागणी होती. ती मागणी 300 चौरस फुटापर्यंत आली. तत्कालिन मुख्यमंत्र्यांकडे गृहनिर्माण विभाग होता. त्यांच्या डोक्यात काय आले मला माहिती नाही. त्यांनी सांगितले की, क्लस्टर डेव्हलपमेंटला 300 चौरस फुटाची सदनिका देऊ. आठ-नऊ चाळी विकत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

घ्यावयाच्या, ती जागा ताब्यात घेतल्यानंतर तेथील मूळ भाडेकरुना 300 चौरस फुटाची जागा द्यावयाची. क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून मूळ भाडेकरुना 300 चौरस सदनिका दिली तर रस्ता व इतर सोयी त्यांना उपलब्ध करुन देता येईल. मागील अधिवेशनात या विषयी सभागृहात चर्चा सुरु असताना मी माननीय मुख्यमंत्र्यांना असे सांगितले की, घटनेप्रमाणे तुम्हाला सारख्याच वस्त्यांमध्ये राहणा-या व्यक्तींना दोन वेगवेगळया गोष्टी देण्याचा अधिकार नाही. त्यांना शासनाकडून सारख्याच सुविधा मिळाल्या पाहिजेत असा घटनात्मक अधिकार त्या नागरिकांना देण्यात आलेला आहे. शासन म्हणून तुम्ही असा दुजाभाव करु शकत नाही. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, एक इमारत जरी विकसित होत असेल तर त्या इमारतीस परवानगी दिली जाईल. त्यांच्या त्या बोलण्याप्रमाणे आणि नोटींग प्रमाणे पाठपुरावा करीत राहिलो. शासनाकडून 300 चौरस फुटाच्या सदनिकेचे आदेश कधी निघतील. या नोटींचा पाठपुरावा करताना मला अधिका-यांकडून सांगितले जावयाचे सदर फाईल माननीय मुख्यमंत्र्यांकडे गेली आहे. दुर्देवाने मध्यंतरी या जुन्या चाळींच्या विकासावर अवकळा निर्माण झाली. मध्यंतरीच्या काळात महानगरपालिकेत एक आयुक्त आले. त्यांना काय लहर आली मला माहिती नाही. पाच फुटाची ओपन स्पेस नको. ओपन स्पेस सगळीच्या सगळी बंद केली. सदर चाळी 18 फूट, 20 फूट उंचीच्या होऊ शकत नाहीत. त्यामुळे चाळ पुनर्विकासाची कामे थांबली. सदर प्रकरण कोर्टात गेले....

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री.दिवाकर रावते....

सुप्रीम कोर्टामध्ये त्याचा निर्णय लागेपर्यंत दीड पावणे दोन वर्षे गेली. सर्व कामे ठप्प झाली. जुन्या चाळीतील लोक तिथेच. विकास तिथेच. इमारती कोसळत आहेत. दुरुस्तीच्या सापळ्यात अडकल्या आहेत. आज ट्रान्झिट कॅम्पमध्ये तीन-तीन पिढ्या झाल्या तरी ते मुळच्या जागेत जात नाहीत अशी मुंबईकरांची दुरावस्था तुम्ही केली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी जो शब्द सदनामध्ये दिला, त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रश्न आला. त्याप्रमाणे नियम बनवावयास घेतले. 28 नोव्हेंबर, 2008 रोजी 300 चौ.फूट जागा द्यायची एक पब्लिक नोटीस आली. आम्ही स्वागत केले. 10 बाय 10 च्या जागेत राहणाऱ्या भाडेकरुला 300 चौ.फूट जागा देत असताना एक बेडरुम, एक हॉल आणि एक किचन अशी व्यवस्था असणार आहे आणि त्याचे स्वप्न साकार होईल. हे सगळे करीत असताना आमच्या मूळ मुंबईकरांना कधी सुखाचा घास भरवायचाच नाही असा जणू या सरकारचा निर्धारच आहे. दळभद्री प्रवृत्ती म्हणतात ती परफेक्ट लागू होते. द्यायचे परंतु दळभद्री प्रवृत्ती जोपासायची. झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांसाठी 269 चौ.फुटाची घरे देत असताना एफएसआय 3 केला, परंतु इथे 2.5 एफएसआय ठेवला. 300 चौ.फूट द्या. परंतु 3 एफएसआय करु असे म्हणाले ते केले नाही. हे सगळे करीत असताना कोणत्या अधिकाऱ्यांच्या डोक्यातून हे आले माहिती नाही. तो निश्चितच मुंबईचा माणूस नसावा. तो आयुष्यात कधी जुन्या चाळीत राहिला नसावा. गिरगाव, दादर, परळ, लालबाग याठिकाणी चाळी एकमेकाला खेटून घट्ट उभ्या आहेत. कापसाच्या गोडावूनला आग लागली तेव्हा सगळया चाळीत घबराट पसरली. मी आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण मुंबई महापालिकेत नगरसेवक असताना एकमेव विषय असायचा तो हाऊस गल्ली. एकच विषय. चाळीतील लोक कचरा टाकायचे तो एक-एक मजल्यापर्यंत भरायचा. हाऊस गल्ली साफ करण्याबाबत मुंबई महापालिकेच्या कुठच्याच कायद्यात तरतूद नाही. तिनईकर हे आयुक्त असताना त्यांच्याकडून तरतूद करुन घेतली. नंतर ती रद्द झाली. आताही महापालिकेत तीच लढाई चालू आहे. ती जुनी इमारत संपूर्ण दुरुस्त होते. परंतु संडासाचे पाईप दुरुस्त होत नाहीत. घर दुरुस्ती मंडळात तरतूद नाही. आधी आमदार फंड, नगरसेवक फंड वापरता येत नव्हता. तो मान्य करुन घेतला. सगळे शौचालयाचे पाईप फुटल्यामुळे त्यातून जे मलमूत्र बाहेर पडते ते पाहून समोरच्या चाळीतील रहिवाशांचे जगणे असह्य होऊन जाते. सन्माननीय श्री.अशोक पडबिद्री हे लोकसत्ता दैनिकाचे संपादक होते. त्यांनी या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

विषयावर एक आर्टिकल लिहिले होते. मी नगरसेवक झाल्यानंतर त्यांना त्यांच्या घरी भेटायला गेलो. ते घामट टॅरेसमध्ये रहात होते. ज्यांच्या हातामध्ये मुख्य शस्त्र होते ते सुध्दा काही करु शकत नाहीत अशी त्यांची अवस्था झाली होती. संडासामधून होत असणारी गळती बघून त्यांचे तिथे राहणे अशक्य झाले होते. नगरसेवक झाल्यानंतर मी त्यांच्या घरी गेलो. तिसऱ्या मजल्यावर ते रहात होते. त्यांच्या खिडकीतून सर्व दृश्य बघितले. कसे त्यांचे जीवन असह्य झाले आहे हे जवळून पाहिले. जेवायला सुध्दा बसू शकत नाही अशी बिकट परिस्थिती होती. त्यातून पाईप दुरुस्तीसाठी नगरसेवक फंड वापरण्यास मिळाला. किती गोष्टी करायला लागतात ते पहा. जुन्या चाळींच्या या गोष्टी करायला हे सगळे पर्याय आम्ही पहात असताना आता नियम बनविणाऱ्यांना काही कळते का? त्यांचे जीवन कसे आहे हे कधी जाऊन पहा.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

काय पडते, दिसत आहे, हादरत आहे तरी सुध्दा ती इमारत सोडण्यास तयार नाहीत. कारण या इमारतीत त्यांच्या भावना गुंतलेल्या असतात. वाड-वडिलांपासून त्याच खोलीत जन्माला येणे, शिक्षण वगैरे त्यांचे झालेले असते. मला चांगले आठवते की, आमच्या खोलीत पुरेशी जागा नसल्यामुळे पलंगाखाली बसून मी अभ्यास करीत होतो. अशा खोलीत कसे राहतात याचे निरीक्षण करण्यासाठी एक लेखक आले होते आणि त्यांनी माझ्यावर लेख लिहिला होता व तो लेख गिनीज बुकात गेला आहे. म्हणून अशा चाळींचा विकास व्हावा ही प्रामाणिक इच्छा मनात ठेवून मी हे बोलत आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना दोष देणार नाही. मघाशीच मी त्यांच्याशी बोललो, ते मला म्हणाले की, मला ब्रिफ करा आणि काय असेल ते मी समजावून घेतो. म्हणून यावरील उत्तर माननीय राज्यमंत्री देऊ शकत नाहीत, म्हणजेच धोरणात्मक निर्णयाच्या संदर्भात त्यांना सांगणे शक्य होणार नाही. दुसरे म्हणजे कलम 33 (7) या कलमाच्या संदर्भात नवीन सूचना मागविल्या आहेत. योगायोग असा की, या सूचना फक्त ऑनलाईन, इंटरनेटच्या माध्यमातून मागविल्या आहेत, पेपरमध्ये नोटीस दिलेली नाही. सूचना फक्त वर्तमानपत्रातून मागवून दिलेल्या आहेत, मला त्याचा अर्थ कळला नाही. शासनाच्या निर्णयाच्या संदर्भात अशा प्रकारे प्रतिक्रिया मागविल्या आहेत. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, या इमारतीत राहणाऱ्या लाखो लोकांचा प्रश्न असून त्यासंबंधीचा निर्णय घेतला तरी निदान 887 चाळी तरी ताबडतोब दुरुस्तीसाठी हाती घेतल्या जातील. कारण जुन्या इमारतींची पुनर्बांधणी व जुन्या भाडेकरुंना घरे देऊन, नवीन घरे विकल्यानंतर जी रक्कम विकासकाला मिळेल त्यातून हे प्रकल्प उभे करावयाचे. हे प्रकल्प उभे करीत असताना मुंबईत मोठमोठे टॉवर्स उभे राहतात, त्यात पार्किंगची सुविधा चांगली आहे. दोन-तीन मजल्यापर्यंत पार्किंग असते आणि नंतर वर रहिवासाची घरे असतात. अशा इमारतीसाठी प्रचंड पैसा खर्च होतो आणि जी तरतूद आहे त्यामध्ये अशी परिस्थिती आहे की, प्रत्यक्ष वापराचे बांधकाम 10 हजार चौरस फूट असेल, मग त्यात कार्यालय अथवा दुकान असेल, असे 10 हजार चौरस फूट बांधकाम करावयाचे असेल तर प्रचलित नियमानुसार 21 हजार चौरस फूट बांधकाम करावे लागणार आहे. कारण त्यात पार्किंग, बेसमेंट इ. चा अंतर्भाव असतो. म्हणजे जे काम 5 रुपयात होणार होते त्याला 10 रुपये खर्च येणार व त्यासाठी निधी उभारावयाचा आहे. हे सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

असले तरी जो विकासक येईल त्याला इमारतीचे पुनर्बांधणी करण्यामध्ये अडचण येईल. अशा प्रकारे या विधेयकाच्या माध्यमातून कलम 33 (7) मध्ये सुधारणा करण्याचा शासनाने विचार केला तर तो या योजनेला विद्रुपता निर्माण करणारा असेल. म्हणून यात तातडीने जोपर्यंत शासन सुधारणा करणार नाही तोपर्यंत अशा इमारतींचे नव्याने बांधकाम होणार नाही. हे सर्व गाजर राहील, "बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी" एकाही इमारतीचा विकास होणार नाही. कारण त्यात काय केलेले आहे, काय असावे याचे तारतम्य बाळगणे आवश्यक होते. म्हाडाच्या जुन्या नियमाप्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांक 2 आणि सदनिकेचे क्षेत्रफळ 225 चौरस फूट असे होते. सीआरझ ोड अंतर्गत मुंबईत बऱ्याच चाळी आहेत आणि या सीआरझेडने बाधित होणाऱ्या सदनिकांचे किमान क्षेत्र देण्याच्या बाबतीत खुलासा होणे आवश्यक आहे, अशी माझी विनंती आहे. कारण हा एफएसआय दोनच देणार की त्यात वाढ होणार आहे याचा बोध होत नसल्याने त्यासंबंधीचे स्पष्टीकरण करावे. म्हणून मी केलेल्या सूचना आपल्याला स्वीकाराव्या लागतील कारण त्याशिवाय आपल्याला एकाही इमारतीचा पुनर्विकास करता येणार नाही, व त्यासाठी या नियमात कुठलीच दुरुस्ती नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

दादर मधील गोखले रोड, लालबाग,परळ, गिरगाव या ठिकाणी तुम्ही माझ्याबरोबर आलात तर तुम्हाला सर्व वस्तुस्थिती समजून येईल नाही तर हे सर्व कशासाठी केले हा प्रश्न निर्माण होईल. सीआरझेड मध्ये बाधित होणा-या इमारतींच्या संदर्भात मला जे वाटते ते मी आपल्याला सांगतो आहे. सीआरझेड मुळे बाधित होणा-या सदनिकांना जास्तीतजास्त 300 चौरस फूट म्हाजे 27.88 मीटर देणे नवीन नियमाप्रमाणे आवश्यक केलेले आहे. चटई क्षेत्र निर्देशांक सीआरझेडच्या निर्देशांकानुसार 2 असेल, तर या झोनने बाधित होणा-या क्षेत्रावरील बाधित होणा-यांचे पुनर्वसन करणे विकासकाला आर्थिक दृष्टया परवडणार नाही. म्हणून त्यामुळे सदर क्षेत्राचा विकास करण्यासाठी विकासक पुढे येणार नाही हे लक्षात घेऊन सीआरझेड मुळे बाधित होणा-या क्षेत्राच्या संदर्भात आपण 2.5 हा निर्देशांक करणार आहात काय ? हा निर्देशांक करणे आवश्कय आहे नाही तर कोणतेही काम होणार नाही हा मुळ मुद्दा आहे आणि ते काम आपण करावे अशी माझी सूचना आहे. सदनिकेचे किमान व कमाल क्षेत्रफळाच्या संदर्भात तर परिस्थिती फार भयानक आहे. अगोदर जुनी मोठी घरे असायची. परंतु यामध्ये आपण 750 चौ. फुटाच्यावर घर द्यावयाचे नाही असा नियम केला. तुम्ही 100 फूट असणा-याला 250 चौ. फूटाचे घर देत आहात व आपण एकीकडे जास्तीत जास्त 750 चौ.फूटाचा उल्लेख केलेला आहे. आपण जर 100 फूटाचे 250 केले, 225 चौ.फूटाचे 300 करीत आहात तर किमान आपण 750 चौ. फूटाच्या घराचे 1000 चौ. फूट करावे अशी माझी आपल्याला ठोस सूचना आहे. अशा घरांमध्ये वडिलोपार्जित 5-5,7-7 पिढ्या राहिलेल्या आहेत. त्यामुळे 750 चौ.फूटाचे 100 किंवा 225 चौ. फूटामध्ये आपण जशी वाढ केलेली आहे त्या प्रमाणात वाढवावे अशी माझी दुसरी सूचना आहे. जर एका ठिकाणी आपण वाढ देत असाल तर दुस-या ठिकाणीही त्या प्रमाणात वाढ झालीच पाहिजे. यासंदर्भात आपण कोष्टक ठरवलेले आहे. इमारतीला अनुज्ञेय असणा-या क्षेत्रफळाच्या संदर्भात अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र काढतांना म्हणजे पर्मिसिबल बिल्टअप क्षेत्र काढतांना सेन्सेटीव्ह स्कीम्स प्रमाणे 2.5 चटई क्षेत्र आपण देत आहात. 3 चटई क्षेत्राचा आपण उल्लेख केला आहे काय ? उल्लेख केला असेल तर आनंद आहे. 3 चटईक्षेत्र असावे अशी माझी सूचना आहे. अस्तित्वात असणा-या नियमामध्ये अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र काढतांना 2.5 चटईक्षेत्र निर्देशांकाप्रामाणे येणारे क्षेत्र यापैकी जे जास्त आहे ते ग्राहय धरण्यात येते त्याच प्रमाणे नवीन नियमामध्ये फक्त सदनिकाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

चटईक्षेत्राचाच उल्लेख करण्यात आलेला आहे. भूनिर्देशाकाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. 2.5 चे जे चटईक्षेत्र आहे ते 3 करणार का ? या नियमामध्ये त्यामुळे बदल करण्याची आवश्यकता आहे. नाही तर जुना नियम ठेवला आणि भाडेकरुंच्या सदनिका वाढवल्या तर ते योग्य होणार नाही. त्यामुळे यासंदर्भातील धोरणात्मक भूमिका आपल्याला जाहीर करावी लागेल. बांधकाम करावयाचे झाले तर कसे करावे असा प्रश्न निर्माण करावा अशी सूचना आहे. मी संबंधित सचिवांशी यासंदर्भात चर्चा केली, त्यांच्या सुध्दा ही बाब लक्षात आली. सचिवांच्या ही गोष्ट लक्षात आली याचा मला देखील आनंद झाला. सभागृहात आपण हे विधेयक आणले त्यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्यावेळेस बील सभगृहात येते तेव्हा जनतेच्या ऑब्जेक्शनपेक्षाही सदनामध्ये आलेल्या सूचनेला जास्त महत्व असते. कारण विधिमंडळाचे काम हे कायदे बनवण्याचे आहे. कायदे बनवित असतांना आपल्याला जर सदस्यांच्या सूचना आल्या तर त्यासंदर्भातील बदल तातडीने करणे आवश्यक असते. आता नियम असा केला आहे की, रस्त्यापासून 3 मीटर मोकळी जागा व इमारतीच्या सभोवतालची मोकळी जागा किमान 1.5 मीटर व जास्तीत जास्त 6 मीटर असावी असा नियम आहे. परंतु आता आपण रस्त्यापासून 6 मीटर मोकळी जागा केलेली आहे. अगोदर 3 मीटरची मर्यादा होती परंतु आपण त्यामध्ये डबल वाढ करुन 6 मीटर केलेली आहे. समजा माझा भूखंड 70,60,50 चौ. मीटरचा असेल आणि त्यामध्ये आपण जर 18 फूट मागे जाण्यास सांगितले तर राहिलेल्या भूखंडामध्ये इमारत बांधताच येत नाही कारण मला मागून सुध्दा जागा सोडायची आहे. मागून आणि पुढून जागा सोडली तर उपलब्ध जागेतून इमारत उभीच राहू शकत नाही. त्यामुळे यासंदर्भात जी सूचना आहे ती सूचना मुळातच चुकीची आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 17.40

श्री. दिवाकर रावते.....

तीन मीटरच्या संदर्भात जी सूचना करण्यात आली आहे ती तशीच ठेवणे भाग आहे.नवीन सुधारणा करीत असतांना ऊंचीच्या बाबतीत फरक करण्यात आलेला आहे त्यात सुध्दा अन्याय केला जात आहे. त्यामुळे या इमारती बांधल्या जाणार नाहीत. जे चटई क्षेत्रफळ उपलब्ध असेल ते जर पूर्णपणे उपयोगात आणले गेले नाही तर कोणताही प्रकल्प बांधण्यायोग्य होणार नाही व कोणताही विकासक तो प्रकल्प पूर्ण करु शकणार नाही तसेच तेथे इमारती बांधल्या जावू शकणार नाहीत. 20 मिटर पर्यत ऊंचीच्या इमारतीच्या सभोवतालची मोकळी जागा 3.50 मीटर, 20 ते 24 मिटरच्या उंचीच्या इमारतीच्या सभोवतालची मोकळी जागा 6 .50 मिटर व 24 मीटर पेक्षा उंच असलेल्या इमारतीच्या सभोवतालची मोकळी जागा 6 मीटर अशा प्रकारे असावी अशा प्रकारची सुधारणा या विधेयकामध्ये सुचविण्यात आलेली आहे ही सुधारणा अयोग्य आहे. त्या सुधारणेमुळे काम करता येणार नाही व 80 टक्के इमारती यामध्ये बसणार नाहीत. . पुढची , मागची आणि बाजूची मोकळया जागे बाबत नवीन सुचविलेल्या नियमामध्ये 20 मीटर उंच असलेल्या इमारतीसाठी मोकळी जागा 3.5 मिटर , 24 मिटर उंच असलेल्या इमारतीसाठी 4.50 मिटर आणि 24 मीटर पेक्षा जास्त उंच असलेल्या इमारतीसाठी 6 मिटर इतकी मोकळी जागा सोडणे आवश्यक आहे असे सुचविण्यात आलेले आहे . दक्षिण मुंबई मध्ये सर्वसाधारण उपकर प्राप्त इमारतीच्या भूखंडाची रुंदी 10 मिटर असते दादर भागातील इमारतीची रुंदीसुध्दा 10 ते 12 मिटरची आहे. तेव्हा या नवीन नियमामध्ये या इमारती बसणार नाहीत म्हणून नवीन इमारतीची रचना करीत असतांना पार्कीग देण्यासाठी **पोडियम** देण्याची गरज या नियमामध्ये सांगितली आहे सबब या बाबीमुळे इमारतीची उंची 24 मिटर पेक्षा जास्त होते. आपल्याला दोन ते तीन मजले पार्किगसाठीच बांधावे लागतील. त्यामुळे नवीन नियमात उल्लेख केलेल्या मोकळया जागेनुसार इमारतीचा पुर्नविकास करणे अशक्य होणार आहे म्हणून रस्त्यापासूनची 3 मिटर , तसेच आजूबाजूची जागा 1 .5 मिटर ते जास्तीत जास्त 6 मिटर जागा असली पाहिजे अशी जी तरतूद करण्यात आलेली आहे ती तशीच ठेवावी अशा प्रकारची मी सूचना करतो तसेच ब आणि क वर्गीकृत इमारती सीआरझेडमुळे बाधित होणार असतील तर अशा इमारतींच्या पुनर्विकासाठी भूखंडावरील 2 चटई क्षेत्र निर्देशांक देण्याची तरतूद आहे त्या ऐवजी 2.5 चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात यावा अशा

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

प्रकारची सूचना मी केलेली आहे त्या सूचनेच्या संदर्भात शासनाने धोरणात्मक भूमिका जाहीर करावी अन्यथा इमारत दुरुस्तीचा 1200 रुपयाचा दर 2000 जरी करण्यात आला असला तरी त्यामुळे इमारती दुरुस्त होऊन लोक सुखाने राहतील अशातला भाग नाही. त्यामुळे शासन फक्त तात्पुरती मलमपट्टी करीत आहे. जोपर्यंत इमारतीचा पुनर्विकास होत नाही तोपर्यंत या इमारतीमध्ये राहणा-या भाडेकरुंवर मृत्यूची टांगती तलावर कधीही जाणार नाही. त्यामुळे अत्यंत नम्रपणे आणि तेवढयाच आग्रहाने मी असे सांगत आहे की, यासाठी 2.5 चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात यावा. त्याचप्रमाणे ज्या मूळ मुंबईकरांनी `या राज्यात विकास केला त्या मूळ मराठी माणसाच्या हिता करिता 2.5 चटई क्षेत्र देण्याच्या संदर्भात धोरण जाहीर करावे . अन्यथा या इमारतीमधील भाडेकरुंना शासन मृत्यूकडे लोटत आहे अशाच प्रकारचे चित्र तयार होईल त्याचबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांनी जुन्या चाळीच्या पुनर्विकासाचा आराखडा देण्याचे वचन सभागृहात दिले होते ते पूणर्त्वास नेण्यासाठी या सूचनांची तातडीने अंमलबजापवणी करावी आणि त्यासबंधीचे धोरण जाहीर करावे अशी मी विनती करतो . सभापती महोदय, या विधेयकावर बोलण्यासाठी आपण मला जी संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो. जयहिंद ,जय महाराष्ट्र.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, श्री. दिवाकरजी रावते यांनी अतिशय सविस्तर मुद्दे मांडलेलेच आहत त्यामुळे केवळ त्यातील काही मुद्दे या निमित्ताने विशेष करून मुंबईतील चाळींमध्ये राहणाऱ्यांचे काय म्हणणे आहे ते येथे मांडण्याची संधी मिळते आहे तर ती घेऊन आवर्जून ते मांडतो आणि त्यांचा विचार माननीय मंत्री महोदय करतील आणि त्यावर काही उत्तर देतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, जुन्या इमारतींची दुरूस्ती करण्यासाठी जो 1200 रूपयांचा निधी आपण देत होता त्यात 800 रूपयांची वाढ केली आहे, ही एक अतिशय योग्य गोष्ट आहे. पण सिमेंट, स्टिलचे भाव वाढले असे आता म्हणण्याचे काहीच कारण नाही. कारण आता त्यांचे भाव त्या मानाने प्रचंड प्रमाणात उतरले आहेत. म्हणजे जेव्हा आपण हा निधी 1 हजार रूपयावरून 1200 रूपये केला तेव्हा जेवढे भाव होते त्यापेक्षाही आता स्टीलचे भाव कमी झालेले आहेत. त्यामुळेच याचा उल्लेख या विधेयकाच्या उद्देश्य व कारणे यामध्ये करणे योग्य होणार नाही, ते कारण टिकणारे नाही. त्यामुळे हा निधी 2000 पर्यंत वाढले पाहिजे हे म्हणणेच योग्य राहील.

सभापती महोदय, त्यानंतर दुसरा मुद्दा 300 चौ.फूटाचे घर देणे हा आहे. या संदर्भात मुंबईतील जुन्या चाळींमध्ये, जुन्या इमारतींमध्ये राहणाऱ्या माणसाचे दु:ख काय आहे हे आपण समजून घ्या. आज मुंबईमध्ये येऊन जे अनधिकृतपणे कोठेही झोपड्या बांधून राहतात, अनधिकृत झोपडपट्ट्यांमध्ये राहतात त्यांनाही आपण 300 चौ.फूटाची जागा आपण मिळवून देता. आणि आम्ही दरमहा सेस भरतो, प्रामाणिकपणे सरकारचे सारे कर भरतो पण आम्हाला मात्र कोणताही फायदा दिला जात नाही. मुंबईतील सामान्य मराठी माणसाला याचेच प्रचंड दु:ख आहे. जे अनधिकृतपण येथे येऊन राहतात ते सरकारचे जावई म्हणून फुकटात त्यांना 300 फूटाचे घर दिले जाते आणि मूळचा जो मुंबईकर आहे, मुंबईतील जुन्या इमारतीमध्ये, चाळींमध्ये राहणारा सामान्य मराठी माणूस आहे, जो प्रामाणिकपणे दरमहा सेस भरून त्या जागांमध्ये राहतो त्यांना मात्र सरकार अतिशय दुय्यम स्तराची वागणूक देते आहे असा एक समज या मुंबईतील जुन्या इमारतींमध्ये, चाळींमध्ये राहणाऱ्या माणसाचा झालेला आहे. म्हणूनच स्वाभाविकपणे या लोकांची अपेक्षा आहे की, त्यांना देखील किमान 300 चौ.फूटांचे घर मिळाले पाहिजे. या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, आम्ही त्याप्रमाणे देऊ. पण ती अद्यापपर्यंत अमलात आलेली नाही. तेव्हा त्या बाबतीत देखील शासनाने काही येथे स्पष्ट खुलासा करणे आवश्यक आहे. .... 3एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तावडे .....

सभापती महोदय, त्यानंतर क्लस्टर डेव्हलपमेंटचा मुद्दा येथे आला. त्यातील सगळ्यात मोठी मेख अशी आहे की, शासकीय, निमशासकीय, खाजगी जे येईल ते सगळे एकत्रपण या क्लस्टरमध्ये येणार ाहे. म्हणजे शासनाची एखादी पडिक जमीन असेल वा इमारत असेल तर तीसुद्धा त्यात घयची. त्याचा फायदा बिल्डरला होणार आहे. आता सेसखालील इमारतीदेखील त्यात येणार आहेत आणि विकास नियमावलीतील 33(9) च्या बाबतीत जी सुधारणा केली गेली त्यावर सह्या दिल्लीवरून बदलाचा निरोप आल्यानंतर झालेल्या आहेत. ज्यावेळी आपले सगळे संपले आहे, आपल्या जागी नवीन माणूस येणार आहे हे निश्चित झाले म्हणून मग घाईघाईने फाईल्स मागवून त्यावर सह्या झ ाल्या. इतकेच नाही तर लगेच त्यासंबंधित बिल्डर्सना फोनसुद्धा झाले. सभापती महोदय, दिल्लीवरून सारे दोर कापले गेले, त्यानंतर केअर टेकरच्या भूमिकेत असतानाच या सह्या झाल्या. परंतु आता 300 चौ.फूट घरे देण्याच्या बाबतीत चर्चा आहे, त्याची चर्चा सुदैवाने आता या अधिवेशनाचा कालावधी वाढला गेला असल्याने आम्हाला करता येण्याची संधी आहे. माणी एक नियम 93 अन्वये दिलेली सूचना देखील माननीय सभापतींनी राखून ठेवलेली आहे त्यावर हे अधिवेशन 24 डिसेंबर पर्यंतच असते तर उत्तर आले नसते पण आता अधिवेशनाचा कालावधी वाढलेला असल्याने 30 तारखेपर्यंत त्यावर उत्तर येईल अशी अपेक्षा आहे. तेव्हा प्लॅनसारखे बरेच मुद्दे आहत. त्यावर अनेक अब्रू नुकसानीच्या नोटीसा येऊ शकतील परंतु तरीही त्याबाबत आम्हाला चर्चा करावयाची आहे. तेव्हा 300 चौ.फूटाच्या बाबतीत आज माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टपणे या जुन्या चाळकऱ्यांना एक चांगला संदेश द्यावा की, आम्ळी अमुक दिवसात या या पद्धतीने हे अमलात आणू. आता याबाबत असे झाले आहे की, घोषणा झाली, वृत्तपत्रांतून आले की, 300चौ.फू.ची जागा मिळणार. माननीय मुख्यमंत्र्यांनी ही धोषणा केल्यामुळे झोपडपट्टीवासियांना जरहे मिळणार आहे तर आता जे ट्रांझिट कॅम्पमध्ये आहत आणि जे जुन्या इमारतींचे प्लॅन्स सुरू आहेत, ते प्लॅन्स 279 चौ.फूट प्रमाणे आहेत परंतु तेही आता त्याप्रमाणे घ्यायला तयार नाहीत. त्यांना देखील 300 चौ.फूट जागाच पाहिजे. खरे म्हणजे आपण चाळीत राहणाऱ्या या जनतेला सांगितले पाहिजे की, ज्या जुन्या इमारतींचे बांधकाम सुरू व्हायचे आहे, जरी त्याच्या वर्क्स ऑर्डर दिल्या असतील तरीही ....

(यानंतर श्री. सरफरे ..... 3आय 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विनोद तावडे...

या घरामध्ये जायला कुणी तयार नाही. असे असतांना माननीय मुख्यमंत्री आणि माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री घोषणा करतात. केलेल्या घोषणेप्रमाणे जर अंमलबजावणी झाली नाहीतर वर्तमानपत्राची कात्रणे घेऊन संक्रमण शिबिरातील चाळकरी मंडळी कोर्टामध्ये जाणार. आणि मग बांधलेल्या नव्या इमारती असल्या तरी कोर्ट त्यांच्याविरोधत आदेश देईल आणि त्यामुळे त्या सदनिका आपल्याला उपयोगात पडणार नाही. म्हणून मला याठिकाणी नम्रपणे सांगावयाचे आहे की, ज्याठिकाणी वर्कऑर्डर दिली आहे परंतु बांधकाम सुरु व्हावयाचे आहे त्याठिकाणी आपण 300 चौ. फू. चा निर्णय लवकर लागू करा. अन्यथा कोर्टाची चपराक मिळाल्यानंतर तुम्ही काम सुरु कराल. जो माणूस प्रामाणिकपणे सेस भरतो. त्याच्या हिताचा विचार करणार असाल तर तो लवकर करण्याची गरज आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण म्हणाले की, जेवढा सेस भाडेकरु देतात तेवढा सेस मॅचिंग ग्रँटच्या स्वरुपात राज्य सरकारने देण्याची कायद्यात तरतूद आहे. हा कायदा 1995 ते 99 च्या दरम्यान झाला आहे.त्यामध्ये प्रचंड अनुशेष होत आहे. तो आपण कव्हर केला तरीही पुन्हा बॅकलॉग राहिला आहे. एका बाजूला आपल्याकडे इमारतीच्या दुरुस्तीसाठी पैसे नाही असे म्हणत असतांना या चाळकऱ्यांच्या हक्काचा पैसा आहे. मुंबईच्या चाळीत रहाणाऱ्या माणसाला प्रामाणिकपणे वाटते की, माझ्या हक्काचे घर मला मिळावे यासाठी या विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये नियम आणि कायदे बनविले जातात. अशाठिकाणी माझ्यासाठी हा कायदा संमत झाला. सभापती महोदय, मुंबईमध्ये 1995 नंतर नागरिकांना मात्र मोफत घर मिळते. आणि आम्ही प्रामाणिकपणे जेवढा सेस शासनाकडे जमा करतो तेवढा सेस कायद्याने जमा करणे शासनाचे काम असतांना तो जमा करण्यात येत नाही. आपल्या घरदुरुस्ती मंडळाने 100 कोटी रुपये पणन महामंडळाला दिले आहेत की नाहीत? आपल्याला आठवते काय? आपल्याकडे पैसे नाहीत ना? आपला खिसा फाटका आहे, खिसा शिवायला आपल्याकडे कापड नाही. आपण आपले कापड पणन महामंडळाला दिले. दुर्दैवाची बाब अशी की,माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृहनिर्माण खात्याबरोबर आणखीन दहा खाती आहेत. त्यांनाही अजून वेळ मिळत नाही. आमचे राज्यमंत्री माननीय ॲड.प्रीतम शेगावकर हे अतिशय साधे व शांत स्वभावाचे आहेत. आपल्या खिशामधून पणन महामंडळ 100 कोटी रुपये घेऊन गेले तरी सुध्दा आपण तोंडातून शब्द काढीत नाही. याचा जबाब आपण जनतेला कसा देणार? चाळीत रहाणारी माणसे कुणाला मानतात? त्याच्यासमोर आपल्याला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. विनोद तावडे...

तोंड उघडणे अवघड जाईल. आपल्या नेत्यांना उत्तर देणे सोपे होणार नाही. आपले हक्काचे 100 कोटी रुपये आले पाहिजेत. आपण ते किती वेळा मागितले? हे विधेयक याठिकाणी मांडीत असतांना मंत्रिमहोदयांनी त्यासंबंधी आपली भूमिका मांडली पाहिजे. माननीय राज्यमंत्री ज्यावेळी नवीन होते त्यावेळी आम्ही जास्त आग्रह धरीत नव्हतो. हा गृहनिर्माण विभाग लावारीस आहे. या खात्यामध्ये बिल्डरच्या हिताचा एफ.एस.आय. वाढवून घेण्याचा निर्णय घेतला जातो. बिल्डरला क्लस्टरमध्ये जाऊ देण्यासाठी त्यांच्याकडे लक्ष दिले जाते. विशिष्ट अधिकारी भूखंडाच्या मागे लागून त्यामध्ये आपले उखळ पांढरे करुन घेतात. त्या दृष्टीने त्यांच्या हालचाली सुरु असतात. मंत्रिमहोदय, आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना पूजनीय मानून राजकारणात आला आहात. त्यांनी आपणास संघर्ष करण्यास शिकविले आहे. ते करण्याची गरज आहे. नुसता गाडीवर लाल दिवा लावून गप्प बसणे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणविणाऱ्यांवर अन्याय करणारे ठरेल हे आपण लक्षात ठेवा. आपले 100 कोटी रुपये पणन महामंडळाकडे असतांना सुध्दा आपण त्यांच्याकडे मागू शकत नाही. माझ्या माहितीप्रमाणे कृष्णा खोरे महामंडळाला सुध्दा पैसे दिले आहे आहेत. आपणाकडे पैसे नसतांना आपण दुसऱ्यांना देत आहात.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

या पध्दतीने जर हा कारभार चालत असेल तर रिपेअर बोर्डामध्ये पैसे नाहीत असे म्हणणे आणि अशा पध्दतीची चर्चा करणे ही अतिशय लज्जास्पद आणि लाजिरवाणी बाब आहे. नवीन माननीय मुख्यमंत्र्यांना आम्ही आग्रह करु की, केव्हा तरी या खात्याला न्याय द्यावा. आपण नवीन गृहनिर्माण धोरण आणत आहोत. त्याची भरपूर चर्चा होते. कारण प्रत्येक चर्चेच्या आधारे काही ना काही गोळा करण्याचे काम चालू आहे. प्रत्येक घोषणेच्या आधारे गोळा करणे चालू आहे. स्वप्न रंगवावयाचे आणि गोळा करावयाचे असे काम चालले आहे. एकाही बाबतीत अंमलबजावणी होत नाही. मुंबईतील लेक अपेक्षेने आपल्याकडे पाहतात. ट्रान्सपोर्टेशन आणि हाऊसिंग या मुंबईच्या दोन प्रमुख समस्या आहेत. केंद्र सरकारला, राज्य सरकारला तसेच महानगरपालिकेला प्रामाणिकपणे कर भरणारा जो माणूस आहे त्यांचे हे प्रश्न शासनाच्या माध्यमातून सोडविले पाहिजेत. गृहनिर्माण मंत्री सुध्दा क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये आहेत. गृहनिर्माण खाते माननीय मुख्यमंत्र्यांच्या क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये आहे. या गृहनिर्माण खात्याला माननीय मुख्यमंत्र्यांच्या क्लस्टर डेव्हलपमेंटच्या कचाट्यातून बाहेर काढा. यांना काय अधिकार आहेत हे मला माहीत आहे. माझे वडील हाऊसिंग बोर्डामध्ये नोकरीला होते. हाऊसिंग बोर्डातील प्रत्येक मजला मी पाहिलेला आहे. माननीय राज्यमंत्री ॲड. शेगावकर साहेब हे चळवळीतील नेते आहेत म्हणून आम्ही त्यांचा मान राखतो. ते जर घराणेशाहीतून आले असते तर आम्ही त्यांना उघडे पाडले असते.

सभापती महोदय, या ठिकाणी ट्रान्झीट कॅम्पचा विषय निघाला. लोक 20-20 वर्षे ट्रान्झीट कॅम्पमध्ये का राहतात ? जेव्हा एखादी इमारत दुरुस्तीच्या पलीकडे जाते, ज्याला आपण बियॉंड रिपेअर म्हणतो ती इमारत कलम 88(3) प्रमाणे पाडावयाची असते. घर मालकाकडून ती जमीन ताब्यात मिळण्यासाठी तीन-चार वर्षे लागतात. ती जमीन ताब्यात मिळाल्यानंतर जो भूसंपादन अधिकारी असतो तो ती जमीन संपादित करतो. त्यानंतर ती जमीन म्हाडाकडे ताब्यात देण्यामध्ये तीन ते चार वर्षे जातात. दोन तीन वर्षे मुंबई महानगरपालिकेकडे प्लॅन पाठविण्यामध्ये जातात. असे करता करता प्रकल्पाचे कामकाज सुरु होण्यामध्ये 12 ते 14 वर्षे जातात. आता त्या ठिकाणी बांधकाम करण्यास हरकत नाही असे सांगेपर्यंत त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले असते. त्यानंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

परत लोक कोर्टात जातात. माननीय मंत्रिमहोदय ॲड. शेगावकर यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी ज्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम खात्याचे वर्क कल्चर बदलले त्याप्रमाणे हाऊसिंग बोर्डाचे वर्क कल्चर बदलले पाहिजे आणि रिपेअर बोर्डाचे वर्क कल्चर तर त्याहूनही बदलले पाहिजे. विधान परिषद सदस्य म्हणून रिपेअरच्या बाबतीत कोणी पैसे मागावयास आले तर फार भीती वाटते. कारण पैसे दिले नाहीत तर रहिवाशी नाराज होतात आणि दिले तर त्यामध्ये काही तरी भानगड असावी म्हणून 50 टक्के तरी बघू असे म्हणतात. त्यांच्या कानफाटात वाजवली पाहिजे. परंतु त्यांचा तरी काय दोष आहे ? दहा पंधरा वर्षांपूर्वी आमच्यापैकी कोणी तरी सवय लावली असेल. कंत्राटदार, अधिकारी सगळ्यांचे संगनमत असते. एकदा या रिपेअर बोर्डाचे वर्क कल्चर बदलले पाहिजे. "बियॉंड रिपेअर" यासाठी कीलम 88(3) लागल्यानंतर पुढच्या दोन वर्षात इमारत उभी करा. अशा प्रकारे मुंबईमध्ये इमारत उभी करुन दाखविण्याची आपल्यामध्ये हिंमत आणि क्षमता असेल तर खरोखर आपल्याकडे अधिकार आले असे म्हणता येईल. आपल्याकडे अधिकार आले असतील तर ते करुन दाखवा. ती हिंमत आपल्याकडे आहे काय ? फाईल आली की सरकवली नाही तर टरकवली अशी परिस्थिती आहे. ट्रान्झीट कॅम्प या शब्दाचा अर्थ ऑक्स्फर्डवाले सुध्दा बदलतील. ट्रान्झीट म्हणजे परमनंट या पध्दतीने ते अर्थ बदलतील. अशी रिपेअर बोर्डाच्या ट्रान्झीट कॅम्पची अवस्था केलेली आहे. ट्रान्झीट कॅम्पच्या फार वर्णनामध्ये मी जात नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

जे वर्क कल्चर बदलणार आहात. त्यामध्ये दुरुस्ती मंडळाच्या चाळींमध्ये जे करप्शन आहे तो कसा थांबविणार आहात, याचीही माहिती मिळणे आवश्यक आहे. मुंबई घरदुरुस्ती कायद्याच्या कलम 28 (3) अन्वये इमारत रिकामी करण्याची नोटीस दिली जाते. एखाद्या चाळीत 40 खोल्या असतील आणि एखाद्याच्या खोलीचा क्रमांक 15 असेल तर त्यानंतरच्या खोलीचा क्रमांक 15-ए होतो, 18 असेल तर 18-ए होतो, असे करत करत 40 रहिवाशांचे 60 रहिवासी होतात. या वाढीव 20 घरांपैकी काही घरे मंत्र्यांकडे जातात किंवा नाही याची मला माहिती नाही. परंतु यामध्ये कार्यकारी अभियंता, एजंट या सर्वांचे वाटे ठरलेले आहेत. जर माननीय राज्यमंत्र्यांची प्रामाणिक इच्छा असेल तर त्यांनी आजच सभागृहामध्ये दुरुस्ती मंडळाच्या किती चाळी आहेत, एकूण किती रहिवासी आहेत ते घोषित करावे. सध्या असलेल्या चाळींचे आजच सर्वेक्षण करावे. सर्वेक्षणानंतर त्यापैकी किती चाळी दुरुस्तीसाठी घोषित केल्या ते सांगावे. सर्वेक्षण झाल्यावर 5 वर्षानंतरही तेवढेच रहिवासी राहिले पाहिजेत. या प्रक्रियेमधील भ्रष्टाचार कधी तरी थांबविला पाहिजे.

सभापती महोदय, सध्या अनेक बांगलादेशी नागरिक संक्रमण शिबिरांमध्ये राहतात. मुंबईतील अनेक बारबाला या संक्रमण शिबिरामध्ये रहात होत्या. मोठया बारमधील बारबाला लोखंडवाला कॉम्प्लेक्स सारख्या ठिकाणी रहात असतील, परंतु मध्यंतरी अनेक बारबालांचे आश्रयस्थान संक्रमण शिबिरे झाली होती. डीसीपी झोन-4 ने कोणत्या एरियामध्ये अधिक बांगलादेशी नागरिक राहतात त्याचा अहवाल शासनाला दिलेला आहे. मग मूळ रहिवासी गेले कोठे ? असा प्रश्न निर्माण होतो. बांगलादेशी नागरिकांना हाकलण्यासाठी आम्ही शासनाला सहकार्य करण्यास तयार आहोत. या घरदुरुस्ती मंडळाच्या अंतर्गत येणा-या चाळींचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय आजच घेतला आणि चाळनिहाय भाडेकरुंची नोंद केली तर यापुढे कोणत्याही अधिका-याला, कर्मचा-याला, एजंटला भ्रष्टाचार करण्यास वाव राहणार नाही. अनावश्यक चर्चा केल्या जातात असे म्हटले जाते आणि प्रशासनाबद्दल सामान्य लोकांच्या मनामध्ये अविश्वास आहे त्याला पूर्णविराम मिळू शकतो. सन्माननीय गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी हे विधेयक मांडत असताना विधेयकाची उद्देश व कारणे आम्हाला सांगितली नाहीत. आम्ही समजूतदारपणा दाखवून ती गृहित

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/ SBT/ MMP/

श्री.विनोद तावडे....

धरली आहेत. परंतु सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी मांडलेल्या मुद्यांबाबत सन्माननीय राज्यमंत्री महोदय समर्पक उत्तर देऊ शकले तर या इमारत दुरुस्तीच्या विषयासंबंधी शासन किती गंभीर आहे ते समजू शकेल. क्लस्टर पोर्ट पोलियो असलेल्या मुख्यमंत्र्यांकडील खात्यांपैकी एका खात्याचा निर्णय बाहेर येईल. त्यामुळे लोकांच्या आशा पल्लवित होतील आणि आपण प्रामाणिकपणे उत्तर दिले असे दिसून येईल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2008चे वि.स.वि.क्रमांक 60, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) विधेयक यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

या विधेयकाचे स्वागत करीत असताना काही मुद्दे मांडण्याचा प्रयत्न मी करणार आहे आणि त्याची अंमलबजावणी गृहनिर्माण मंडळ आणि सरकारतर्फे व्हावी अशी मी अपेक्षा करतो. मुंबई शहरामध्ये रिपेअर बोर्डाचा ऐरणीवरचा प्रश्न आहे. हा ऐरणीवरचा प्रश्न काही सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळया पध्दतीने या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी जे जे काही या ठिकाणी मांडलेले आहे ते सर्वच सत्य आहे हे मात्र मी मानायला तयार नाही. काही गोष्टी जरुर मान्य करायला पाहिजेत. इमारत कोसळल्यानंतर तेथील लोकांना आपण ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये पाठविले जाते. या लोकांची मास्टर लिस्ट तयार केली जाते अशा त-हेची चर्चा हौसिंग बोर्डाच्या अधिका-यांकडून ऐकायला मिळते. ह्या रहिवाश्यांची ही मास्टर लिस्ट नीट व्हावी अशी माझी मागणी आहे. याचे कारण असे की, मुंबई शहरातील लालबाग, परळ, गोरेगाव, डोंगरी, कुंभारवाडा येथील मंडळी ट्रान्झिट कॅम्पमध्ये राहायला गेली आहेत. त्यातील काही लोक मुंबई आलेले आहेत. परंतु 3/4 लोक अजूनही त्याच ठिकाणी आहेत. मी आपल्याला एवढेच सांगेन की, जर 10 खोल्यांची इमारत कोसळली तर त्या इमारतीचे बांधकाम होत नाही. त्याचे पुढे काय होते यासंबंधी मी भाष्य करु इच्छित नाही. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी क्लस्टर डेव्हलपमेंटचा वारंवार उल्लेख केला. जर आपण 4-6 इमारती एकत्र करुन बांधकाम करायला घेतले नाही तर कोणतीही इमारत बांधून तयार होणार नाही आणि परिणामी ट्रान्झिट कॅम्पमधील लोक तेथेच राहातील आणि कोसळलेल्या इमारतीमधील लोक वा-यावर फिरत राहातील.

श्री. विनोद तावडे : क्लस्टर डेव्हलपमेण्टमधील एक क्लॉज अतिशय घातक आहे आणि तो म्हणजे त्या ठिकाणी शासकीय, निमशासकीय जागा असेल तर ती बिल्डरच्या खिशात जाणार आहे. याबाबतचे पॉवर पॉईण्ट प्रेझेण्टेशन मी दाखविलेले आहे. दोन बिल्डिंगमधील शासकीय जागा ही बिल्डरच्या घशात घालण्याचा डाव आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला ती म्हाडाच्या अधिका-यांच्या कक्षेतील बाब आहे. त्यांनी ती पाहिली पाहिजे. रिपेअर बोर्डाच्या इमारती ह्या बिल्डर रिपेअर करीत नाही. पण कोसळलेल्या इमारतीतील जे लोक ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये राहातात अशा लोकांचा जागा देण्याच्या बाबतीत बिल्डर दुरुपयोग करताना दिसतात आणि तो दुरुपयोग या मुंबई शहरामध्ये झालेला आहे हे मी दाव्याने सांगेन. दोन इमारतीमधील जागा बिल्डरला मिळणार नाही हे संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी आणि अधिका-यांनी पाहिले पाहिजे. क्लस्टर डेव्हलपमेंट केल्या शिवाय मुंबई शहराची डेव्हलपमेंट होणार नाही. जुन्या इमारतीमधील लोकाना ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये राहाण्यास पाठविले जाते. ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये बैठी घरे असतात. ती देत असताना अधिकारी काय काय करतात हे डोळसपणे पाहिले पाहिजे. नाही तर सर्वच्या सर्व खोल्या ह्या दलालांच्या हातामध्ये जातात आणि मग हे दलाल कोणता तरी झेंडा खांद्यावर घेतात. आता झेंडा म्हटला की माझ्या समोरच्या मंडळींना राग येईल म्हणून मी फक्त झेंडा म्हणते.

.....नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अल्का देसाई...

आणि मग ती मंडळी वारेमाप या शहरामध्ये धुमाकूळ घालीत असतात. ते होता कामा नये आणि या गोष्टींवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी आपली सर्व लोकप्रतिनिधींची आहे. अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी ती जबाबदारी ओळखावी आणि त्याप्रमाणे मुंबई शहरातील ट्रॉन्झीट कॅम्प आणि रिपेअर बोर्ड यांची सांगड व्यवस्थितपणे घालावी असे मला सांगावयाचे आहे. आपण ज्या रहिवाशांना वेगवेगळया ट्रॉन्झीट कॅम्पमध्ये पाठविले आहे. दुसरा देखील ट्रॉन्झीट कॅम्प झाला आहे. ट्रॉन्झीट कॅम्पच्या बाबतीत माझे संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा झालेली आहे. त्या ट्रॉन्झीट कॅम्पमध्ये हाऊसिंग बोर्डाची मंडळी त्या रहिवाशांच्या अडचणी समजावून घेण्यास जात नाहीत. ते अधिकारी तेथील रहिवाशांच्या पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेकडे बघत नाहीत. ड्रेनेजच्या व्यवस्थेकडे बघत नाहीत. मुंबई सोडून आम्ही ट्रॉन्झीट कॅम्पमध्ये गेलो, तेथे सुध्दा रहिवाशांना घाणीत रहावे लागते आहे. 1990 सालापासून या ट्रॉन्झीट कॅम्पच्या रहिवाशांकडे कोणीही अधिकारी लक्ष देत नाहीत. 1995-96 मध्ये असे व्हावयाचे की, यासंदर्भात एखादा निर्णय आज झाला तर त्याची उद्या अंमलबजावणी होत असे. त्या कालावधीत थोडेफार डेव्हलपमेंटची कामे होत होती. परंतु आता तसे होत नाही. याकडे लक्ष देण्याची गरज आहे. म्हाडाचे काम शिस्तीत चालले आहे. या विधेयकाच्या निमित्ताने मी ज्या काही सूचना केल्या आहेत, त्या सूचनांचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक 60- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक 2008 यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. मी याबाबतीत स्पष्टीकरण करु इच्छितो की, म्हाडा अधिनियम 1976 मधील कलम 83 खाली जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती करण्याचे काम दुरुस्ती मंडळाकडून केले जाते. मुंबईत्ील अनेक जुन्या इमारती दुरुस्त करण्याचे काम आतापर्यंत या मंडळाने केले आहे. धोकादायक आणि उपकर प्राप्त इमारतीच्या दुरुस्तीसाठी मंडळाने वेळोवेळी खर्चाची मर्यादा वाढविली आहे. कारण मुंबई शहरात 1969 पूर्वीच्या या सर्व इमारती आहेत. मुंबई शहरात 1940 पूर्वीच्या इमारती आहेत. 1950 पूर्वीच्या इमारती आहेत, 1951 ते 1955 या कालावधीतील जुन्या इमारती आहेत. 1969 पूर्वीच्या इमारती आहेत. अशा एकूण 16281 इमारती आहेत. 1969 पासूनच्या ज्या इमारती होत्या, त्यांची दुरुस्ती करावयाची होती, त्यावेळी खर्चाची मर्यादा वाढविली होती. ती मर्यादा 75 रुपयांपासून पुढे वाढविली होती. मर्यादा कधी कधी आणि किती वाढविली यासंबंधीचे स्टेटमेंट सर्व सन्माननीय सदस्यांसमोर ठेवलेले आहे. 1969 ते 1974, त्यानंतर 1974 ते 1980, 1998 ते 1983 , 1983 ते 1986, त्यानंतर 1986 ते 1992, त्यानंतर 1992 ते 1998 आणि 1998 ते 2004 या कालावधीत ही मर्यादा वाढविली आहे. ही मर्यादा 75 रुपयांपासून ते 1200 रुपयांपर्यंत प्रति चौरस फूटाचा खर्च वाढविण्यात आलेला आहे. अजूनही या खर्चात वाढ व्हावी अशा प्रकारची विनंती लोकप्रतिनिधींनी, भाडेकरुंनी शासनाकडे केली होती. एवढेच नव्हे तर सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी तारांकित प्रश्नाव्दारे या खर्चाच्या मर्यादेत 1200 ते 2000 एवढी वाढ करावी अशी मागणी केली होती. त्याप्रमाणे माजी मुख्यमंत्री आणि माजी गृहनिर्माण मंत्री यांनी सभागृहाला आश्वासन दिले होते की, 2000 रुपयांपर्यंत मर्यादा वाढवून देण्यात येईल...

यानंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर.....

आणि त्याप्रमाणे हा प्रस्ताव शासनाकडे गृहनिर्माण मंडळाने पाठविला. गेल्या पावसाळी अधिवेशनात हा सुधारणा प्रस्ताव चर्चेसाठी येऊ न शकल्यामुळे ही सुधारणा मान्य झाली नाही. परंतु माननीय सदस्यांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि गृहनिर्माण विभागाने याबाबत अध्यादेश काढण्याचे ठरविले. कारण पावसाळयामध्ये इमारती कोसळतात, दुरुस्तीचे अंदाजपत्रक करावयास, मंजुरी मिळण्यास वेळ लागतो आणि विधानसभेचे पुढील अधिवेशन डिसेंबर महिन्यात नागपूर येथे होणार असल्यामुळे मध्यंतरीच्या पाच महिन्याच्या काळात सर्व कामे पूर्ण करावयाची असतील तर अध्यादेश काढणे जरुरीचे ठरले आणि त्याप्रमाणे शासनाने अध्यादेश जारी केला. या अध्यादेशाचे बिलात रुपांतर करण्यासाठी विधेयक सभागृहापुढे मांडलेले आहे. केवळ या उपकर प्राप्त इमारतींची दुरुस्ती करण्याचा नव्हे तर पुनर्बांधणी करण्याचाही शासनाचा विचार आहे. त्यानुसार नवीन शासकीय गृहनिर्माण धोरणामध्ये तशी तरतूद करण्यात आली आहे. वेळोवेळी सूचना, अधिसूचना जाहीर करुन लोकांच्या हरकती मागवून त्याप्रमाणे कारवाई करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, 269 चौ.फूट हा आकडा कुठून आणला? पूर्वी 20 चौ.मी.मध्ये 225 चौ.फूट जागा देत होतो, आता 20 ऐवजी 25 चौ.मी.मर्यादा केल्यामुळे 225 ऐवजी 269 चौ.फूट जागेची तरतूद केली आहे. लोकांची आग्रहाची मागणी होती. काही लोकांनी आंदोलने केली होती, त्यामुळे शासनाला निर्णय बदलावा लागला.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 300 चौ.फूट जागा मिळावी म्हणून कोणी आंदोलन केले नव्हते. टेनन्ट असोसिएशनकडून मागणी आली होती. ही सर्व मध्यमवर्गीय मंडळी आहेत.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : याबाबतीत शासनाने निर्णय घेतला. आम्ही हरकती आणि सूचना मागविल्या. 300 चौ.फूटाची घरे पुनर्बांधणी इमारतीमध्ये भाडेकरुंना द्यायची आहेत या संदर्भात अधिसूचना काढली आहे. त्यामुळे या संदर्भात काही सूचना असतील तर निश्चितपणे त्या विचारात घेणार आहोत. धारावी प्रकल्पाबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या आहेत. तेथील रहिवाशांचे म्हणणे आहे की, आम्हाला 400 चौ.फुटापेक्षा कमी क्षेत्रफळाची घरे देऊ नयेत. याबाबत शासन गंभीरपणे विचार करीत आहे. भाडेकरुंचे हित लक्षात घेऊनच शासनाने धोरण तयार केले आहे. भाडेकरुंना अडचणीत टाकणे, त्यांच्याकडून पैसे काढणे हा शासनाचा उद्देश

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर.....

नाही. पूर्वी खर्चाची मर्यादा प्रती चौ.मी.क्षेत्रासाठी 750 रुपये होती. त्यापेक्षा जास्त पैसे भाडेकरुंकडून घेतले जात नाहीत. आता 1200 रुपयांवरुन 2000 रुपये प्रती चौ.मी.खर्चासाठी मर्यादा वाढवित आहोत. 800 रुपयांनी जरी मर्यादा वाढविण्यात येत असली तरी भाडेकरुंना कोणतेही पैसे द्यावे लागणार नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मंत्रीमहोदयांच्या काही बाबी निदर्शनास आणू इच्छितो. मंत्रीमहोदयांनी चुकीचे स्टेटमेंट करु नये. 1200 रुपयांवरुन 2000 रुपये रिपेअर सेस होईल, त्या प्रपोर्शनेटमध्ये मालक आणि भाडेकरुंवर भुर्दंड बसणार आहे. त्यांच्याकडून रिपेअर सेस वसूल केला जातो. शासन स्वत:च्या तिजोरीतून हा खर्च देत नाही. रेकॉर्डवर चुकीचे येत आहे. अधिकारी काय करीत आहेत? ही बाब गंभीर आहे. कृपा करुन मंत्रीमहोदयांनी असे करु नये.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अशा प्रकारे चुकीचे रेकॉर्डवर राहू नये अशी माझी सूचना आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी देखील सांगितले. म्हणून 1200 वरुन 2000 रुपये प्रति चौरस मीटरला जो खर्च या तरतुदीच्या माध्यमातून वाढविण्याचा निर्णय घेतला तो खर्च भाडेकरुलाच द्यावयाचा आहे. जर मंत्री महोदय सांगत आहेत ते खरे असेल तर त्यांनी जाहीर करावे की, हा वाढीव भार भाडेकरुंना द्यावा लागणार नाही.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, ही रक्कम भाडेकरुंना .....

<u>पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी</u>

श्री. दिवाकर रावते : महोदय, हा उपकर भाडेकरुन आणि मालकाकडून वसूल केला जातो, ते प्रमाण 40 टक्के मालकाने आणि 60 टक्के भाडेकरुने असे आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, एक रुपया खर्च असेल तर त्यातील 90 पैसे भाडेकरु आणि 10 पैसे लॅंडलॉर्ड असे हे प्रमाण असून जसजशी ही खर्चाची मर्यादा वाढत गेली तसे हे प्रमाण सुध्दा वाढत गेले. पूर्वी ही रिपेअरच्या खर्चाची रक्कम 12 रुपये होती तर आता जवळपास 400 रुपयापर्यंत गेलेली आहे. म्हणून शासन ही खर्चाची रक्कम जी वाढवित आहे ती कायद्याच्या कक्षेनुसार त्यांना वाढविणे आवश्यक असते म्हणून वाढवावी लागते. अर्थात ती भाडेकरुंकडूनच वसूल केली जाते.

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : माननीय मंत्री महोदयांनी फक्त इतकाच खुलासा करणे आवश्यक आहे की, प्रति चौरस मीटरचा खर्च 1200 रुपयावरुन 2000 रुपये होणार आहे त्यात भाडेकरु आणि लॅंडलॉर्ड यांचा किती वाटा असेल. तसेच माझी सन्माननीय सदस्यांना अशी विनंती आहे की, अगोदर मंत्री महोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे, त्यानंतर आपण आपल्या अडचणी मांडाव्यात. मध्येच जर आपण मुद्दे उपस्थित केले तर त्यांचे कन्फ्युजन होण्याची शक्यता आहे. म्हणून आपण मंत्री महोदयांकडून नंतर खुलासा घ्यावा.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : 750 रुपये चौरस मीटरनुसार उपकराप्रमाणे हे केले, त्यात वाढ होणार नाही, हे मी सांगितले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : महोदय, 750 रुपये मी बोललोच नाही. शासन 225 चौरस फुटाच्या सदनिका देणार होते त्यात म्हाडाने जास्तीत जास्त म्हणजे उच्च उत्पन्न गटासाठी जो एरिया आहे तो 750 चौरस फुटाचा असेल असे तीन गट पाडलेले आहेत. त्यातील शेवटची मर्यादा 750 चौरस फुटाची आहे. परंतु ज्याप्रमाणे 225 चौरस फुटावरुन शासनाने 269 चौरस फुट एवढे क्षेत्रफळ वाढविले त्या प्रपोर्शनेटमध्ये उच्च उत्पन्न गटातील सदनिकांचे क्षेत्रफळ 750 वरुन वाढविणे आवश्यक आहे, असे मी म्हणालो.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : आपण पुनर्विकासाच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबतीत शासन निश्चितपणे विचार करील व पुनर्विकासास प्राधान्य देईल. तसेच सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी देय रकमेच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला त्याबाबतचा निर्णय सुध्दा लवकरच घेतला जाईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी मघाशी विनंती केली की, या विधेयकाचे उत्तर देण्यासाठी आपण सभागृहात हजर रहावे. कारण माननीय राज्यमंत्री शासनाच्या धोरणात्मक बाबींच्या संदर्भात बोलू शकणार नाहीत. अधिकाऱ्यांनी जरी माननीय मंत्री महोदयांना माहिती दिली तरी कॅबिनेट म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांचाच तो अधिकार आहे.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

या विधेयकाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी ठोस भूमिका या ठिकाणी सांगणे आवश्यक आहे. अधिका-यांनी यासंदर्भात काही सांगितले तरी त्या खात्याचा मंत्री म्हणून तो मुख्यंमत्र्यांचा अधिकार आहे. मागच्या वेळेस माननीय मुख्यमंत्र्यांनी ठोसपणे आम्हाला सांगितले होते की, आम्ही वैयक्तिक इमारतीच्या विकासासाला सुध्दा 300 चौ. फूट जागा देऊ. माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला शब्द दिल्यामुळे हा कायदा करण्यास आम्ही तयार झालो.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : शासन आता सुध्दा मॅचिंग ग्रँट देतच आहे.

श्री. दिवाकर रावते : आपण असे सांगता का जसे आपण 100 चौ. फुटाचे 225 चौ.फुट केले, 225 चौ. फुटाचे 300 चौ. फूट केले तसे 750 चौ. फुटाच्या प्रमाणात सुध्दा केले जाईल असे आपण या ठिकाणी सांगता काय? हा धोरणात्मक निर्णय आहे. माननीय मंत्रीमहोदय यासंदर्भात सांगू शकत नाही.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : ट्रान्झीट कँपच्या बाबतीत काही तक्रारी आहेत. या संदर्भात माननीय विनोदजी तावडे यांनी ट्रान्झीट कँपच्या संदर्भात सांगितलेले आहे. त्यामुळे ट्रान्झीट कँपच्या संदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, ट्रान्झीट कँपमध्ये आमचा सर्व्हे झाला आणि त्या सर्व्हेमध्ये आम्हाला बरेचसे घुसखोर आढळून आले. या घुसखोरांना काढण्यासाठी आपण प्रयत्न केला, त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी सुध्दा केल्या परंतु पोलीस फोर्स नसल्यामुळे घुसखोरांना बाहेर काढता आले नाही. ट्रान्झीट कँपमध्ये जे अवैध धुसखोर आहेत त्यांना निश्चितपणे बाहेर काढले जाईल. यासंदर्भात सदस्यांनी मला सहकार्य करावे हे याकरिता मी म्हणालो होतो की, काही सदस्य घुसखोरांना बाहेर काढा अशी मागणी करतात तर दुस-या बाजूला काही सन्माननीय सदस्य म्हणतात की, या घुसखोरांना अधिकृत करा. त्यामुळे घुसखोरांच्या संदर्भात कारवाई करण्यास शासनापुढे अडचणी निर्माण होतात. सदस्यांनी यामध्ये सहकार्य केले तर निश्चितपणे घुसखोरांना ट्रान्झीट कँपमधून बाहेर काढले जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : या ठिकणी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, काही सदस्य बेकायदेशीर लोकांना पाठिंबा देतात परंतु सदस्यांनी कोणत्याही बेकायदेशीर गोष्टीला पाठिंबा दिला तर त्या सदस्याचे सदस्यत्व रद्द होते त्यामुळे कोणत्या सदस्याने बेकायदेशीर कृत्याला पाठिंबा दिलेला आहे त्यांची नावे माननीय मंत्रीमहोदंयानी जाहीर करावेत. ज्या सदस्यांनी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

अशा प्रकारचे पत्र दिले असेल ते पत्र माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावे. आम्ही कोणीही बेकायदेशीर गोष्टीला पाठिंबा देत नाही. घुसखोरांना, बांगला देशीयांना बाहेर काढा. आम्ही बेकायदेशीर गोष्ट मागितली तर तिला नाही म्हणायची तुम्ही हिंमत ठेवा.

तालिक सभापती : बेकायदेशीर गोष्टीला काही सदस्य पाठिंबा देतात असे आपल्याला बोलता येणार नाही.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, मी या करिता बोललो आहे की, या विषयाच्या संदर्भात काही तांरांकित प्रश्न आलेले आहेत त्यामुळेच मी हा विषय उपस्थित केलेला आहे.

तालिका सभापती : खरे म्हणजे यामध्ये दोन भाग केले पाहिजेत. झोपडपट्टीमध्ये अनाधिकृतपणे राहणारे वेगळे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी बांगला देशी घुसखोरांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यामुळे अशा दोन भागामध्ये आपल्याला विचार करावा लागणार आहे. काही सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, 95 ते 2000 या कालावधीत जे लोक झोपडपट्टीत राहत होते त्यांना कायदेशीर करा, कायमस्वरुपी करा अशी मागणी होती. आपला आणि सन्माननीय सदस्यांनी मांडलेला विषय वेगळा आहे. त्यामुळे दोन विषय एकत्र करण्याची गल्लत माननीय मंत्रीमहोदयांनी करु नये.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य मधुकर चव्हाण, दिवाकर रावते, विनोद तावडे या सर्वांनी ज्या सूचना मांडलेल्या आहेत त्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. त्यामुळे विधयेकामधील सुधारणा संमत करावी अशी माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

तालिका सभापती : या ठिकणी सन्माननीय सदस्यांनी विधेयकाच्या संदर्भात जे विचार मांडलेले, मुद्दे मांडलेले आहेत ते मुद्दे मी अधिका-यांना नोट करण्यास सांगितलेले आहे. हे बील आहे असे असले तरी यासंदर्भातील माहिती आपल्याला मिळावी यासाठी ते पटलावर ठेवावे असे मी सांगेन. तसेच सन्माननीय सदस्यांची भावना मी आदरणीय सभापती महोदयांपर्यंत पाहचवेन. विशेष करुन मुंबईच्या आमदरांच्या उपस्थितीमध्ये माननीय मुख्यमंत्री, राज्यमंत्री आणि संबंधित खात्याचे मंत्री यांची एक बैठक घेण्याचा प्रयत्न करावा असे मला वाटते.

यानंतर श्री. अजित.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्य मंत्रिमहोदयांनी सांगावे की, आम्ही ज्या सूचना केलेल्या आहेत त्या संदर्भात अधिवेशन संपल्यानंतर माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत मुंबईतील आमदारांसमवेत बैठक घेण्यात येईल. त्यानंतर आम्ही हे विधेयक मंजूर करु.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांच्या भावना माननीय सभापतींकडे पोहोचवून माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक लावण्याचा प्रयत्न करु असे मी म्हणालो.

ॲड.प्रीतमकुमार शेगावंकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक लावण्यात येईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.स.क्रमांक 60 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 60 एकमताने संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>वि.स.स.वि.क्रमांक 57 - मुंबई पोलीस (सुधारणा) विधेयकाबाबत.</u>

तालिका सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेले वि.स.वि.क्र.57- मुंबई पोलीस (सुधारणा) विधेयक 2008 नंतर घेण्यात येईल.

आता अर्धा तास चर्चा घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>अर्धा-तास चर्चा क्रमांक 1 बाबत</u>

तालिका सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली पहिली अर्धा-तास चर्चेची सूचना सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांची आहे. त्यांनी विनंती केल्यानुसार ही अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात आली आहे.

आता मी दुसरी अर्धा-तास चर्चा घेत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी.: माणगाव ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील बुडीत क्षेत्रात विकासाची कागदोपत्री कामे दाखवून केलेला भ्रष्टाचार

मु. शी. : माणगाव ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील बुडीत क्षेत्रात विकासाची कागदोपत्री कामे दाखवून केलेला भ्रष्टाचार यासंबंधी श्री.परशुराम उपकर,वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"माणगांव (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) येथील खोऱ्यात टाळंबा प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या गावातील दुकानवाडी ते अजिवडे हा रस्ता पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून तयार करण्यासाठी घेतलेला असणे, या ठिकाणी पाटबंधारे विभागामार्फत रींग रोड रस्ता असतांनाही पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून ३ कोटी रुपये खर्च करुन रस्ता केल्याचे दाखविण्यात येणे, त्याचप्रमाणे या बुडीत क्षेत्रात कोणत्याही विहिरींची व कॉजवेची गरज नसताना नेरुर उपवडे व सोळी या गावात भारत निर्माण योजनेंतर्गत ८ विहिरी व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतून ३ विहिरी व कॉजवेसाठी साधारणपणे ३ लाख रुपयांचा खर्च केल्याचे दाखविण्यात येणे, तसेच संपूर्ण रोजगार योजनेतून विहिरी घेताना लोकवर्गणी काढल्याचे दाखवून या विहिरी केल्याचे दाखविण्यात येणे, अशा प्रकारे बुडीत क्षेत्रात कोणत्याही विकास कामांची गरज नसतांना कागदोपत्री कामे दाखवून मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सभापती महोदय, माणगाव ता,कुडाळ,जि.सिंधुदुर्ग येथील दुकानवाडी ते अजिवडे रस्ता पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून झालेला असून तो रस्ता अतिशय निकृष्ट दर्जाचा झालेला आहे. हा रस्ता खराब झाल्यामुळे या रस्त्यावरुन होणारी एस.टी.वाहतूक पूर्णत: ठप्प झालेली आहे. हा रस्ता होण्यापूर्वी त्यावरुन एस.टी.वाहतूक होत होती.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ...

हा रस्ता बुडित क्षेत्रामध्ये घेण्यात आला होता. पाटबधारे विभागाकडून पर्यायी रस्ता म्हणून एक रिंगरोड घेण्यात येणार असताना सदरहू धरण पुढील दहा वर्षात पूर्ण् होणार नाही अशा प्रकारचे प्रमाणपत्र पाटबंधारे विभागाकडून घेतले होते आणि या रस्त्याचे काम करण्यात आले होते. त्याचप्रमाणे वन विभागातून रस्ता जात असतांना वन विभागाची त्याकरता परवानगी घेणे आवश्यक आहे. वनविभागातून जर एखादा रस्ता जात असेल, तर त्यासाठी केन्द्र सरकारच्या पर्यावरण विभागाचा दिल्लीहून क्लिअरन्स घ्यावयाचा असतो परंतु अशा प्रकारे त्यांच्याकडून क्लिअरन्स न घेता सावंतवाडीच्या वन सरक्षकाकडून नियमबाहय परवानगी घेऊन या रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली होती. या रस्त्यावर एकूण 14 ठिकाणी मो-या आहेत त्या ठिकाणी बेड कॉक्रिट न करता काम केले गेले आहे. त्यामुळे काही ठिकाणच्या मो-या वाहून गेल्या आहेत. व आणखी काही मो-या वाहून जाण्याची शक्यता आहे. तीन कोटी रुपये खर्च करुन या रस्त्याचे काम करण्यात आलेले आहे हया रस्त्याचे काम `करीत असतांना वन संरक्षण कायदा 1980 चे उल्लंघन करण्यात आले आहे. मुख्य प्रधान वन संरक्षक यांच्या दिनांक 12 ऑक्टोबर 2008 च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे केन्द्रीय पर्यावरण विभाग, नवी दिल्ली यांच्याकडून क्लिअरन्स घ्यावयाचा असतो परंतु त्यांच्याकडून क्लिअरन्स न घेता हे काम करण्यात आलेले आहे. अशा प्रकारे या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. माणगाव बुडीत क्षेत्रात अनेक नळपाणी पुरवठयाच्या योजना हाती घेण्यात आल्या आहेत. उपवडे गावासाठी देखील पाणी पुरवठयाची योजना भारत निर्माण योजनेअंतर्गत घेण्यात आली असून हे काम देखील अत्यत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे .या योजनेअंतर्गत ज्या विहिरीची कामे करण्यात आली होती ती देखील बरोबर केलेली नाहीत. विहिरीची 33 फूट खोदाई करावयाची असतांना प्रत्यक्षात 25 फूट खोदाई केली आणि उर्वरित 7-8 फूट जमिनीच्या वर बांधून तेथे भराव घालून तेथे खोदाई केल्याचे कागदोपत्री काम केल्याचे दाखविण्यात आले आहे. अशा प्रकारे सर्वच पाणी पुरवठा योजनांचे काम अत्यत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. शाखा अभियंता श्री. मराठे यांनी नळ पाणीपुरवठा योजनांचा बट्टयाबोळ केलेला आहे तेव्हा त्यांच्या कामाची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी. भारत निर्माण योजनेअंतर्गत जी 15 कामे करण्यात आलेली आहेत त्यासर्वच कामाची चौकशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ...

करण्याची गरज आहे असे मला या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे. त्याचबरोबर उपवडे गावातून जाणा-या रस्त्याचे कामसुध्दा अत्यत निकृष्ट दर्जाचे करण्यात आलेले आहे या रस्त्यावरील मो-यांची कामे वाहून गेलेली आहेत. गणपतीच्या सणाच्या वेळी अनेक ग्रामस्थंनी श्रमदान केले असतांना त्या कामाचे श्रेय पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांनी घेतले , त्या कामाचे पैसे पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांनी खाल्ले आणि या कामामध्ये भ्रष्टाचार केला आहे तेव्हा हा रस्ता रिपेअर करण्यास पाटबंधारे विभागाला सांगण्यात यावे असे मला सांगावयाचे आहे. दहा वर्षामध्ये पाटबंधारे विभागाकडून भविष्यात धरण पूर्ण होणार नाही असे त्यांनी लेखी लिहून दिले होते तेव्हा याचा अर्थ काय समजावयाचा ?

सभापती महोदय, माननीय ग्राम विकास मंत्र्यांनी याबाबत खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. पाटबंधारे विभागाच्या कामाची चौकशी करावी. त्याचबरोबर शाखा अभियंता श्री मराठे यांनी नळ योजनांचे काम तसेच विहिरींचे काम यामध्ये भ्रष्टाचार केलेला आहे .या बाबतीत जिल्हा परिषदेकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या त्याचप्रमाणे पंचायत समितीच्या सदस्यांनी तीन महिने हा मुद्दा सातत्याने बैठकीत मांडला होता. तेव्हा पंचायत समिती मार्फत या कामाची चौकशी करण्याचे आश्वासन देऊनही अद्याप ही चौकशी पूर्ण केलेली नाही. जिल्हा परिषदेच्या प्रशासनाकडून या अधिका-यांना वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे म्हणून या अधिका-याविरुध्द त्वरित कारवाई करण्यात आली पाहिजे. नळ पाणी पुरवठयाचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे त्याचबरोबर पंतप्रधान सडक योजने अंतर्गत ररस्त्याचे काम करीत असताना वन संरक्षण कायद्याचे उल्लंघन करण्यात आलेले आहे. पाटबंधारे विभागाकडून केलेल्या या सर्व कामाची गुणवत्ता तपासून पाहिली जाणार आहे किंवा नाही याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा अशी मी या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने विनंती करतो.

नंतर श्री.सुबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी या ठिकाणी जे विविध मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबत उत्तर देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, माणगाव (ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग) येथील खोऱ्यात टाळंबा प्रकल्पांतर्गत जो रिंगरोडच्या कामाबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगतले आहे त्याबाबत मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, हा प्रकल्प अजून पूर्ण झालेला नसल्यामुळे त्या रिंगरोडच्या कामास अजून मंजुरीच दिलली नाही. तसेच त्यांनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा येथे उपस्थित केला की, पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून 3 कोटीचा जो रस्ता झालेला आहे तो या रिंगरोडच्या कामामधून कलेला आहे. पण त्यांनी जे सांगितले ते बरोबर नाही. कारण अजून ते काम सुरूच झालेले नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी याबाबत असे सांगितले की, रिंगरोडवर तो रस्ता दाखविला आहे .... मी आपल्याला सांगू इच्छितो की, तो प्रकल्प पूर्ण झालेला नसल्याने अजून तो रिंगरोड मंजूर असला तरी त्या कामास अजून सुरूवातच केलेली नाही. तेथे जो अगोदरचा रस्ता होता त्यात 7 कि.मी.चा रस्ता केलेला आहे. त्यातील 3.15 एवढा भाग हा बुडित क्षेत्रात जाणार आहे. सभापती महोदय, या बाबतीत असे आहे की, प्रकल्प पूर्ण होईपर्यंत म्हणजे 7 वषामध्ये ते काम पूर्ण होणार नसेल तर ते काम करून घ्यायला हरकत नाही असे प्रमाणपत्र देखील त्यासाठी दिलेले आहे. त्याप्रमाणे ते काम केले आहे. आता आपण तेथे भ्रष्टाचार झालेला आहे म्हणून सांगितले. परंतु ते एकंदर जे काम आहे तेच 2.77 लाख रूपयांचे आहे आणि त्यावर आतापर्यंत 2.36 लाख इतका खर्च झालेला आहे. तसेच तेथे वनीकरणाचे काम केलेले आहे असे आपण सांगितले. परंतु वनखात्याने त्यासाठी आपल्याला अजून परवानगी दिली नसल्याने ते काम सुरू केलेले नाही. ...

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, वनखात्याने दिलेल्या परवानगीची प्रत माझ्याकडे आताही उपलब्ध आहे. ...

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या कामासाठी माझ्या माहितीप्रमाणे वनखात्याची मान्यता अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे तेथे काम सुरू झालेले नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय राज्यमंत्री सांगत आहेत की, त्या ठिकाणी वनखात्याने अजून काम करण्यास परवानगी दिलेली नाही. मात्र सन्माननीय सदस्य

..... 3एस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ...

सांगत आहेत की, वन खात्याने त्यासाठी परवानगी दिली असून त्या परवानगीची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध आहे. असे असेल तर माननीय राज्यमंत्र्यांवर या संदर्भात हक्कभंग येऊ शकतो. हे लक्षात घेऊन माननीय राज्यमंत्र्यांनी येथे उत्तर द्यावे.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आता उपलब्ध आहे ती मी आपल्यापुढे ठेवतो आहे. ..

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माझ्याकडे याबाबतीतील असलेली कागदपत्रे आपल्याकडे पाठवित आहे, ती पाहून आपण याबाबत निश्चित माहिती घ्यावी.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडील कागदपत्रे जरूर माझ्याकडे द्यावीत मी ती पाहून घेईन. सभापती महोदय, भारत निर्माण योजनेंतर्गत त्या ठिकाणी 9 विहिरी घेण्यात आल्या होत्या, तेथील जी 4-5 गावे आहेत त्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी त्या विहिरींची अत्यंत गरज होती. त्यापैकी 5 विहिरी पूर्ण झाल्या असून 4 विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यासाठी एकूण 45.23 लाखाचे एस्टिमेट असून त्यातील 23.26 लाख रूपये खर्च आतापर्यंत झालेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी या कामात भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप केला आहे, तेथील काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे, मातीचा थर खाली गेल्याचे सांगितले आहे तर त्यासर्व बाबतीत चौकशी केल जाईल आणि त्यात जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री. अरविंद सावंत : ही चौकशी किती दिवसात पूर्ण करणार ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आता माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देत असताना वन खात्याची परवानगी रस्त्याच्या कामासाठी मिळाली नसल्याचे सांगितले. पण सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी त्यांच्याकडे त्यासाठी असलेल्या वनविभागाच्या परवानगीची प्रत असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. म्हणजे माननीय मंत्री महोदयांनी या संबंधात चुकीची माहिती दिली गेली आहे का ? असल्यास, ज्या अधिकाऱ्यांनी त्यांना चुकीची माहिती दिली असेल त्यांचेवर आपण काय कारवाई करणार ?

(यानंतर श्री. सरफरे ..... 3टी 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माझ्याकडे असलेल्या कागदपत्रानुसार मी सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी आता त्यांच्याकडील पत्राची प्रत माझ्याकडे दिली आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जर आपल्या अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिली असेल तर त्यांच्यावर आपण कारवाई करणार काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ज्यांनी खोटी माहिती दिली आहे व ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत त्या सर्वांची चौकशी केली जाईल. चौकशीमध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये नियमितपणे नियमांचे उल्लंघन करुन काम चालते. माननीय सदस्य त्यांच्याजवळ असलेल्या पुराव्यानिशी वारंवार सांगत आहेत . मागील वेळी रेशनिंग विभागातील अधिकाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत त्यांना जेलमध्ये जावे लागले. त्यांना 48 तास तुरुंगामध्ये रहावे लागले, तरीदेखील नियमानुसार त्यांना आतापर्यंत निलंबित केले नाही. ही तुमच्या शासनाची करामत आहे. तुम्ही हे करु शकता. खास करुन तुम्ही सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये करु शकता. आता पुरावा दिल्यामुळे पुन्हा एकदा विचारतो की, आपण चौकशी किती दिवसात पूर्ण करणार आहात?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, चौकशी तीन महिन्यात पूर्ण करण्यात येईल.

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर हे माझे मित्र आहेत म्हणून मी त्यांना सांगू इच्छितो की, नियम 93 चा आधार घेऊन काही प्रश्न सुटत नाहीत. ते आपल्याला सोडवून घ्यावयाचे असतात. एकाच वेळी अनेक गुंतागुंतीचे विषय मांडले तर वन विभाग काम करण्यासाठी परवानगी देत नाही. परंतु आपल्याला परवानगी मिळाली आणि आपण पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून रिंग रोडचे काम पूर्ण केले. त्याबद्दल मंत्रिमहोदयांचे आपण कौतुक केले पाहिजे. दुसरे असे की, निकषात न बसणाऱ्या विहिरी सुध्दा त्यांनी मारुन दिल्या त्याबद्दल आपण त्यांना धन्यवाद दिले पाहिजे. एकतर आपल्याला वन कायद्यामुळे परवानगी मिळत नाही, तरीसुध्दा याठिकाणी आपल्याला परवानगी मिळाली. आपल्या प्रश्नाला मंत्रिमहोदयांकडून उत्तर मिळाल्यानंतर मी हे सांगत आहे. आपण केलेली मागणी, आपला हक्क अबाधित आहे. मला आपणास एवढेच सांगावयाचे आहे की, कोणत्याही आयुधाचा उपयोग प्रश्न सुटण्यासाठी करावा. भविष्यात आपण अशाप्रकारे प्रश्न सोडवून घ्यावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

तालिका सभापती...

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 23 डिसेंबर, 2008 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 47 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 23.12.2008 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही